डिसेंबर २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## अभिवादन प्रज्ञासूर्याला, मानवतेच्या मूर्त स्वरूपाला!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(१४ एप्रिल १८९१ - ६ डिसेंबर १९५६)

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग
समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

barti
Pursuit for Social Equality


# सामाजिक विकासाला देवू गती...
# महाराष्ट्राची साधू सर्वांगीण उन्नती.

**अनुसूचित जातींचा सर्वांगीण विकासासाठी...**

- सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांवर संशोधन
- प्रशिक्षण
- सर्वेक्षण
- मूल्यमापन
- शासनाकडे धोरणात्मक शिफारसी करणे
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
- सामाजिक समता वाढीसाठी कार्यक्रम, सभा, व्याख्याने, परिसंवाद यांचे आयोजन
- सामाजिक समता वाढीसाठी पुस्तके, नियतकालिके आणि शोधनिबंध, निबंध प्रकाशित करणे.
- अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन करून शासनाला धोरणात्मक शिफारशी करणे.
- संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणून समता विचारपीठ चालू ठेवणे आणि विकास करणे
- सामाजिक समता आणि सामाजिक विकासासाठी प्रयत्न केलेल्या थोर महापुरुषांच्या विचारांचा प्रचार प्रसार

**योजना व उपक्रम :**

- येरवडा निवासी शाळा
- समतादूत
- अद्यायावत ग्रंथालये
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व तथा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण
- आय.बी.पी.एस. योजना बँक, रेल्वे, एल आय सी व तत्सम पदाच्या परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्र
- अधिछात्रवृत्ती
- पोलीस व मिलीटरी भरती पूर्व प्रशिक्षण
- येरवडा पुणे येथे UPSC पूर्व तयार, ७० विद्यार्थी निवासी प्रशिक्षण
- जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग
- बेंचमार्क सर्वेक्षण
- स्वयं सहाय्यता युवा गट (SSYG)
- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड
- येवला मुक्ती भूमी स्मारक
- पाली त्रिपिटक मराठी अनुवाद प्रकल्प



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था**

28 क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे - 411001
फोन नंबर: ०२०-२६३३ ३३३० / ०२०-२६३३ ३३३९

www.barti.in | Follow us

## ६ संविधान लेखकाचा उदय

गुलामी ही काय केवळ भारतातच होती असे नाही. जगाच्या पाठीवरील अनेक देशात ती होती. त्यामुळे त्या त्या देशातल्या शासकांनी गुलामांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपापल्या राज्यघटनेच्या आराखड्यात काय तरतुदी केल्या, याचा शोध घेणे बाबासाहेबांना आवश्यक वाटू लागले. त्यांच्या या प्रयत्नास अभूतपूर्व यश मिळाले.

## ९ डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीला राष्ट्रवादाचा पाया मानतात. त्यांनी लोकशाहीची व्यापक संकल्पना मांडली आहे. स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या तत्त्वांनी लोकशाहीला भक्कम रूपबंध प्राप्त झाला आहे. आधुनिक भारताचे प्रभावी शिल्पकार म्हणून ही त्यांची नाममुद्रा भारतीय संसदीय लोकशाहीच्या संघटनात्मक लोकशाहीच्या सोनेरी पानावर मुद्रित झालेली आहे.

## १५ प्रेरक पत्रकारिता

बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हानास्पद आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ उपेक्षितांना जागवण्याचेच कार्य केले नाही, तर उर्वरित घटकांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन त्यांनी वारंवार केले.

## १९ स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी

परंपरागत कायद्यांनी जखडलेली स्त्री डॉ. बाबासाहेबांच्या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे, तर अर्थार्जन, सेवायोजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते.



## २६ मानदंड व्यासंगाचा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध ग्रंथसंपदेतून सातत्याने शैक्षणिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेबांची शैक्षणिक चळवळ ही त्यांच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. शिक्षण हाच मानवाच्या प्रगतीचा मूळ गाभा आहे, असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा होता.

## २८ पाली भाषेला योगदान

डॉ. जॉन्सनने जेव्हा इंग्रजीचा शब्दकोश लिहिला, तेव्हा इंग्रजी ही जागतिक भाषा होऊ पाहत होती, तर बाबासाहेबांनी जेव्हा पाली शब्दकोश लिहिला तेव्हा पाली जवळपास एक मृत भाषा होती. मृत भाषा प्रवाहात नसल्यामुळे त्यातील वेगवेगळे शब्द शोधून, त्यांचे अर्थ व वाक्यरचना करणे हे महाकठीण काम बाबासाहेबांनी केले.

## ३० डॉ. बाबासाहेब आणि कामगार चळवळ

समस्त कामगार, शेतकरी, शोषित, पीडित, विद्यार्थी अशा सर्वांनाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे. कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी लढा दिला व कामगारांना न्याय मिळवून दिला.

## ३९ जलपर्यटनातून जीवन परिवर्तनाकडे

निसर्गरम्य वनराईने चहुबाजूने बहरलेला आणि नटलेला गोसीखुर्द जलाशय, वेगवेगळ्या ऋतूत वेगवेगळे रूप अंगीकारतो, ते स्वानुभवानेच प्राशन करावे. क्षितिजापर्यंत पसरलेला अथांग जलाशय दिङ्मूढ करून ठेवतो. गोसीखुर्द जलाशय सर्वांना निमंत्रण देत आहे आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाकडे वळण्यासाठी.


| | | | |
|---|---|---|---|
| संविधान लेखकाचा उदय | ६ | पाली भाषेला योगदान | २८ |
| डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद | ९ | डॉ. बाबासाहेब आणि कामगार चळवळ | ३० |
| चरित्र आणि विचारधन | १२ | संविधाननिष्ठ राष्ट्रवाद | ३३ |
| प्रेरक पत्रकारिता | १५ | जातप्रमाणपत्र पडताळणीची सुलभ प्रक्रिया | ३७ |
| स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी | १९ | जलपर्यटनातून जीवन परिवर्तनाकडे | ३९ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट | २२ | दिव्यांगांच्या कल्याणार्थ | ४१ |
| इतिहास मीमांसा | २४ | पाऊल पडते पुढे | ४३-५५ |
| मानदंड व्यासंगाचा | २६ | मंत्रिमंडळात ठरले! | ५६-५८ |

वर्ष ७४ वे | अंक ३ | डिसेंबर २०२२

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, गणेश रामदासी
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामाची पाहणी

**दादरच्या** इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतिपथावर असून या स्मारकाचे काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारकस्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, एमएमआरडीए, महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन स्मारकाच्या कामाचा आढावा घेतला.

या वेळी मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, दिलीप लांडे, मंगेश कुडाळकर यांच्यासह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त एस. व्ही आर. श्रीनिवास, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, जिल्हाधिकारी राजीव निवतकर, शिल्पकार राम सुतार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



४.८ हेक्टर क्षेत्रफळ जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक साकारत असून या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १०९० कोटी रुपये आहे. प्रकल्पाचे प्रवेशद्वार, इमारत, व्याख्यान वर्ग, ग्रंथालय, बेसमेंटमधील वाहनतळाचे ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावलौकिकाला साजेसे स्मारक इंदू मिलच्या परिसरात उभारले जात असून त्याचे स्थापत्यकाम प्रगतिपथावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २५ फूट पुतळा प्रतिकृतीस लवकरच मान्यता देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

## स्मारकाच्या कामाला गती मिळणार

इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे भव्य स्मारक आकाराला येत आहे. या स्मारकाच्या कामाची पाहणी करून त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे. संबंधितांना आवश्यक ते निर्देश दिले असून स्मारकाचे काम वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**स्मारकाविषयी -** ● भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील पुतळ्याची उंची- पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.३८ मीटर (४५० फूट) उंची असेल. ● प्रवेशद्वार इमारतीमध्ये माहिती केंद्र, तिकीट घर, लॉकर रूम, प्रसाधनगृह, सुरक्षा काउंटर, स्मरणिका कक्ष, उपहारगृह व नियंत्रण कक्ष इत्यादी बाबींचा अंतर्भाव असेल. ● स्मारकाचे काम एकूण क्षेत्रफळ ४.८ हेक्टरजागेत सुरू असून बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ - ४६३८८ चौ.मी. आहे, तर हरित जागेचे क्षेत्र ६८ टक्के आहे.

# ज्ञानप्राप्तीची प्रेरणा !

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सर्वात मौल्यवान देणगी दिली ती म्हणजे आपली राज्यघटना. त्यांना यथार्थरीत्या 'घटनेचे शिल्पकार' असे संबोधले जाते. अतिशय सखोल अभ्यास आणि अखंड परिश्रम घेऊन बाबासाहेबांनी भारताची राज्यघटना लिहिली. या राज्यघटनेच्या मजबूत पायावर अतिशय प्रगल्भ अशी लोकशाही भारतात स्थापित झाली आणि वर्षागणिक या लोकशाहीची पाळेमुळे देशाच्या भूमीत खोलवर रुजली. राज्यघटनेने देशातील सर्वांना समान न्याय, अधिकार, हक्क, प्रगती व विकासाच्या संधी दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने त्यांना अभिवादन.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होते. ते प्रकांडपंडित होते, त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्व होते. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कृषी, कामगार, धर्म, संस्कृती या विषयांवरील त्यांचा व्यासंग दांडगा होता. सामाजिक समतेवर आधारित समाजव्यवस्थेची निर्मिती व्हावी यासाठी ते अखंड कार्यरत होते. उपेक्षितांना न्याय आणि सन्मान मिळावा, यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. मनुष्याला घडवण्यात आणि सक्षम करण्यात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व त्यांनी जाणले होते. त्यामुळेच 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा,' अशी शिकवण त्यांनी सर्व उपेक्षित समाजघटकांना देऊन ज्ञानप्राप्तीची प्रेरणा दिली. या प्रेरणेची शक्ती घेऊन कोट्यवधी समाजबांधव आज शिक्षण घेऊन सक्षम आणि समर्थ होत आहेत.

भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक समता नांदावी, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा ध्यास होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांच्या पायावरच यशस्वी लोकशाहीचा डोलारा उभा राहू शकेल, यावर त्यांचा ठाम विश्वास होता आणि त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वाहून घेतले होते. भारतातील पीडित, शोषित आणि वंचितांच्या मूक वेदनांना अस्मिता प्राप्त करून देणारा द्रष्टा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी नागपूर येथे लाखो अनुयायांच्या समवेत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि उपेक्षितांच्या विकासाचे एक अभिमानास्पद पर्व भारतात सुरू झाले. धर्मांतराची ही घटना उपेक्षितांच्या अस्मितेचे स्फुल्लिंग चेतवणारी तर होतीच; पण त्यांच्या राष्ट्रप्रेमाचेही ते एक अजोड उदाहरण ठरले.

बाबासाहेबांची पत्रकारिता, लेखन अशा विविधांगी पैलूंवर आधारित विशेष लेख 'लोकराज्य'च्या या अंकामधून आम्ही प्रकाशित करत आहोत. हे अभ्यासपूर्ण लेख राज्यातील मान्यवर लेखक, संशोधक, अभ्यासक यांनी लिहिले आहेत. बाबासाहेबांचे श्रेष्ठत्व आणि त्यांचे चौफेर व्यक्तिमत्त्व जाणून, समजून घेण्यासाठी हे लेख साहाय्यभूत ठरतील.

या विशेषांकात समाविष्ट करण्यात आलेल्या मान्यवरांच्या लेखांतून बाबासाहेबांचे विचार आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू लोकांसमोर येतील. विशेषतः त्यांच्या जीवनातील विविध क्षणांचे दर्शन या लेखांमधून घडणार आहे. या विशेषांकासाठी लेख व अन्य संदर्भ उपलब्ध करून देणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण करत असलेली ही आदरांजली दीर्घकाळ लोकांच्या स्मरणात राहावी, असा प्रयत्न आम्ही केला आहे. या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवरील लेखांबरोबरच महत्त्वाच्या घडामोडी, मंत्रिमंडळात ठरले या सदरांचा समावेश आहे. आमचा हा छोटासा प्रयत्न सर्वांना आवडेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

**गुलामी ही काय केवळ भारतातच होती असे नाही. जगाच्या पाठीवरील अनेक देशात ती होती. त्यामुळे त्या त्या देशातल्या शासकांनी गुलामांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपापल्या राज्यघटनेच्या आराखड्यात काय तरतुदी केल्या, याचा शोध घेणे बाबासाहेबांना आवश्यक वाटू लागले. त्यांच्या या प्रयत्नास अभूतपूर्व यश मिळाले. उच्च न्यायालयाच्या फूटपाथवर त्यांना अशा राज्यघटनाचा संच मिळाला. तो दिनांक होता १ ऑगस्ट १९२८.**

# संविधान लेखकाचा उदय

**दत्ता भगत**

भारतीय संविधानाच्या मसुद्याचे तिसरे वाचन १७ नोव्हेंबर १९४८ रोजी सुरू होणार होते. पण त्या आधी म्हणजे ५ नोव्हेंबर १९४८ रोजी मसुदा समितीचे एक सदस्य टी. टी. कृष्णम्माचारी यांनी सभागृहात एक निवेदन दिले आणि डॉ. बाबासाहेबांच्या मसुदा लेखनाविषयी अतिशय कृतज्ञताभावाने त्यांनी बाबासाहेबांची प्रशंसा केली ते म्हणाले, 'राज्यघटनेचा मसुदा तयार करणारे सदस्य अवघे सात होते. पण सात जणांच्या मसुदा समितीतील एका सदस्याने राजीनामा दिला. एकाचे निधन झाले. त्यापैकी एक सदस्य दीर्घकाळ वास्तव्यासाठी अमेरिकेत होते. त्यामुळे ते बैठकांना उपस्थित राहू शकत नसत. एक सदस्य राज्याच्या कारभारात इतके व्यस्त होते की, त्यांना बैठकांना उपस्थित राहण्यासाठी फुरसतच मिळत नसे. दोघेजण सतत आजारी असत त्यामुळे ते बैठकींना उपस्थित राहण्यास असमर्थ असत. अशा अवस्थेत संहिता लेखनाची जबाबदारी एकट्या बाबासाहेबांवर पडली.' टी. टी. कृष्णम्माचारी यांनी कथन केलेली ही वस्तुस्थिती औपचारिक नव्हती.



## बाबासाहेबांचे द्रष्टेपण

राज्यघटनेच्या समितीची दोन वाचने पूर्ण झाली होती. त्यामुळे प्रत्येक कलमावर चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती काळजीपूर्वक आणि दूरदृष्टी ठेवून लेखन केले होते याचा अनुभव घटना समितीचे सदस्य घेत होते. घटना समितीतले काही सदस्य मुळात बाबासाहेबांवर ही जबाबदारी सोपवण्यात आली होती, त्याविषयी असहमत होते. बाबासाहेब लोकनेते होते. त्यामुळे त्यांनी पूर्वग्रहदूषित होऊन टीका करणाऱ्या जनतेतल्या विद्वानांच्या पूर्वग्रहाचे निराकरण अत्यंत कौशल्याने केले होते. या सर्व गोष्टींची टी. टी. कृष्णम्माचारी यांना पुरेशी कल्पना होती. समितीचे एक सदस्य डी. पी. खेतान यांच्या निधनानंतर कृष्णम्माचारी यांची मसुदा समितीत नियुक्ती झाली होती. त्यामुळे त्यांचे सर्व निवेदन अनुभवनिष्ठ होते. पुढे ते म्हणाले, 'आपल्या राष्ट्राने बाबासाहेबांच्या या कर्तृत्वाबद्दल कायम कृतज्ञ राहिले पाहिजे. घटनेचा मसुदा पुरेसा दीर्घ आहे. त्यात २४० कलमे व १२ परिशिष्ट्ये आहेत आणि हे काम त्यांनी दोन वर्ष ११ महिने आणि १७ दिवसांत लिहून पूर्ण केले आहे.' कृष्णम्माचारी यांचे हे उद्‌गार माध्यमांनी ठळक अक्षरात प्रसिद्ध केले आहेत. धनंजय कीर यांच्या मराठी चरित्रात हा तपशील आलेला आहे. असे असले तरी बाबासाहेबांच्या दोन दशकांपासून केलेल्या चिंतनाची आणि अभ्यासाची उकल मात्र या उद्‌गारातून पुरेशी होत नाही.

हा मसुदा अतिशय तांत्रिक परिभाषेत आहे. पारायणे करून प्रत्येक कलमामागील देश, परिस्थिती आणि कलमांचे उद्दिष्ट आणि त्यातून व्यक्त होणारे डॉ. बाबासाहेबांचे द्रष्टेपण लक्षात येणे अशक्य आहे. त्यासाठी प्रत्येक कलमाच्या वाचनानंतर त्या कलमाविषयीचे निरुपण होणे आवश्यक आहे. त्यापैकी लेखनकाराविषयी आजच्या वाचकांना परिचय करून द्यावा, एवढाच या लेखाचा मर्यादित हेतू आहे.

## नेहरू रिपोर्ट

२ फेब्रुवारी १९२८ रोजी ब्रिटिश संसदेने

नेमलेले सायमन कमिशन भारतात आले. महाडचा समता संगर संपला होता. पण महाडचे तळे सार्वजनिक की खासगी असा न्यायालयीन लढा सुरू झाला होता. बाबासाहेब स्वतःच बॅरिस्टर असल्यामुळे या लढाईत ते वकील म्हणून गुंतले होते. ही लढाई पुढे दीर्घकाळ चालू राहिली.

सायमन कमिशन हे उद्या सत्तांतर घडायचेच असेल, तर सत्ता कोणाला सोपवावी त्यासाठी उद्याच्या या राष्ट्राच्या राज्यघटनेचा आराखडा कसा असावा, यावर अनेक शिष्टमंडळाच्या भेटीगाठी घेऊन अहवाल तयार करणार होते. त्याच अहवालाच्या अभ्यासानंतर ब्रिटिश संसद पुढील पावले उचलणार होती. काँग्रेस पक्षाला म्हणूनच सायमन कमिशन अत्यंत महत्त्वाचे वाटत होते. म्हणून काँग्रेस पक्षाने सर्वपक्षीय परिषदेचे आयोजन केले त्या परिषदेत मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन्स इत्यादी गटाच्या प्रतिनिधींना निमंत्रणे देण्यात आली होती. इतकेच नाही तर ब्राम्हणेतरांची संघटना आणि द्रविड संघटनांच्या प्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात आले होते. या सर्व घटकांशी चर्चा करून एक अहवाल तयार करण्याची जबाबदारी पंडित मोतीलाल नेहरू यांच्यावर सोपवण्यात आली होती. हाच अहवाल पुढे नेहरू रिपोर्ट म्हणून ओळखला गेला. या सर्व कार्यवाहीत उपेक्षितांच्या संघटनांचा मात्र विचार केला गेला नव्हता. ना बाबासाहेबांच्या संघटनेला निमंत्रण होते ना भारताच्या कोणत्याही संघटनेला बोलवले होते. सारांश उद्या सत्तांतर घडलेच तर राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठी उपेक्षितांचा वेगळा विचार करावा, असे कोणालाही वाटत नव्हते.

## सत्कार समारंभास जायचे नाकारले

काँग्रेस पक्ष हा स्वतःहून उपेक्षितांच्या हिताचा विचार करणार होता. ही सर्व परिस्थिती अत्यंत गंभीर होती. गुलामांचा लढा त्यांच्या वतीने गुलामांचे मालक लढतील, असा इतिहाससिद्ध दाखला जगात उपलब्ध नव्हता. मुळात येथील बहिष्कृत जनता ब्रिटिशांची गुलाम तर आहेच; पण त्याआधी ती हिंदू धर्मांची गुलाम आहे, हा फरक काँग्रेस पक्ष लक्षात घ्यायला तयार नव्हता आणि ब्रिटिश सिनेटर्सना हा फरक कळत नव्हता. त्यामुळे बाबासाहेबांवर एकाच वेळी दोन पातळ्यांवर लढण्याची जबाबदारी येऊन पडली होती.



पहिली पातळी म्हणजे ऐतद्देशीय हिंदूंना, तेच गुलामी लादणारे घटक आहेत, हे लक्षात आणून देणे आणि दुसरी पातळी म्हणजे केवळ कायदे केले की, आपली जबाबदारी संपली, अशा संभ्रमात असलेल्या ब्रिटिश संसदेला बहिष्कृतांच्या गुलामीला आजचे ब्रिटिश प्रशासन कसे जबाबदार आहे हे समजावून सांगणे. महाडच्या समता संगरामुळे पहिल्या पातळीवरच्या लढाईने हिंदूंना तेच कसे शोषण करते आहेत, हे लक्षात आणून दिले होते. आता दुसऱ्या पातळीवरच्या लढाईसाठी सायमन समोर आणलेला अहवाल सादर करणे अत्यावश्यक होते. त्यामुळेच सायमन समितीसमोर देण्यासाठी त्यांनी अभ्यासपूर्ण निवेदन तयार केले. नाशिककरांनी त्यांना सत्कारासाठी निमंत्रित केले होते. पण बाबासाहेबांनी भाऊराव गायकवाड यांना पत्र पाठवून सत्कारापेक्षा हा अहवाल सादर करणे किती महत्त्वाचे आहे. हे सांगून सत्कार समारंभास जायचे नाकारले होते. सहा कोटी बहिष्कृत यांना अधिकृत प्रतिनिधित्व मिळवून दिले, तर मुस्लिमांचा या तिसऱ्या वाटेकऱ्याबद्दल रोष ओढवणार हे बाबासाहेबांना दिसत होते. महाडमुळे हिंदू विरोधात गेले आता मुस्लीमही विरोधात जाणार आणि त्या पेचामुळे ब्रिटिश प्रशासन अडचणीत येणार हे सर्व बाबासाहेबांना लक्षात येत होते. पण एकाकी लढा देण्याशिवाय अन्य पर्यायही त्यांच्यासमोर नव्हता.

## पुस्तके विकत घेतली

गुलामी ही काय केवळ भारतातच होती असे नाही. जगाच्या पातळीवरील अनेक देशात ती होती. त्यामुळे त्या त्या देशातल्या शासकांनी गुलामांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपापल्या राज्यघटनेच्या आराखड्यात काय तरतुदी केल्या याचा शोध घेणे बाबासाहेबांना आवश्यक वाटू लागले. त्यांच्या या प्रयत्नास अभूतपूर्व यश मिळाले. उच्च न्यायालयाच्या फूटपाथवर त्यांना अशा राज्यघटनाचा संच मिळाला. तो दिनांक होता १ ऑगस्ट १९२८. या खंडांचा अभ्यास सुरू केला. नेहरू रिपोर्टविरुद्ध लढायचे पण अभ्यासाचे शस्त्र वापरून, असा निर्णय त्यांनी घेतला. थोडक्यात काय तर आजची जी अभूतपूर्व घटना अवघ्या तीन वर्षांत लिहिली असं सगळेजण गौरवाने म्हणतात त्याचा आरंभ १९२८ साली झाला.

## समितीमधील सदस्य प्रभावित

आपल्या राज्यघटनेला सुमारे दोन

## गोलमेज परिषदेत संधी

आजचा भारत ब्रिटिशांच्या काळातच राजकीयदृष्ट्या दोन प्रदेशात विभागलेला होता. एक होता ब्रिटिश सत्तेचा प्रदेश, तर दुसरा होता सुमारे ५००-६०० संस्थानांचा राजकीय प्रदेश. सत्तांतर होताना ब्रिटिश प्रदेश कुणाच्या ताब्यात द्यायचा आणि संस्थानिकांना त्यांचे राज्य पूर्ववत स्वतंत्र करायचे की, या दोन्ही प्रदेशाचा भूगोल सहमतीने एकत्र करून कुठल्यातरी राजकीय पक्षाला द्यायचा? कारण हे राजे महाराजे ब्रिटिशांचेच मांडलिक होते आणि गेल्या ७० ते ८० वर्षांपासून त्यांचे संरक्षण करण्याची ब्रिटिशांनीच हमी घेतली होती. आजच्या भाषेत सांगायचे, तर संस्थानांचे विलीनीकरण कसे करायचे आणि विलीनीकरणाला सहमती झालीच, तर त्यांच्या प्रतिनिधित्वाचे काय करायचे असे ते दोन प्रश्न होते. हे दोन्ही प्रश्न राष्ट्रीय होते दोन्ही भूगोल एकत्र एकत्रित स्वरूपात राजकीयदृष्ट्या एकत्रित करायचे ठरलेच तर सर्वसंमत प्रतिनिधित्व निर्माण करणे आवश्यक होते. हा प्रश्न बहिष्कृतांशी संबंधित नव्हता, तर सत्तांतरासाठी निर्माण करायच्या राष्ट्राचा होता. अशा या राष्ट्रीय प्रश्नाबाबत बाबासाहेब तटस्थ राहिले नाहीत.

दशकांच्या अभ्यासाचे आणि चिंतनाचे पाठबळ आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे. सायमन कमिशनसमोर साक्ष तर दिलीच, पण स्वतःची एक वेगळी मतपत्रिका ही जोडली. त्याचाच परिणाम म्हणून १९३० च्या गोलमेज परिषदेचे निमंत्रण बाबासाहेबांना मिळाले. तोपर्यंत बाबासाहेबांचा कुठलाही राजकीय पक्ष नव्हता की, बहिष्कृतांची कुठलीही राजकीय संघटना नव्हती. गोलमेज परिषद सुरू झाली. अवघ्या काही दिवसांतच १२ नोव्हेंबर १९३० रोजी बाबासाहेबांना गोलमेज परिषदेत भाषण करण्याची संधी मिळाली. त्या वेळी बाबासाहेबांसमोर दोन प्रश्न होते. पहिला प्रश्न होता भारतीय बहिष्कृत हे हिंदूपेक्षा वेगळे आहेत, युरोपातल्या कोणत्याही देशाएवढी त्यांची लोकसंख्या आहे. त्यामुळे त्यांना राजकीय ओळख मिळवून देणे आणि सत्तांतराच्या लढाईत त्यांचे राजकीय स्थान निश्चित करणे हे त्यांच्या भाषणाचे सूत्र होते. या पहिल्याच भाषणाने संसदेतल्या आणि समितीमधील सदस्य एवढे प्रभावित झाले की बहिष्कृतांना 'मायनॉरिटी' म्हणून विचारात घ्यायचे हे स्वतः पंतप्रधान मॅक्डोनल्ड हेही अनुकूल झाले. पण त्याच वेळी बाबासाहेबांसमोर दुसरा प्रश्न होता. त्याकडे मात्र बाबासाहेबांच्या चरित्रकाराचे दुर्लक्ष झाले पत्रकारांना मात्र बाबासाहेबांनी दुसऱ्याही प्रश्नाला हात घातला हे पाहून आश्चर्य वाटले. कोणता होता तो दुसरा प्रश्न?



नेहरू रिपोर्टवर काँग्रेस पक्षाचेच मतैक्य झाले नव्हते. सायमन कमिशनमध्ये एकही भारतीय प्रतिनिधी नाही, हे निमित्त पुढे करून काँग्रेस पक्षाने सायमन कमिशनवर बहिष्कार घातला. खरे तर ती समिती ब्रिटिश संसदेच्या खासदारांची होती. त्या समितीत भारतीय प्रतिनिधी कसा नेमला जाईल. पण बहिष्कार घालणाऱ्या सामान्य जनतेला हा फरक लक्षात येत नव्हता. नेहरू, गांधीजींना अटक केली. त्याच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाने गोलमेज परिषदेवर बहिष्कार घातला.

## बाबासाहेबांचा राष्ट्रीय बाणा

बहिष्कृतांचा प्रश्न काँग्रेस पक्ष सोडवणे शक्य नाही हे तर त्यांनी आधीच ओळखले होते. पण ब्रिटिश प्रशासनसुद्धा बहिष्कृतांचा प्रश्न सोडवू शकणार नाही, तो प्रश्न आपण आपलीच सत्ता मिळवली तर सोडवता येणार आहे. या निर्णयाला बाबासाहेब आधीच तयार होते. गोलमेज परिषदेला निघण्याआधी नागपूर येथे झालेल्या सत्कार समारंभात ही भूमिका बाबासाहेबांनी फारच स्पष्ट शब्दात मांडली होती. एवढेच नाही, तर आपल्याला या भूमिकेच्या निवेदनाच्या लेखी प्रतीही सर्वत्र वाटल्या होत्या. याचा अर्थ असा की, बहिष्कृतांचा प्रश्न केवळ बहिष्कृतांचा नाही तो एक राष्ट्रीय प्रश्न आहे, म्हणून उद्याचे राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर आपणच आपला राज्यघटनेचा आराखडा कसा तयार करावा, याचे चिंतन त्यांच्या मनात सुरू झालेले होते. तेव्हा आजची जी राज्यघटना आहे. तिचा आराखडा बाबासाहेबांच्या मनात १९३० सालीच तयार झाला होता. फरक एवढाच की, त्या राज्यघटनेचा मसुदा उद्या आपल्याला तयार करावा लागेल हा तर्क मात्र त्या वेळी त्यांनी केला नव्हता. बाबासाहेबांच्या चरित्रात हे ठिकाण एकाच वेळी बहिष्कृतांचा राजकीय नेता म्हणून ओळख मिळवून देणारे ठिकाण आहे. तसेच ते उद्याच्या भारत नावाच्या देशाला स्वातंत्र्य चळवळीचे एक उगवते नायक आहेत हे सिद्ध करणारे हे ठिकाण आहे. आतापर्यंत महात्मा गांधी आणि बाबासाहेबांची ओळख झाली नव्हती. पण महात्मा गांधींनाही बाबासाहेबांची भेट घेणे आवश्यक वाटू लागले तो बाबासाहेबांचा गोलमेज परिषदेतला सहभाग वाचून. वृत्तपत्राच्या बातम्या वाचून आणि अन्य संवाद माध्यमातून महात्मा गांधींनी स्वतःच बाबासाहेबांना भेटण्याची इच्छा प्रकट केली आणि ८ ऑगस्ट १९३१ रोजी त्यांना तशी चिठ्ठी पाठवली. पुढे १४ ऑगस्ट १९३१ रोजी महात्मा गांधी आणि बाबासाहेब यांची ती प्रसिद्ध पहिली भेट मणीभवन येथे झाली.

(लेखक हे ज्येष्ठ नाटककार,
साहित्यिक व व्याख्याते आहेत.)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रवादाचा पाया हे लोकशाहीला मानतात. त्यांनी लोकशाहीची व्यापक संकल्पना मांडली आहे. स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या तत्त्वांनी लोकशाहीला भक्कम रूपबंध प्राप्त झाला आहे. राष्ट्रवाद या भावनेत प्रचंड सामर्थ्य आहे. आधुनिक भारताचे प्रभावी शिल्पकार म्हणून ही त्यांची नाममुद्रा भारतीय संसदीय लोकशाहीच्या संघटनात्मक लोकशाहीच्या सोनेरी पानावर मुद्रित झालेली आहे.**

# डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद

**डॉ. प्रदीप आगलावे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या देशाबद्दल सार्थ अभिमान होता. म्हणून 'मी कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा आहे.' असे म्हणण्यापेक्षा, 'मी भारतीय आहे' असे म्हणणे त्यांना संयुक्तिक वाटत होते. म्हणून त्यांना धर्मापेक्षा राष्ट्र महान वाटायचे.



## धर्मापेक्षा राष्ट्र महान

त्यांनी धर्मापेक्षा देशाला विशेष महत्त्व दिले होते. देशात विविध धर्मांचे लोक असतात, जर प्रत्येकाने आपापला धर्म श्रेष्ठ आहे, असे म्हटले तर वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांमध्ये संघर्ष होईल. देशात शांतता नांदणार नाही. देश हा कोणत्याही धर्माचा किंवा समाजाचा नसतो. भारताचा विचार केल्यास येथे हिंदू, बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चन, जैन या सर्वच धर्मांचे लोक आहेत. प्रत्येक धर्माच्या लोकांनी माझा धर्म महान म्हटले, तर देशात यादवी निर्माण होईल आणि राष्ट्राच्या एकतेवर आघात होईल.

राष्ट्रातील लोकांमध्ये धर्माभिमान निर्माण होण्याएवजी राष्ट्राभिमान निर्माण होणे आवश्यक आहे. अन्यथा 'राष्ट्र' या संकल्पनेला तडा जाईल. ही गोष्ट लक्षात घेऊन जात, धर्म, वंश इत्यादी आधारावर नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेद करण्यात येऊ नये. अशा प्रकारची तरतूद डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत केली. संकुचित अशा धार्मिक भावनामुळे धर्मांधता निर्माण होऊन राष्ट्रीय विकासामध्ये अवरोध निर्माण होतो. ही गोष्ट डॉ. आंबेडकरांनी ओळखली होती.

## राष्ट्रीयत्वाची भावना

देशात राष्ट्रीय एकता निर्माण करण्याची आवश्यकता डॉ. आंबेडकरांनी वारंवार प्रतिपादन केली होती. इतकेच नव्हे, तर कशा पद्धतीने राष्ट्रीय एकता निर्माण करता येईल, याबद्दल अतिशय मौलिक विचार देखील मांडले होते. १९२८ मध्ये भारतीय संवैधानिक आयोग अर्थात सायमन आयोगाला त्यांनी आपला स्वतंत्र अहवाल सादर केला होता. त्या अहवालामध्ये ते स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, आज काळाची ही महत्त्वाची गरज आहे की, लोकांच्या मनामध्ये एक सामान्य राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली पाहिजे. ही भावना अशी नसेल की ते प्रथम भारतीय आहेत आणि नंतर ते हिंदू, मुसलमान, सिंधी किंवा कन्नड आहेत, तर ती भावना ही असेल की, ते मूळात भारतीय आहेत आणि शेवटीदेखील ते भारतीयच आहेत.

डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, लोकांमध्ये आपण सर्व भारतीय आहोत ही

भावना विकसित केली पाहिजे. मला हे आवडत नाही की, जसे काही लोक म्हणतात की, आम्ही हिंदू किंवा मुसलमान आधी आणि भारतीय 'नंतर' मी या गोष्टीशी सहमत नाही. मला नाही वाटत की, भारतीयांच्या रूपात आमची निष्ठा कोणत्याही प्रकारे कोणत्या प्रतियोगी निष्ठेमुळे प्रभावित व्हावी, मग तो आमचा धर्म असो, आमची संकृती असो किंवा आमची भाषा असो. मला वाटते की, सर्व लोक प्रथम भारतीय आणि शेवटीदेखील भारतीयच भारतीयत्वाशिवाय आणखी काहीही असता कामा नये.

## इहवादी राष्ट्र

राष्ट्रीय भावनेपेक्षा धार्मिक भावना प्रबळ असणे राष्ट्राला घातक असते. याची डॉ. आंबेडकरांना पूर्ण जाणीव होती. म्हणून त्यांचा सामाजिक मानवतावाद हा इहवादी आहे. राष्ट्र हे धर्मावर आधारित असणे ही गोष्ट लोकशाहीत बाधा निर्माण करणारी आहे. म्हणून भारत राष्ट्र हे इहवादी असावे, असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. राष्ट्रातील लोकांनी इहवादी विचार केला तरच राष्ट्रीय भावना विकसित होऊन देशाची प्रगती होऊ शकेल, असा त्यांचा विश्वास होता.

भारत हा 'सेक्युलर' (Secular) देश आहे. भारतीय राज्यघटनेने 'सेक्युलर'चा पुरस्कार केला आहे. राज्यघटनेच्या कलम नं. २५१(२) मध्ये 'सेक्युलर' शब्दाचा अंतर्भाव आहे. राज्याचा कोणताही धर्म नाही. १९७६ मध्ये ४२वी घटना दुरुस्ती करून घटनेच्या उद्देशपत्रिकेत 'सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य' असा बदल करण्यात आला.

'सेक्युलर' या शब्दाचा अर्थ 'लौकिक' किंवा 'इहवाद' असा आहे. आपल्या राज्यघटनेने धार्मिक दृष्टिकोन न स्वीकारता 'इहवादी दृष्टिकोन' स्वीकारला आहे. 'सेक्यूलर'चा धर्मनिरपेक्ष हा ध्वनित अर्थ आहे. कोणत्याही धर्माचा विचार न करता 'इहवादी' किंवा लौकिकवादी विचारांनुसार राज्याने आपली कृती करावी.

भारताचा कोणताही धर्म नाही. मानवी दृष्टिकोनातून राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाचा विचार विकसित व्हायला पाहिजे. जनता आणि राष्ट्राच्या विकासामध्ये कोणत्याही प्रकारची धार्मिक कृती किंवा धार्मिक हस्तक्षेप मान्य नाही, असे असताना 'सर्वधर्मसमभाव' असा सेक्युलर किंवा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ लावणे म्हणजे 'सेक्युलर' या तत्त्वाचा विपर्यास करणे होय.

जातीच्या आधारावर राष्ट्राची बांधणी होऊ शकत नाही. कारण जातिव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा पूर्णता अभाव आहे.

डॉ. आंबेडकरांनी धर्मावर आधारित असलेल्या शोषणाचा विरोध केला. जातिव्यवस्था ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांचा अर्थात लोकशाही मूल्यांचा विरोध करते. त्यामुळे जातिव्यवस्था ही राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊ देत नाही. तसेच राष्ट्राच्या विकासामध्ये अडथळा निर्माण करते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले की, जातीच्या पायावर तुम्ही काहीही उभारू शकत नाही. तुम्ही राष्ट्राची उभारणी करू शकत नाही. तुम्ही नीतिमत्तेची उभारणी करू शकत नाही. जातीच्या पायावर तुम्ही जे म्हणून बांधाल ते कोसळून पडेल आणि ते कधीही एकसंध होणार नाही. जातीच्या आधारावर राष्ट्राची बांधणी होऊ शकत नाही. कारण जातिव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा पूर्णता अभाव आहे. अशा वेळी जातिव्यवस्था असलेल्या देशात एकसंध समाज निर्माण होणे अशक्य आहे.

## राष्ट्रीयत्वाचा अर्थ

राष्ट्रीयत्वाचा अर्थ कोणता? राष्ट्रीयत्व नेमके असते तरी काय? याचा विचार करून डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीयत्वाची व्याख्या दिली. ते म्हणतात की, राष्ट्रीयत्व ही सामाजिक भावना होय. ही सामाजिक चैतन्यरूपी एकत्वाची भावना आहे. ज्यामध्ये व्यक्तींना परस्पर आप्त इष्ट वाटू लागतात. यावरून हे स्पष्ट होते की, राष्ट्रीयत्वाची भावना ही सामाजिक भावना आहे. सामाजिक एकत्वाची भावना ही लोकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. ही भावना निर्माण झाल्याशिवाय राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राष्ट्रवाद ही व्यापक विचारसरणी आहे.

जातिव्यवस्था ही राष्ट्रीयत्वामधील एक फार मोठी बाधा आहे. तसेच त्यामुळे

### मानवतावादावर राष्ट्राची निर्मिती

डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय प्रवाहात धर्माला महत्त्व दिले नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवतावादी तत्त्वांवर राष्ट्राची उभारणी झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. म्हणून त्यांनी भारतीय राज्यघटनेत मानवतावादी मूल्यांना विशेष महत्त्व दिले असल्याचे आढळून येते. त्यांना आदर्श समाजाची निर्मिती स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर अपेक्षित होती.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, माझा आदर्श समाज हा स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता यावर आधारलेला राहील. आदर्श समाज गतिमान असावा. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, दुसऱ्या शब्दात, सामाजिक एकसूत्रीकरण झाले पाहिजे हीच खरी बंधुता आहे. बंधुता हेच लोकशाहीचे दुसरे नाव होय. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नाही, तर प्रामुख्याने परस्परांचे अनुभव परस्परांना देऊन आणि घेऊन संघबद्ध राहण्याची, सहजीवनाची ती एक पद्धती आहे. आपल्या लोकांसोबत आदर आणि सन्मानाची वृत्ती निर्माण करणारी ती एक अनिवार्य अशी पद्धत आहे.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी देशातील लोकांमध्ये बंधुता असणे अनिवार्य मानले आहे. कारण बंधुतेशिवाय लोकशाही अस्तित्वात राहू शकत नाही. जर देशात जाणीवपूर्वक धार्मिक, सामाजिक दंगे घडवून आणले जात असतील दलित, आदिवासी, अल्पसंख्याक लोकांवर अन्याय होत असेल, तर देशात बंधुता निर्माण होऊ शकणार नाही. देशाची अखंडता, एकता आणि लोकशाहीवर आघात होईल.

राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही. ही बाब लक्षात घेऊन संविधान सभेतील २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात डॉ. आंबेडकर अतिशय निसंदिग्धपणे म्हणतात की, माझी अशी मान्यता आहे की, भारत एक राष्ट्र आहे, असा विश्वास आपल्या मनात बाळगून आम्ही स्वतःला एका मोठ्या भ्रमात ठेवत आहोत. हजारो जातीत विभाजित जनता एक राष्ट्र कसे होऊ शकते? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही. याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल. अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते, त्यापेक्षा भारतात अधिक कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नव्हती. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. कारण जाती जातींमध्ये मत्सर आणि द्वेषभावना निर्माण करतात. परंतु जर आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडचणींवर आम्ही मात केलीच पाहिजे. कारण बंधुता तेव्हाच सत्य स्वरूपात येईल, जेव्हा आम्ही एक राष्ट्र होणार! बंधुतेशिवाय समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरासारखा बाह्य देखावा असेल.

भारताच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय पार्श्वभूमीचा डॉ. आंबेडकरांनी सखोल अभ्यास केला होता. जातिव्यवस्थेमुळे भारतात जाती-जाणीव आहे. परंतु त्यांच्यात राष्ट्रीय जाणिवेचा अभाव आहे. प्रत्येक जात ही स्वतः एक राष्ट्र आहे. म्हणून डॉ. आंबेडकर स्पष्टपणे म्हणतात की, आपण एक राष्ट्र नाही. जर ही वास्तविकता जाणून लक्षात घेतली तरच त्यावर उपाय शोधणे शक्य होईल.

डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रवादाच्या संदर्भात व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते, स्वनिर्णयाचा सिद्धान्त समान आदर्श आणि समान उद्दिष्ट असणाऱ्या लोकांची इच्छा व्यक्त करतो, ज्यावर बाह्य दबाव नाही. ज्यांचा राजकीय दर्जा हा स्वतंत्र, आंतरसंबंधित किंवा जगातील अन्य संघाशी मिळूनदेखील असू शकेल, याला राष्ट्रवाद असे म्हणतात.

२७ मे १९५३ रोजी डॉ. आंबेडकरांनी राष्ट्राच्या प्रगती संदर्भात इशारा दिला होता की, जातीविरहित आणि वर्गविरहित समाज निर्माण केल्याशिवाय देशाची प्रगती होऊ



शकणार नाही. जातीयतेची मानसिकता ही राष्ट्राच्या विकासाच्या आड येते. ही गोष्ट डॉ. आंबेडकरांनी ओळखली होती. त्यामुळे जातिव्यवस्थेला विरोध करून ही व्यवस्था कशी नष्ट करता येईल. या संदर्भात त्यांनी विशेष प्रयत्न केले. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी इहवादाचा विचार मांडला आणि मानवतावादी मूल्ये भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून रुजवण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे व एकसंध राष्ट्रीय हित पाहणारे नेते.

देशात राष्ट्रवाद निर्माण करण्याच्या दृष्टिने डॉ. आंबेडकरांनी धार्मिक गुलामगिरी विरुद्ध बंड पुकारले होते. जो धर्म काही माणसांना गुलामीत जखडून ठेवतो. तो धर्म आहे काय? अशा प्रकारचा धर्म मानवाच्या आणि राष्ट्राच्या विकासामधील फार मोठा अडथळा आहे. अशा प्रकारच्या धार्मिक गुलामीच्या मानसिकतेत व्यक्तित्वाचा विकास होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, दैववाद इत्यादी धार्मिक कल्पना अमान्य केल्या आहेत. या सर्व कल्पना केवळ शोषणाची साधने आहेत. या कल्पनेवर आधारलेला धर्म हा मानवताविरोधी आहे. त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या आड कोणताही धर्म येणार नाही, याची दक्षता घेतली होती. म्हणून त्यांनी राष्ट्राच्या संदर्भात इहवादाचा स्वीकार केला होता. इहवादामध्ये कोणत्याही धर्माचा विचार केला जात नाही, तर मानवतेच्या दृष्टीने जे अयोग्य असेल त्या गोष्टींना टाळले जाते. तसेच ज्या गोष्टी मानवतेच्या दृष्टीने योग्य आहेत. अशा गोष्टींचा स्वीकार केला जातो.

थोडक्यात, डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा इहवाद आणि मानवतावादाच्या मूल्यांवर आधारलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या या राष्ट्रवादाच्या अधारावर या देशातील विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय समस्या सोडवता येईल. या देशाला २१व्या शतकातील आव्हाने स्वीकारण्याकरिता सामर्थ्यशाली बनवता येईल.

**(लेखक हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, सदस्य सचिव आहेत.)**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अवघे जीवनचरित्र म्हणजे सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेच्या तसेच मानवी मूल्ये व मानवी हक्क यांच्या प्रस्थापनेसाठी केलेली अखंड क्रांतिकारक झुंज होय. डॉ. आंबेडकरांचे झंझावाती जीवन चरित्र व क्रांतिकारक चळवळ एक कुतूहलाचा विषय आहे. त्यांचे जीवन, कार्य आणि विचार यांची सबंध २०व्या शतकावर खोल मुद्रा उमटलेली आहे.**

# चरित्र आणि विचारधन

**विवेक सौताडेकर**

भारतीय समाजातील वंचित, उपेक्षित, निराश्रितांच्या माणूसपणाची जाणीव इतरांना करून देण्यासाठी आणि त्यांना माणूसपणाचे हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हा मोठा जीवन संघर्ष केला. मूलभूत अधिकारापासून वंचित असलेल्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी चळवळी केल्या. तसेच त्यांनी दिलेली विचारधन हे विश्वकल्याणासाठी अत्यंत उपयुक्त आहे. 'उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे', हे लोककवी वामन कर्डकांचे उद्गार महत्त्वाचे आहेत.



## सुरुवातीचे जीवन आणि बालपण

भीमराव आंबेडकरांचा जन्म सुभेदार रामजी सकपाळ आणि भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी 'महू' (मध्य प्रदेश) या ठिकाणच्या लष्करी छावणीत झाला. त्यांचे वडील शिकलेले व सुसंस्कृत होते. ते धार्मिकवृत्तीचे होते. कबीर पंथाचा त्यांच्या मनावर सखोल प्रभाव होता. सेवानिवृत्तीनंतर ते दापोलीला आले. तिथे त्यांनी आनंद व भीमराव या आपल्या मुलांना शाळेत घातले. त्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील 'आंबेवडे' या गावचे. त्यामुळेच रामजी सकपाळ हे रामजी 'आंबेवडेकर' झाले आणि त्यामुळेच भीमरावाचे नाव 'आंबेवडेकर' लावण्यात आले. या शाळेतून हे इंग्रजी चौथी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना संस्कृत हा विषय घ्यायचा होता. पण अस्पृश्याचा मुलगा म्हणून त्यांना तो घेता आला नाही. त्याऐवजी त्यांनी पर्शियन भाषेचा अभ्यास केला. शाळेत असताना त्यांना अस्पृश्य म्हणून खूप यातना सहन कराव्या लागल्या. शाळेत आंबेडकर नावाचे ब्राह्मण शिक्षक होते. त्यांनी भीमाचे 'आंबेवडेकर' हे नाव बदलून 'आंबेडकर' हे आपले नाव या मुलाला दिले. शाळेच्या दप्तरी त्यांची नोंद झाली. तेव्हापासून ते 'आंबेडकर' या नावाने ओळखले जाऊ लागले. रामजी मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईला आले. तेथील मराठा हायस्कूलमध्ये भीमरावांना दाखल केले. नंतर त्यांना एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल केले. १९०७ साली ते मॅट्रिक झाले. भीमरावांच्या रूपाने अस्पृश्य समाजातील पहिला विद्यार्थी मॅट्रिक पास झाला होता. त्यामुळे भीमरावांचा सत्कार करण्यात आला. लोकहितवादी सीताराम बोले हे अध्यक्षस्थानी होते. या वेळी विशेष उपस्थिती असणारे गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी स्वतः लिहिलेले 'गौतम बुद्धांचे चरित्र भेट म्हणून भीमरावांना दिले. या पुस्तकामुळे भीमरावांच्या जीवनाची दिशाच बदलून टाकली. याचा उल्लेख त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत अतिशय आदराने केला आहे. मॅट्रिक झाले त्याच वर्षी त्यांचा रमाबाईंशी विवाह झाला होता.

## उच्च शिक्षण

उच्च शिक्षणासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली. एल्फिन्स्टन कॉलेजमधून ते १९१२ साली बी.ए. झाले.

पदवीधर झाले तेव्हा त्यांना मुलगाही झाला. त्याचे नाव यशवंत ठेवण्यात आले. बडोदा संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवरच त्यांना महाराजांनी शिष्यवृत्ती दिली होती. त्यामुळे पदवी शिक्षणानंतर ते बडोद्याला गेले. तिथे अस्पृश्य म्हणून त्यांना खूप त्रास देण्यात आला. दरम्यान भीमरावांच्या वडिलांचे मुंबई येथे देहावसन झाले. या वेळी आंबेडकरांनी केळुसकर गुरुजींच्या मध्यस्थीने सयाजीराव गायकवाड महाराजांची त्यांच्या मुंबई पॅलेसमध्ये भेट घेतली व बडोद्यातल्या दाहक अनुभवाचे कथन केले. त्यामुळे महाराजांनी आंबेडकरांना तीन वर्षांसाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठवले.

## कोलंबिया विद्यापीठ

१९१३ मध्ये त्यांनी न्युयॉर्कला प्रयाण केले आणि कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व पब्लिक फायनान्स या विषयांचा अभ्यास केला. डॉ. सेलिग्मन व डॉ. जॉन ड्यूई यांच्यासारख्या दृष्ट्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अहोरात्र अभ्यास केला. 'भारतातील जातिसंस्था, तिची उत्पत्ती आणि रचना' हा शोधनिबंध त्यांनी लिहिला. अर्थविकासशास्त्रात त्यांनी कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए. आणि पीएच.डी. या पदव्या संपादन केल्या.

१९१६ साली ते इंग्लंडला गेले. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स'मध्ये प्रवेश मिळवला. अर्थशास्त्रात त्यांनी एम.एस्सी. व डी.एस्सी. या पदव्या प्राप्त केल्या. 'ग्रेज इन' येथून त्यांनी १९२२ साली बार. एट. लॉ ही पदवी मिळवली. ते बॅरिस्टर झाले.

लंडनमध्ये शिकण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना मदत केली. जर्मनीतील बॉन विद्यापीठातही त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला. तसेच पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक साहाय्यामुळे इंग्लंडला परत जाऊन त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

सयाजीराव गायकवाड महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांनी अर्थसाहाय्य केले नसते, तर त्यांना अमेरिका व इंग्लंड या देशांत जाऊन उच्च शिक्षण घेता आले नसते. राजर्षी शाहू महाराजांनी तर त्यांचे नेतृत्व पुढे आणण्यासाठी सर्वप्रकारे मदत केली. या दोन्हीही संस्थानिकांना बहुजन समाजाविषयी कळवळा वाटत होता. 'मूकनायक' हे पाक्षिक काढण्यासाठी शाहू



महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. त्यांच्या शिक्षणाचे बरेचसे श्रेय गुरुवर्य केळुसकरांना दिले पाहिजे.

सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक व प्राचार्यपदही त्यांनी काही काळ भूषवले. वकील म्हणून त्यांनी काम केले. समाजपरिवर्तनाच्या कार्यासाठी 'बहिष्कृत हितकारिणी' सभेची स्थापना त्यांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. या कार्याला गती देण्यासाठी त्यांनी १९२६ मध्ये 'समता सैनिक दल' स्थापन केला.

## पत्रकारितेचा आधार

हिंदू धर्मातील अस्पृश्यतेची पाळेमुळे मनुस्मृती या धर्मग्रंथात होती. डॉ. आंबेडकरांनी १९२७ साली महाडच्या सत्याग्रहाचे केलेले आयोजन हा जातिभेदावरचा एक फार मोठा प्रहार होता. याच ठिकाणी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाची सुरुवात केली. मंदिर प्रवेशाचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. अमरावती, पुणे, नाशिक आदी ठिकाणी मंदिर प्रवेशासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९३५ पर्यंत हिंदू समाजाला बदलण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न सातत्याने चालूच होते. 'आम्ही प्रोटेस्टंट हिंदू' आहोत, असेही त्यांनी सांगितले. पण हे अरण्यरुदन ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यानंतर राष्ट्रीय प्रश्नांकडे वळले. आपले विचार मांडण्यासाठी त्यांनी पत्रकारितेचा आधार घेतला. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता' पाक्षिकाची सुरुवात त्यांनी केली. या सर्वच पाक्षिकातून त्यांनी लेख लिहिले. 'प्रबुद्ध भारत' हे वृत्तपत्र १९५६ साली त्यांनी सुरू केले.

## राजकीय कारकीर्द

१९३० पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीला सुरुवात झाली होती. अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून देश त्यांना ओळखू लागला. मुंबई विधिमंडळाचे सदस्य म्हणून सरकारने त्यांची नियुक्ती केली. या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न विधिमंडळात मांडले. उपेक्षितांचे, स्त्रियांचे, गिरणी कामगारांचे व शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी

## डॉ. आंबेडकरांचे विचारधन

### डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व सार्वत्रिक आणि मोफत असावे. तसेच प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य सरकारचीच आहे. शैक्षणिक खर्चाची तरतूद राज्य आणि केंद्र शासनाकडून प्रसंगी आवश्यक कर बसून अनिवार्य आहे. त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र दलित समाजाला दिला

### स्त्रियांविषयीचे विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याचा प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होत.

### ग्रामीण अर्थव्यवस्थेविषयीचे विचार

ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाजव्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधले होते. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे.

### शेतीविषयक विचार

शेती हा राष्ट्रीय उद्योग असेल. सामूहिक शेती करावी लागेल. सरकारी सारा दिल्यानंतर उरलेली उत्पन्न समप्रमाणात शासन वितरित करेल. शेतीसाठी लागणारी सर्व साधने राज्य सरकारने पुरवणे बंधनकारक राहील.

बाबासाहेब पुढे म्हणतात, लक्षात ठेवा शेतकरी बंधूंनो, आत्महत्या करणे हा पर्याय नव्हे. तुम्ही तुमच्या न्याय हक्कासाठी वाघासारखेच पेटून उठा.

### देशासंबंधीचे विचार

भारत हे मजबूत सबळ आणि प्रगत राष्ट्र झाले पाहिजे असे त्यांचे स्वप्न होते. स्वराज्य हे केवळ मूठभर लोकांचे आणि सत्ताधीशांचे नसावे, तर पीडित आणि उपेक्षितांसह सर्वांचे स्वातंत्र्य ही कल्पना त्यांच्या मनात होती. प्रत्येक भारतवासीयांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे.

### भारत-पाक फाळणीसंबंधीचे विचार

देशासमोरचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न फाळणीविषयी निर्णय घेण्याचा आहे. जोपर्यंत तो घेतला जात नाही, तोपर्यंत स्वातंत्र्य मिळूनही काही उपयोग नाही. हिंदू-मुस्लीम प्रश्नावर तोडगा न काढता स्वातंत्र्य मिळाल्यास अराजक माजेल, यादवी युद्ध होईल, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते.

ऐरणीवर आणले. महार वतनाच्या कायद्यात बदल करण्यासाठी दुरूस्ती विधेयक मांडले.

### खोती पद्धतीवर बंदी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप घडवून आला होता. हा संप इ.स. १९२८- या कालावधीत चरी (रायगड जिल्हा) या गावात झाला. हा संप ७ वर्ष सुरू होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करण्यासाठी संघर्ष केला.

१४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत त्यांनी कोकणातील खोतीदारीविरूद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले. खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले.

### गोलमेज परिषदांमधील सहभाग

सायमन कमिशनने अस्पृश्यांच्या राजकीय हितांना फारसे महत्त्व दिले नाही. भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांच्या हिताचे संरक्षण करणारे राजकीय हक्क असावेत, असे आंबेडकरांना वाटत होते. अस्पृश्यांच्या ठिकठिकाणी सभा व अधिवेशन भरवून आंबेडकरांनी अस्पृश्यांना त्यांच्या राजकीय हक्कांचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या स्वतःच्या अधिकारांविषयी जागृती करू लागले.

### स्वतंत्र मजूर पक्ष

१९४२ मध्ये व्हॉईसरॉय लिनलिथगो सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांना 'मजूर मंत्री' म्हणून घेण्यात आले. मजूर मंत्री म्हणून त्यांनी कायद्यात अनेक दुरूस्त्या सूचवल्या. कामगार कल्याणाच्या निरनिराळ्या योजना बनवल्या. विकासासाठी वीज आवश्यक असून जलसिंचनाबरोबर वीजनिर्मितीचा प्रश्नही त्यांना सोडवला होता. १९४६ साली देशात काँग्रेसचे काळजीवाहू सरकार आले. या सरकारमध्ये बाबासाहेबांना कायदामंत्री म्हणून स्थान मिळाले. याच काळात घटना समिती गठित करण्यात आली. बंगाल प्रांतातून ते घटना समितीवर निवडून आले. योगायोगाने ते मसुदा समितीचे अध्यक्ष बनले. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार मानले जातात.

### बौद्ध धर्मात धर्मांतर

आंबेडकर बुद्धिप्रमाण्यवादी होते, त्यांनी सन १९३५ च्या आपल्या धर्मांतरांच्या घोषणेनंतर २१ वर्षे जगातील विविध प्रमुख धर्मांचा अभ्यास केला. त्यानंतर त्यांचा कल मानवतावादी व विज्ञानवादी धर्म म्हणून बौद्ध धम्माकडे वळला. त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ नागपूर हा धर्मांतराचे स्थळ व दिवस जाहीर केला.

(लेखक हे साहित्यिक व इतिहासाचे अभ्यासक असून,
लातूर जिल्हा शासकीय इतिहास संशोधक मंडळाचे सदस्य आहेत.)

**बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हानास्पद आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ उपेक्षितांना जागवण्याचेच कार्य केले नाही, तर उर्वरित घटकांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन त्यांनी वारंवार केले. वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजे, अशी धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती.**

# प्रेरक पत्रकारिता

**डॉ. गंगाधर पानतावणे**

मराठी वृत्तपत्रसृष्टीत कोणा एका महान पत्रकाराचे कर्तृत्व दुर्लक्षित राखले गेले असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर विचारवंताचे, पत्रकाराचे. मराठी वृत्तपत्रसृष्टी ही केवळ एका विशिष्ट वर्गाची आहे. अन्यांना यात प्रवेश नाही किंवा त्यांचे कर्तृत्व नगण्य आहे, अशी एक प्रकारची भावना होती. परंतु १९व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात दलित व अस्पृश्य पत्रकारांनी जो प्रपंच केला तो कितीही दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला तरी आपल्याला, मराठी वृत्तपत्रसृष्टीपासून दूर ठेवता येणार नाही. गंमत अशी आहे की, ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास घडला, ज्यांनी मुलाखती घेतल्या, त्यांनीही त्यांचा पत्रकार म्हणून गौरव तर केला नाहीच, पण त्यांच्या पत्रकारितेचीही फारशी दखल घेतली नाही. असे असले तरी सूर्यसत्य हे शपथेवर सांगावे लागत नाही हे खरे! याचा अर्थ हाच की, बाबासाहेबांचा पत्रकार म्हणून उल्लेख करायला आमच्या वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास कद्रू ठरला. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन उपलब्ध झाल्यानंतर आता कुठे त्याचा अभ्यास व्हायला लागला आहे. ज्या काळात बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांना जन्म दिला आणि त्यांनी त्यातून लेखन केले. त्या काळात भल्या भल्या पत्रपंडितांनी कातडीबचाऊ धोरण ठेवले. त्यामुळे बाबासाहेबांचे नुकसान झाले नाही. नुकसान झाले ते मराठी वृत्तपत्रसृष्टीचे.

बाबासाहेबांनी अपरिहार्यता म्हणूनच मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता (१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) या आपल्या पत्राचा प्रपंच केला. प्रबुद्ध भारत स्वतंत्रपणे जन्माला आले नाही, तर जनतेचेच ते रूपांतर होते. मराठी पत्रे 'प्रकाशा'चा वसा घेऊन पत्रसृष्टीत उभी राहिली. परंतु ब्राह्मणेत्तरांची काय किंवा डॉ. बाबासाहेबांची पत्रे काय, सामाजिक व सांस्कृतिक निकडीतून उदयाला आली होती. समाजातील अपूर्ण विषमता, सांस्कृतिक अहंकार आणि स्वनामधन्य नेतृत्वातील विसंवाद, पोखरलेपण आणि अर्थहीनता विशद करून एक नवा समाज घडवण्याची प्रेरणा यामागे होती. ब्राह्मणद्वेषाचे काही प्रमाणात स्वरूप आले होते, ते तत्कालीन पत्रातून जाणवते, परंतु बाबासाहेबांची पत्रे किंवा दलित समाजातील किसन फागू बंदसोडे, दादासाहेब शिर्के किंवा शिवराम जानबा कांबळे यांसारख्या समाजचिंतकांच्या पत्रांचा मागोवा घेतला तर असे दिसून येईल की, ही पत्रे आत्मप्रबोधनासाठीच जन्माला आली होती आणि आत्मप्रबोधन व्हायचे असेल तर प्रस्थापित व पुनरुज्जीवनवादी विचारांचा आणि व्यवस्थेचा उच्छेद करणे अपरिहार्य, ही रचनात्मक भूमिका या पत्रांनी घेतली होती, असे स्पष्ट दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर आपल्या मूकनायक या पत्राच्या पहिल्या अंकात म्हणतात, आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रासारखी अन्य भूमीच नाही (मूकनायक : ३१ जानेवारी १९२०)



अस्पृश्य वर्गाला विचारप्रवृत्त करणे, त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे आणि संघर्षोन्मुख करणे ही मानवी जीवित्वाला नवा आयाम देणारी भूमिका बाबासाहेबांनी स्वीकारली होती आणि वृत्तपत्र त्यांना अत्यंत प्रभावी असे माध्यम वाटले होते. सुप्रसिद्ध पत्रकार व संपादक व्हेलरी पायर्स याने आपल्या Challenger या वृत्तपत्राच्या अनुषंगाने म्हटले होते की, Without the black press, the black man would not he is nor what is happening to his struggle for the freedom of citizenship (Is There A Black Press: Roland E. Wolseley, P.8) जगात समान दु:खी आणि समान प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रवक्त्यांची जीवनसृष्टी कशी समान असते, हे या साम्यावरून प्रतीत होईल. दडपल्या गेलेल्या, मनुष्यत्व हिरावून घेतलेल्या समाजाची युद्धे कधीच संपत नसतात. जुनी युद्धे संपली की पुन्हा नवी युद्धे, आकाशात काळे ढग यावेत, त्याप्रमाणे जन्म पावतात आणि म्हणून अशा साधनवंचित समाजाला

जागृत करण्यासाठी, ज्याला त्याचा इतिहास सांगावा लागतो आणि त्यापेक्षा त्याला त्याचे वास्तव जाणवून द्यायचे असते. सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्वखोरांनी त्यांची मलिन केलेली प्रतिमा, त्यांची ठोकरलेली विश्वासार्हता, नवे जग निर्मिण्याची कुस्करलेली दुर्दम्य आकांक्षा यासंबंधीची सत्ये प्रतिपादावयाची असतात. बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हानास्पद आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ अस्पृश्यांना व दलितांना जागवण्याचेच कार्य केले नाही, तर स्पृश्यांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन वारंवार केले. या आवाहनाच्या मागे समग्र भारतीय समाजाच्या एकसंधतेची व एकात्मतेची, समतेची व स्वातंत्र्याची मागणी होती. वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजेत, अशी त्यांची धारणा होती, परंतु भारतीय वृत्तपत्रसृष्टीकडून



मूकनायक



बहिष्कृत भारत



प्रबुद्ध भारत

ही अपेक्षा करणे सर्वस्वी गैर होते. अर्थात काही ध्येयवादी मराठी पत्रे होती आणि ती अपवादात्मक मानली पाहिजेत. बाबासाहेबांनी वृत्तपत्रांकडे केवळ धंदा म्हणून पाहणाऱ्या वृत्तीचा निर्देश केला आहे. त्यांनी पुणे येथील न्या. रानडे व्याख्यानमालेत वृत्तपत्रांसंबंधी विचार मांडताना म्हटले होती की, Journalism in India was once a profession. It has now become a trade. It has no more moral function than the manufacture of soap. नैतिकता हा वृत्तपत्राचा कणा असावा, असे मत मांडून ते थांबले नाहीत तर आपली सर्व पत्रे त्यांनी याच भूमिकेतून संपादली, चालवली.

'मूकनायक'च्या शीर्षभागी संपादक म्हणून बाबासाहेब आंबेडकरांचे नाव नसले आणि त्या काळातील उच्च विद्याविभूषित अशा पांडुरंग नंदराम भटकर या विदर्भ देशातील तरुणाचे नाव असले तरी मूकनायकाचे संगोपन, धोरण आणि अग्रलेख बाबासाहेबांचेच असत. मूकनायक आरंभले तेव्हा लोकमान्य टिळक यात होते आणि त्यांचा केसरी घराघरांत स्वराज्याचा विचार नेत होता. अन्य अनेक पत्रे स्वराज्याशी बांधीलकी मानून आपला प्रवास करत होती. ब्राह्मणेतरांचीही पत्रे वाटचाल करत होती. आणि त्यातच बाबासाहेब मूक समाजाचे नायकत्व स्वीकारून बहिष्कृत समाजाच्या उत्थानासाठी सिद्ध झाले होते. मूकनायकातील त्यांचे सर्व अग्रलेख समाजकारणाबरोबरच धर्म आणि राजकारणाशी निगडित होते. तत्कालीन स्वराज्याच्या प्रश्नांसंबंधी विचार मांडतांना स्वराज्यापेक्षाही सुराज्याची आम्हाला गरज आहे, असे एका अग्रलेखात त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले होते.

मूकनायक अल्पजीवीच ठरले. परंतु ज्या पाक्षिकपत्रावर त्यांचे संपादक म्हणून नाव होते आणि ज्या पत्राचा त्यांनी सर्वार्थाने प्रपंच केला ते पत्र होते, 'बहिष्कृत भारत'. 'मूकनायक'चे व्यवस्थापन आणि संपादन या दोन्ही बाबतीत बाबासाहेबांना फारसे समाधान नव्हते. ज्यांच्यावर जबाबदारी टाकली जाते ती माणसे अर्थहीन वाद निर्माण करतात, हे त्यांच्या लक्षात आले. तशात त्यांना विलायतेलाही जावे लागले. या कारणामुळे मूकनायक अल्पजीवी ठरले. परंतु 'बहिष्कृत भारत'ला बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने जोपासले. संपादकीय म्हणजे स्वयंदीक्षा ही भूमिका त्यांनी स्वीकारली आणि बहिष्कृत भारत चालवणे म्हणजे सामाजिक ऋण फेडण्यासारखेच आहे, असा विचार त्यांनी मांडला. बहिष्कृत भारतच्या मागे अन्य वृत्तपत्रांसारखी कोणतीही सुसज्ज यंत्रणा नव्हती, संपादकीय विभाग नव्हता की, वितरण व्यवस्था हे सारे बाबासाहेबांनाच करावे लागे. आपल्या पत्राला आर्थिक बळ मिळावे, म्हणून त्यांनी 'बहिष्कृत भारत फंडा'साठी आवाहन केले. पण त्यांना फारसा प्रतिसाद लाभला नाही. आपले वृत्तपत्र हा व्यवसाय नव्हे, तर समाज प्रबोधनकार्यासाठी स्वीकारलेले ते एक प्रकारचे दिव्य आहे, अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच 'बहिष्कृत भारत'चे चोवीस-चोवीस रकाने स्वतःच लिहिणाऱ्या या पत्रकाराने बहिष्कृत भारताचे ऋण हे लौकिक ऋण नव्हे काय? या शीर्षकाच्या ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकात नमूद केले.

बहिष्कृत भारताची संपादकी हा तर पत्राच्या संपादकीप्रमाणे पैसे कमवण्याचा धंदा नसून ही लोकजागृतीकरिता घेतलेली स्वयंदीक्षा आहे.

अस्पृश्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून तर दिलीच पाहिजे, परंतु त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला प्रखरपणे वाचा फोडण्याची गरज आहे आणि त्यासाठी नुसते थंडपणे न बसता आपल्या पत्रातून जनजागरण करणे हेच सर्वार्थाने हितावह आहे, हे डॉ. बाबासाहेबांनी विशद केले. त्या वेळच्या थोड्याफार शिकलेल्या शिक्षकवर्गाने निदान वृत्तपत्र विकत घेऊन वर्गणीदार होऊन कार्याचा वाटा उचलावा, अशी त्यांनी अपेक्षा केली होती. परंतु त्यांना नगण्य असा प्रतिसाद मिळाला. अशा प्रतिकूलतेतही त्यांनी आपले स्वीकृत कार्य तडीस नेण्याचा निश्चय केला आहे आणि अविचलपणे त्यांनी आपली लेखणी परजली. बहिष्कृत भारताच्या झंझावाताने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एक प्रकारचे तुफान आले आहे. असे जे त्यांनी म्हटले होते, ते सार्थ होते. त्यांचे लेखन बहिष्कृत भारतातील असो की जनतेतील, त्यांनी आपली लेखणी

वाकवली नाही. ती ताठ होती, स्वाभिमानी होती, क्रांतिकारी होती आणि नवसमाजनिर्मितीच्या ध्येयाने झपाटली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कितीतरी विषयांचा मागोवा घेतला. हिंदू धर्म आणि हिंदू समाज यातील विषमतेवर त्यांनी ज्या परखडपणे लिहिले, तितक्याच परखडपणे त्यांनी हिंदुस्थानातील राजकीय प्रश्नात रस घेणाऱ्या अनेक राजकीय पक्षांच्या असंतुलित भूमिकांसंबंधी लिहिले. राष्ट्रवादाची आपली भूमिका जशी स्पष्टपणे मांडली, तशीच ब्रिटिश राजवटीच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या अनेक स्वार्थपर धोरणांचा निषेधही केला. प्राचीन इतिहासाचा त्यांनी वृथा अभिमान कधीच बाळगला नाही. उलट अशा मनोवृत्तींवर त्यांनी कडवटपणे शरसंधान केले.

भारतीय राष्ट्रवाद हा नेहमीच भारतीयांना अत्यंत प्रिय असा विषय राहिलेला आहे. प्राचीन राष्ट्रांचा विचार करताना भारत हे राष्ट्र अजूनही टिकून आहे, याचा मनस्वी आनंद लुटणाऱ्या काही मानसिकता अजूनही या देशात निश्चल आहेत. राष्ट्रवादी मंडळी आपल्या राष्ट्राचा गौरव करताना भारत हे राष्ट्र अमर आहे, असा फाजील आत्मविश्वास व्यक्त करीत असतात. प्रेमाच्या पोटी दोषांनाही गुण मानण्याची एक वृत्ती असते. तसेच काहीसे येथे घडले. आमचे भारत राष्ट्र हजारो वर्षे टिकून राहिले, याचे एक कारण या देशातील वर्णधर्म व्यवस्था असेही काही मंडळी आग्रहपूर्वक मांडत असतात. बाबासाहेबांनी या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार केला आहे. त्यांचा बिनतोड असा एक मुद्दा त्यांनी मांडला आहे तो असा की, आपण हजारो वर्षे जगलो म्हणजे नेमके काय? ते स्पष्टपणे म्हणतात की, आपण शतकानुशतके जगलो हे जरी खरे असले, तरी आपण कसे जगलो हा प्रश्न मूलभूत आहे व महत्त्वाचा आहे. आपले राष्ट्र कसे जगले, हा प्रश्न फाजील राष्ट्रवाद्यांच्या मर्मावर आघात करणारा होता. या प्रश्नाच्या मागे परंपरेचे विश्लेषण आहे आणि एका वस्तुनिष्ठ आलेखाचे पृथ:करण आहे. बाबासाहेबांना हेच सांगायचे आहे की, आम्ही जगलो पण स्वाभिमानाने जगलो नाही, गुलाम म्हणून जगलो. आपले जगणे लाचारीचे आणि कर्तृत्वशून्य असे होते. या विचारांमागे बाबासाहेबांचे राष्ट्रवादी मन उभे आहे. आमचे राष्ट्र स्वाभिमानाने जगावे, एकात्म राहावे असे आम्ही प्रयत्न केले नाहीत. हा विचार बाबासाहेबांनी अगदी प्रखरपणे आणि बिनतोड मांडला आहे.

आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, असे प्रयत्न आमच्या देशात झाले नाहीत. एक कमालीची उदासीनता सर्वत्र भरून होती. ही पराभूतता होती. हा पराभवाचा इतिहास न स्वीकारता आमचे राष्ट्र टिकून आहे, अशा आत्मगौरवी भाषेची कीवच बाबासाहेबांनी केली आहे. जे त्यांनी आम्हाला ठार मारले नाही. हे त्यांचे उपकार होत, हे बाबासाहेबांनी किती उपरोधिकपणे प्रतिपादले आहे! पण मग आम्ही जिवंत राहिलो ते आणखी एका कारणाने आणि ते कारण म्हणजे चिवटपणे आम्ही टिकवून ठेवलेली जातिव्यवस्था. जातिव्यवस्थेमुळे भारत नावाचे राष्ट्र टिकले आणि अजूनही टिकून आहे. याचा अर्थ इतकाच की, परंपरा म्हणून आम्ही टिकून राहिलो तो जातिव्यवस्थेमुळेच पण हा काही पुरुषार्थ आहे, असे मानण्याचे काय कारण, असा बाबासाहेब सवाल करतात. जातिव्यवस्था ही समग्र राष्ट्राचा विध्वंस करणारी अशी एक अनिर्बंध संस्था आहे. या संस्थेने गुलामीची परंपरा अस्तित्वात आणली. अस्पृश्य समाजावर या संस्थेने गुलामगिरी तर लादलीच, परंतु हजारो जातीही गुलामी मने घेऊन जिवंत राहिल्या. जात हा हिंदू समाजाचा मूळ आधार आहे. जातिभेदामुळे हिंदू समाजात प्रचंड गैरसमज आहेत. परस्परांविषयीचा अविश्वास आहे. आमच्या राष्ट्राला लागलेली कीड म्हणजे जातिवाद. आमच्या सर्व अनर्थांचे मूळ जातिवाद आहे, असे बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ५०-६० वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेले हे विचार आजही तितकेच जिवंत आहेत, ज्वलंत आहेत आणि एकात्म राष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्यांना अंतर्मुख करायला लावणारे आहेत. बाबासाहेब जातीविहीन समाजाचा उच्चार वारंवार करतात. याचे मर्मही तथाकथित राष्ट्रवाद्यांनी जाणून घेतले पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांच्या आणखी एका राष्ट्रवादी भूमिकेचा विचार करता येईल आणि ही भूमिका म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संदर्भात त्यांनी वेळोवेळी केलेले प्रतिपादन. ब्रिटिश शासनाने अनेक सुधारणा केल्या. त्यांच्यामुळे अस्पृश्यांना शिकता आले, त्यांना सैन्यात प्रवेश मिळाला, हे बाबासाहेबांनी मान्य केले असले तरी ब्रिटिशांनीच हिंदुस्थानला गुलाम केले, हिंदुस्थानच्या दारिद्र्याला कारण ब्रिटिश धोरण आहे, हे त्यांनी परखडपणे मांडले आहे. हिंदुस्थाचा विचार करताना हिंदुस्थानला ब्रिटिशांनी देहाने गुलाम बनविले, असे उद्गार त्यांनी काढले. आंग्लाई ही एक जळू आहे व ती हिंदुस्थानातील संपत्तीचे शोषण करते (दु:खात सुख : ब.भा. १ जुलै १९२७) असा आरोप त्यांनी निर्भयपणे केला. इंग्रज सरकार धीमे आहे. मार्च ऑन करण्याऐवजी होता होईल तो मार्क टाईम करण्याचे अवलक्षण त्यांच्या अंगी अगदी खिळून गेले आहे व सामाजिक प्रश्न आला की, त्यांचे पाय लटके पडतात. (महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी : ब.भा. ६ मे १९२७) असे स्पष्टपणे त्यांनी खडसावलेही. इंग्रज हे पक्षपाती आहेत, महाधूर्त आहेत, अशीही त्यांनी साधार संभावना केली आहे. इंग्रजी राजवटीत काही चांगल्या गोष्टी घडल्या असल्यातरी इंग्रजांना येथे कायम असावे, असा विचार त्यांनी कुठेही मांडला नाही; उलट दलितांनी या राजवटीत आपल्या हितार्थ जेवढे काही प्राप्त करून घेता येईल, तेवढे करून घ्यावे असे सुचवले आहे. ही त्यांची देशनिष्ठा वादातीत आहे. ते कधीही इंग्रजधार्जिणे नव्हते.

स्वराज्याच्या प्रश्नाच्या संदर्भातही बाबासाहेबांची भूमिका स्वच्छ आहे. ते कधीही स्वराज्यविरोधी नव्हते. ते स्वातंत्र्याच्या आंदोलनात कधी सहभागी झाले होते, असा पुरावा नाही. याचा अर्थ हा नव्हे की, त्यांनी स्वराज्याचा किंवा स्वातंत्र्यचळवळीचा विरोध केला आहे. बाबासाहेबांनी स्वराज्याचा संबंध केवळ राजकीय स्वातंत्र्याशी जोडला नाही. देशातील स्वातंत्र्य म्हणजे मालकी असा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता. स्वराज्य हा सर्वांचाच जन्मसिद्ध हक्क आहे व स्वराज्यविषयी सर्वांनाच तळमळ वाटायला हवी. स्वराज्य कल्पनेत त्यांना बहिष्कृतांचेही भवितव्य अभिप्रेत होते. ते म्हणतात, तत्त्व म्हणून स्वराज्याला आपला नकार नाही, परंतु व्यवहार म्हणून पाहिले तर स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वाची री आम्ही तरी ओढू शकत नाही. मग कोण ओढील तो ओढो बिचारा (मूक नायक : १४ फेब्रुवारी १९२०)

एककेंद्री स्वराज्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. स्वराज्यास समाजव्यवस्था अनुकूल हवी, ती नसेल तर स्वराज्य कसे मानायचे, असा त्यांनी सवाल केला. तेव्हा त्यांची ही भूमिका स्वराज्यविरोधी होती. असे म्हणता येणार नाही. राष्ट्रवादी बाबासाहेब आंबेडकरांनी स्वराज्याचा संबंध सामाजिक समतातत्त्वाशी जोडला होता, हे लक्षात घेतले पाहिजे.

बहिष्कृत वर्गात विचार प्रबोधन होण्याच्या निकडीने त्यांनी केलेले लेखन प्रचोदक, बुद्धिप्रामाण्यवादी, तर्कशुद्ध, परखड आणि अंतर्मुख करणारे आहे. हिंदू धर्म व समाजचिकित्सा करताना हिंदू समाजातील रूढी-परंपरांनी हिंदू समाजाचे आणि अस्पृश्यांचेही प्रचंड नुकसान झाल्याचे मत त्यांनी मांडले. अन्याय व जुलूम हे उभय समाजाची विवेकशक्ती नष्ट करतात, हे त्यांचे म्हणणे स्वीकारावेच लागेल आणि म्हणून अस्पृश्यांमध्ये आत्मजागृती व्हायची असेल तर आत्मभान व आत्मसन्मान यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी आंदोलनेही उभारली. स्पृश्यांना कर्तव्याची जाणीव आणि अस्पृशांना अधिकाराची जाणीव करून दिली. ज्यांनी नाकारले त्यांनाच नाकारण्याची संधी दिली. हिंदू समाजाशी संघर्ष करण्यासाठी त्यांनी प्रतिकारयोग आणि बहिष्कारयोग सांगितला. मानवी हक्क संपादिण्यासाठी आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी तसेच हिंदूंनी पुनर्विचार करावा, यासाठी या दोन्हीही योगांची गरज त्यांना वाटली. वस्तुतः बहिष्कार घडत असे तो अस्पृशांवरच आणि या बहिष्कारामुळे त्यांचे समग्र जीवन उद्ध्वस्त होत असे. अस्पृश्यांनी स्पृश्यांवर बहिष्कार टाकावा, तो त्यांची कामे न करणे म्हणजे मेलेली ढोरे न ओढणे, वेठबिगारी झुगारून देणे, गावकीची कामे न करणे या स्वरूपात. महार वतनाचा त्याग करून अस्पृश्यांनी गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर यावे असे जेव्हा बाबासाहेब म्हणत, तेव्हा त्यांना भारताचा नवा अध्याय लिहायचा होता, असेच म्हणावे लागेल. महार वतनामुळे अस्पृश्यांतील महत्त्वाकांक्षा मारली गेली आणि त्यामुळे हा समाज माणुसकीपासून दूर राहिला. अस्पृश्यांना महत्त्वाकांक्षी, कर्तबगार आणि माणूस बनवण्यासाठी त्यांनी महार वतने खालसा करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. बहिष्कृत भारतात त्यांनी महारवतनावरील लिहिलेले चार लेख बाबासाहेबांची संशोधनपरता, ठाम विचार, मानवी मूल्यांची आच आणि कर्तव्यकठोरता यांचे दर्शन घडवतात. धर्म, धर्मांतर आणि धर्मग्रंथ यासंबंधीचे डॉ. बाबासाहेबांचे चिंतन तर सांप्रदायिकतेला छेद देणारे आहे. धर्म आणि समाज या दोन्ही संस्थांचे विलगीकरण होणे त्यांना अपरिहार्य वाटते. धर्म एक असेल, परंतु समाजाची स्वतंत्रता अपरिहार्य असते. हिंदुस्थानात ही बाब वर्चस्वाच्या सोसातून निर्माण होऊ शकली नाही, हे एक विदारक सत्य आहे. हिंदू लोक ज्यास धर्म मानतात. तो धर्म नाही तर तो कायदा आहे. ते एक प्रकारचे आज्ञापत्र आहे, धर्म हा शब्दही हिंदुस्थानात धार्मिक विधी आणि धार्मिक कृती याच अर्थाने मानला जातो. बाबासाहेब म्हणतात की, या आज्ञा समाजात सर्व काळ लागू केल्या जातात. एवढेच नाहीतर सर्व वर्गांना या समान अर्थी लागू केल्या जात नाहीत. यातूनच अन्यायाचे पोषण होते आणि शब्दप्रामाण्याला अवसर मिळतो. एकदा शब्दप्रामाण्य आले की, विषमता निर्माण होत आणि समाजात असमता भिनत जाते. नियमाधिष्ठित धर्म बाबासाहेबांना अजिबात मान्य नाही. हिंदू धर्मांचे प्रचंड नुकसान झाले ते यामुळेच असे ते म्हणतात. तत्त्वनिष्ठ धर्म समाजाची खऱ्या अर्थाने धारणा करतो. पण तो या देशात निर्माण होऊ शकला नाही. उलट प्रचंड विसंवादालाच 'धर्म' ही संज्ञा देऊन धर्मज्ञांनी मानवी अप्रतिष्ठा केली आहे. श्रेणीबद्धता हा हिंदू धर्माचा व्यवच्छेदक विशेष. तो बदलण्याची गरज त्यांनी विशद केली आणि जातिविहीन समाजव्यवस्थेचा आग्रह धरला. धर्मज्ञांचे अधिकारही निश्चित करण्याची गरज त्यांना वाटली.

धर्मांतरासंबंधी त्यांनी केलेली मीमांसा लक्षणीय आहे. ते म्हणतात की, धर्मांतर हा मौजेचा विषय नव्हे. हा प्रश्न माणसाच्या जीविताच्या साफल्याचा प्रश्न आहे. जहाज एका बंदरातून दुसऱ्या बंदराला नेण्याकरिता नावाड्याला जेवढी पूर्वतयारी लागते तेवढीच पूर्वतयारी धर्मांतराकरिता करावी लागणार आहे. (मुक्ति कोन पथे : जनता २० जून १९३६) बाबासाहेबांनी धर्मांतरासंबंधी दोन दृष्टींनी विचार केला होता. १. सामाजिक आणि ऐहिक दृष्टीने २. धार्मिक आणि तात्त्विक दृष्टीने : धर्मांतर हे राष्ट्रांतर नव्हे की वस्त्रांतर, अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. प्रारंभी हिंदूधर्मत्यागाचा निश्चय झाल्यानंतर नेमका कोणता धर्म स्वीकारावा, या संबंधीची अनिश्चितता त्यांच्या अनेक लेखांत उमटली आहे. पण पुढे धर्मच स्वीकारायचा, तर तो या देशातील संस्कृतीला उपकारक ठरणारा हवा ही भूमिका त्यांनी व्यक्त केली. धर्मांतरासंबंधीची मते आणि मतांतरेही त्यांनी काही लेखात विशद केली, ती धर्माची मूलभूत चर्चा करूनच आणि धर्मांतराचा व बुद्ध धर्माच्या स्वीकाराचा विचार झाला, तोही मूलभूततेला शबलित होऊ न देता.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रातून विविध प्रश्नांवर आपले विचार मांडले आहेत. अगदी बालविवाहापासून ते सहशिक्षण, सहभोजन आणि पुढे शेती, शेतकरी, खोतीशाहीपर्यंत, सत्याग्रहाचाही सैद्धान्तिक विचार त्यांनी मांडला आहे, पण या सर्व लेखनाचे सूत्र प्राधान्याने सामाजिक-सांस्कृतिक आणि नवसमाजनिर्मिती हेच आहे. महात्मा गांधी, पंडित नेहरू यांपासून तो हिंदू महासभा-सत्यशोधक समाज या संदर्भातही त्यांनी परखड विचार मांडले आहेत. या सर्व लेखनांतून प्रचंड अभ्यास, परखडपणा, तर्कशुद्धता, चिकित्सकता, सत्यान्वेषकता, साधारता व बहुश्रुतता यांचे प्रत्यंतर येते. तेजस्वी विचारसरणी आणि धारदार भाषा, प्रतिपक्षावर-अज्ञान आणि दंभांवर कठोर प्रहार करणारे बाबासाहेब अनेकदा उपरोधगर्भ भाषेचाही वापर करतात. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, बाबासाहेबांनी आपले विचार, भाषेच्या फुलवऱ्यातून मांडलेले नाहीत. लोडाशी टेकून भाषा सजवण्याचा किंवा नखरेदार शब्दांचा सोस बाळगण्याची हौस त्यांना कदापिही नव्हती. बाबासाहेबांचे सर्व वृत्तपत्रीय लेखन चिंतनशील आहे, मार्मिक आहे आणि कृतीस आवाहन करणारे आहे. बाबासाहेबांचे विचारप्रवर्तक लेखन, मराठी निबंधवाङ्मयाचा अलंकारच होय. स्वतःची अशी स्वतंत्र शैली निर्माण करणारे बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीला, लोकजागृतीच्या चळवळीचे भान दिले आहे. सामाजिक न्यायमूल्यांची जाणीव हीच त्यांच्या वृत्तपत्रसृष्टीची आधारशिला आहे.


*(लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)*

**परंपरागत कायद्यांनी जखडलेली स्त्री डॉ. बाबासाहेबांच्या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे, तर अर्थार्जन, सेवायोजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते. आर्थिक धोरण राबवण्याबाबत ३९व्या कलमानुसार उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री-पुरुषांना समान राहील, तसेच स्त्री-पुरुषांचे वेतन समान राहील.**

# स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी

**प्रा. कुमुद पावडे**

डॉ. बाबासाहेब अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे जातीय विषमतेच्या अपमानाचे दु:ख त्यांनी सोसलेले होते. तेच दु:ख येथील स्त्रियांच्यादेखील वाट्याला आलेले आहे. त्यामुळे अनुसूचित जाति-जमाती, भटक्या-विमुक्त जाती व इतर मागासवर्गीय हे सर्व ह्या अपमानाचे बळी आहेत, हे जसे त्यांनी जाणले तसेच उच्चवर्णीय स्त्रियांपासून तळागाळांतील स्त्रियांपर्यंत सर्व स्त्रिया या व्यवस्थेमुळे शोषित व पीडित आहेत, हेही जाणले आणि या सर्वांच्या मुक्तीचा उपाय म्हणजे कायदा होय हे त्यांच्या दूरदर्शी बुद्धीला पटले. कारण ज्या मार्गाने ही विषमता व परावलंबित्व आले, त्याच मार्गाने त्या विषमतेचे परिमार्जन केले पाहिजे, असे ठामपणे ठरवून त्यांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी कायद्याची गरज आहे हे जाणले. तसेच पूर्वीपासूनच स्त्री-समस्यांचे आकलन व स्त्री-संख्येचे गणन त्यांनी विचारात घेतले होते. २७ डिसेंबर १९२७ च्या महाडच्या सत्याग्रहाच्या वेळेस कोणत्याही पदावर नसतानादेखील जवळ जवळ पाच हजार स्त्रियांची सभा त्यांनी वेगळी घेतली होती. स्वाभिमान जागवण्याची व प्रबोधनाची भूमिका त्यांनी एकाच वेळेस घेतलेली दिसते. स्त्री व पुरुष यांनी मिळून समाजाच्या संसाराच्या अडचणी सोडवल्या पाहिजे. पुरुषांनीच हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना फार अवधी लागेल. तेच काम स्त्रियांनी जर अंगावर घेतले, तर त्यांना त्या कामात लवकर यश प्राप्त होईल, असे माझे मत आहे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८, भाग १, पृष्ठ-१४३) याच सभेत बाबासाहेबांनी दलित स्त्रियांच्या राहणीबद्दल प्रबोधन केले. मुलामुलींना शिक्षण देण्यास सांगितले. विशेषत: मुलींच्या शिक्षणावर भर दिला. या प्रबोधनाचा तत्काळ परिणाम दिसून आला. सभेवरून परतताना स्त्रियांच्या वस्त्र नेसण्याच्या पद्धतीत बदल झालेला होता. ब्रिटिशांच्या राजवटीत दलित पुरुषांबरोबरच स्त्रियांनादेखील क्रांतिप्रवण होण्याचे प्रशिक्षण बाबासाहेबांनी दिले. कारण त्यांची प्रामाणिक धारणा होती की, स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे.



२० जुलै १९४२ साली नागपूरला दलित स्त्रियांची परिषद (सभा) आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत २०-२५ हजार स्त्रिया उपस्थित पाहून बाबासाहेबांना आनंद झाला. ते म्हणाले, स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेखन व भाषणे खंड १८, भाग-२, पृष्ठ ४२६) याच भाषणात त्यांनी लग्नाच्या मुलीसाठी दिलेला उपदेश दिसतो. लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागवल्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदेमंत्री झाले. भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे काम मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केले. घटनेची बांधणी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या चार मूलतत्त्वांवर झालेली आहे. पहिले तत्त्व समता जी भारतीय जीवनात कधीच नव्हती, हजारो वर्षे विषमतेचीच परंपरा चालत आलली होती व भारतीयांच्या रक्तकणात आत्मसात झालेली होती. त्यामुळे समतेवर आधारित स्वातंत्र्याची आशा करणे व्यर्थच होते. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादींमुळे व्यक्तीचे होणारे मूल्यमापन अधिकाधिक जाचक होत होते. त्यामुळे हा जाच कायद्यानेच नष्ट करण्याची गरज होती आणि कायदा सर्वांनाच सारखा लागू होईल हेही सांगणे आवश्यक होते म्हणून संविधानाच्या १४ व्या कलमात हे सांगून टाकले की,

कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारण्यात येणार नाही.


कलम १५-१ राज्य केवळ, धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. १५-२ सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे, १५-३ कलमात स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदींचा उल्लेख आलेला आहे.

१६-१ व २ सेवायोजन पदनियुक्ती, नोकरी इत्यादी धर्म, जात, वंश, लिंग, कूळ, जन्मस्थान निवास इत्यादी कारणांवरून भेदभाव केला जाणार नाही व सर्व नागरिकांस समान संधी मिळेल.

या कलमांचा स्त्री-जीवनावर काय परिणाम झाला हे पाहणे जरुरीचे आहे. लिंगभेदामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत. कारण परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे. पण आज स्त्री-मुक्ती संघटना ह्या अत्याचाराविरुद्ध लढत आहेत. विशेषत: स्त्रियांनी ही बाजू कणखरपणे सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्री-मुक्तीबरोबरच स्त्री-वादाचा आग्रह स्त्री-संघटनांनी धरलेला दिसतो, त्यामुळे स्त्री-हक्काची भूमिका अर्थातच आग्रही ठरते.

शिक्षणाचा अधिकारच जेथे नाकारलेला होता, तेथे शिक्षणाची (स्त्रियांच्या) काय प्रगती झाली तिचा आलेख (दहा-दहा वर्षांचा) हे स्पष्ट करतो की, स्त्रियांची शिक्षणातील प्रगती दिवसेंदिवस वाढती दिसत आहे. विशेषत: परंपरावादी दृष्टिकोन ज्यांना केवळ चूल, घर व मुले सांभाळणे यापर्यंतच मर्यादित ठेवत होते किंवा आहेत त्यांच्यापुढे एकूण शैक्षणिक क्षेत्रात स्त्रिया गुणवत्तेच्या बाबतीत पुरुषांना मागे टाकत असल्याचे चित्र आज दिसत आहे. आता तर स्त्री-संघटना हाही दावा करू लागल्या आहेत की, विकासाची समान संधी मिळताच स्त्रिया कोणत्याही आघाडीवर काम करू शकतात. स्त्री-शिक्षणाचा आलेख: १९५० नंतरचा २००१ पर्यंत दहा-दहा वर्षांचा याप्रमाणे १९५१-(८.८६ टक्के), १९६१-(१५.३४ टक्के), १९७१-(२१.९७ टक्के), १९८१-(२९.७५ टक्के), १९९१-(३९.२० टक्के), २००१-(५४.१६ टक्के).

परंपरागत कायद्यांनी जखडलेली स्त्री डॉ. बाबासाहेबांच्या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे, तर अर्थार्जन, सेवायोजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते. आर्थिक धोरण राबवण्याबाबत ३९व्या कलमानुसार उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री-पुरुषांना समान राहील, तसेच स्त्री-पुरुषांचे वेतन समान राहील. यामुळे स्त्रियांना एक बळकट आधार मिळाला. आज भारतात सर्वच क्षेत्रांत आय.ए.एस., वकील, न्यायाधीश, इंजीनिअर्स, डॉक्टर्स, बिझनेस मॅनेजमेंटमधील अधिकारी, इंजिन ड्रायव्हर्स, पायलट्सपासून ते ऑटो रिक्षा ड्रायव्हर्स, रेल्वे हमाल आणि पुरुष कर्तृत्वाचा जागेवर आपली कर्तृत्व सिद्ध केले आहे. फार तर, शिक्षिका, नर्सेस किंवा प्राध्यापिकांपर्यंत स्त्रिया मजल मारतील असे समजणाऱ्यांना यामुळे स्त्रियांनी चांगला धडा शिकवलेला आहे. एवढेच नव्हे तर, स्त्रियांची पुनर्निमितीची क्षमता व प्रकृती लक्षात घेऊन ४२व्या कलमात स्त्रियांसाठी प्रसूती साहाय्याची तरतूद केली आहे. हे सर्व फायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानामुळे स्त्रियांना मिळाले.



यात एका गोष्टीचा उल्लेख करण्याची गरज वाटते. कुटुंब नियोजनाच्या बाबतीत बाबासाहेबांनी, स्त्रियांचे आरोग्य व कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच संबंधित आहे, अशी स्पष्ट भूमिका होती.

हिंदू कोडबिलाचा या दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. स्त्रियांची कुटुंबातील स्थिती व समाजात मिळणारी प्रतिष्ठा याची जाणीव बाबासाहेबांना अस्वस्थ करून सोडत असे. पिढ्यान्पिढ्या या बिचाऱ्या कोणावर तरी अवलंबून, कधी पित्यावर, तर कधी पुत्रावर अवितरपणे खपत होत्या. पण कोणीही स्वतंत्रपणे तिला आर्थिक बळ कधीच पुरवले नाही. अर्थार्जनालादेखील तिला मनाई. पतीच्या मृत्यूनंतर किंवा दीर्घ आजारानंतर तिला कोणाची तरी मदत मागावी लागे. कधी पितृकुळी तर कधी श्वशुरगृही आणि तेही उपकारादाखल तिला मदत करत. माहेरी भावजयांचे टोमणे तर सासरी नणंदा-जावांचे छळणे सहन करत जगत राहणे, मुकाटपणे सोसणे एवढेच स्त्रियांना ठाऊक होते. ही परिस्थिती बदलून हिंदू कुटुंबाची सुधारणा करून स्त्रियांना अपमानजनक परिस्थितीतून बाहेर काढून सन्मानाचे स्थान व प्रतिष्ठा मिळवून द्यावी, यासाठी हिंदू संहिता विधेयक म्हणजे हिंदू कोडबिलाचे काम, प्रकृती वाईट असून देखील त्यांनी जिद्दीने हाती घेतले. कारण या विधेयकामुळे स्त्रियांची उत्थानदशा स्पष्ट होईल, असे त्यांना वाटत होते. त्यांनी या संहितीकरणात सात कायदे एकत्र समाविष्ट केले व हे बिल एकसाथ कायद्याचे समर्थन करणारे ठरून एका वेळेस संमत होईल, असे त्यांना वाटत होते. परंतु या बिलाला सर्व स्तरांतून विरोध झाला. त्या वेळेस स्त्रियांच्या संघटनांची निर्मिती व कार्यक्षमता आजच्या सारखी नव्हती. असे या बिलात कोणते कायदे होते? हे सात कायदे होते -

१) एखादा हिंदू मृत्युपत्र न करता

मरण पावला तर त्याच्या मिळकतीसंबंधी हक्कदार स्त्री-पुरुष म्हणजे २) मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार ३) पोटगी ४) विवाह ५) घटस्फोट ६) दत्तकविधान ७) अज्ञान पालकत्व.

वारसाचा हक्क मिळणे अतिशय महत्त्वाची बाब होती. कारण स्त्रियांना हा अधिकार मिळाल्याबरोबर त्यांची कुटुंबात किंमत वाढली. कारण तिच्या संमतीशिवाय



काहीही होणे, पित्याची किंवा पतीची मालमत्ता मिळणे, तिची विल्हेवाट लावणे आदी गोष्टी शक्य नव्हत्या. याचा परिणाम लहानशा खेडोपाडीदेखील दिसू लागला. स्त्रिया आपल्या हक्कासाठी सजग होऊन उठून उभ्या राहिल्या. काहींनी हक्क बजावला, तर काहींनी दयेने किंवा उपकाराच्या भूमिकेतून आपले हक्क सोडलेले असले तरी अधिकाराचा दिमाख त्या न कळत जाणवून देत होत्याच. त्या कायद्याला सर्वपक्षीय राजकारणी विद्वान मंडळींनी फार विरोध केला. कारण यामुळे म्हणे कुटुंबाचे तुकडे पडण्याचा धोका निर्माण झाला. परंतु पुरुष वारसदारासाठी अनेक तुकडे चालतात. स्त्रियांसाठी नाही, ही हिंदू पुरुष मानसिकतेची घडणच हतबद्ध करणारी आहे. आज या कायद्यामुळे स्त्रिया स्वाभिमानाने जीवन जगताना दिसतात.

दुसरा महत्त्वाचा कायदा, ज्याला बराच विरोध झाला आणि डॉ. बाबासाहेबांना खूप मनस्ताप सहन करावा लागला. तो होता विवाहाचा. द्विभार्या प्रतिबंध. केव्हाही बायको कितीही वयाची (लहान पोर) पुरुषांच्या लहरीने घरात आणली जायची आणि अगोदर रीतसर केलेल्या विवाहाची बायको ही पायपुसण्यासारखी घरातून फेकली जाई. हा पोरखेळ थांबवून स्त्रियांची ही मानहानी नष्ट करण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबासाहेबांनी केले.

डॉ .बाबासाहेबांना हिंदू कोडबिलाबद्दल किती आस्था होती हे त्यांच्याच शब्दांतून आपल्याला कळते. ते म्हणतात, मला वाटते हिंदू संहितेसाठी आपण आपल्या विधिमंत्री पदावर राहावे कारण हिंदू सामाजिक सुधारणेचे ते मोठे पाऊल होय, जे भारतीय कायदेमंडळाने पहिल्यांदा उचलले. न भूतो न भविष्यति अशा प्रकारचे हे बिल म्हणून अतिशय महत्त्वाचे आहे. वर्गातील असमानता व स्त्री-पुरुषातील असमानता, जी हिंदू समाजाचा प्राण आहे, तिला स्पर्श न करता सोडून देणे व आर्थिक समस्यांसाठी कायदे पारित करणे म्हणजे आमच्या राज्यघटनेचे हास्यापद विडंबन होय, शेणाच्या ढिगाऱ्यावर महाल बांधणे होय. या महत्त्वाच्या कारणासाठीच मला हिंदू कोड बिलाविषयी जिव्हाळा वाटतो. या बिलाबद्दल त्यांना अतिशय मनस्ताप सहन करावा लागला. त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे - In regard to this bill I have been made to go through the greatest mental torture.

या बिलाचे पारित न होणे आणि प्रधानमंत्र्यांनी विरोधकांसमोर नांगी टाकणे, हे एकच दुःख त्यांना होते. त्यामुळे नाइलाज होऊन त्यांना १० ऑक्टोबर १९५१ ला राजीनामा द्यावा लागला. आपण स्त्रियांसाठी जे काही ठोस केले, ते होत नाही असे दिसल्यावर त्याना नैराश्य आले. कारण लोकसंख्येच्या अर्ध्या भागाचा प्रश्न असा वाऱ्यावरच गेला होता. परंतु पुढे पं.नेहरूंनी राजीनाम्याची धमकी दिल्यावर ते बिल खंडाखंडाने पारित झाले. स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने बाबासाहेबांनी हे अलौकिक कार्य केले. या कार्यासाठी भारतातील स्त्री-वर्ग त्यांचा आजन्म ऋणी राहील. हे ऋण शब्दांद्वारे बोलकं करताना बॅ. सुनीती पुगलिया म्हणतात, डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोडबिलाचा आग्रह धरला. दलित समाजाचा नेता हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठीही निर्धाराने उभा राहिला. भारतीय स्त्री-स्वातंत्र्याचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल. तेव्हा राजा राममोहन रॉय, गोपाळ गणेश आगरकर यांच्याबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सुवर्ण अक्षरात लिहिले जाईल. आज भारतात स्त्री-मुक्तीची चळवळ जोमाने मूळ धरू लागलेली दिसत असताना, स्त्रिया स्वतःच्या मुक्तीचा मार्ग चोखाळत असताना, बाबासाहेबांनी केलेल्या कायद्याची शिदोरी घेऊनच पुढची वाटचाल करतात. स्त्री-मुक्तीतून स्त्री-वादाकडे नेण्यात हे कायदे तितकीच महत्त्वाची भूमिका निभावतात आणि म्हणून स्त्रियांच्या उत्थानात डॉ. बाबासाहेबांचे कर्तृत्व लोकोत्तर आहे, यात वादच नाही.

*(लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १४ एप्रिल १८९१ | महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म. |
| १९०७ | डॉ. आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली. |
| १९०७ | रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह. |
| १९१० | इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण. |
| १९१२ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. |
| २ फेब्रुवारी १९१३ | वडील सुभेदार रामजी यांचे निधन. |
| १ जून १९१३ | सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली. |
| १९१३ | उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना. |
| १९१५ | ॲन्शंट इंडियन कॉमर्स या प्रबंधावर एम.ए.ची उपाधी बहाल. |
| जून १९१६ | नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया ए हिस्टारिक अँड अनालिटिकल स्टडी प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत. |
| १९१६ | कास्ट इन इंडिया, देअर मेकॅनिझम जेनिसिस अँड डेव्हलपमेंट या निबंधाचे वाचन. |
| १९१६ | पीएच.डी.ची पदवी बहाल. |
| ११ नोव्हेंबर १९१८ | सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती. |
| ३१ जानेवारी १९२० | राजर्षी शाहू महाराज यांच्या साहाय्याने मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित. |
| १ मार्च १९२० | माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद. |
| १ मे १९२० | अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर. |
| १९२२ | बॅरिस्टरची परीक्षा पास |
| १९२३ | डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल. |
| २० जुलै १९२४ | 'बहिष्कृत हितकारिणी' सभेची स्थापना, मुंबई |
| जुलै १९२६ | राजरत्न या मुलाचे निधन. |
| १९ मार्च १९२७ | कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड. |
| ३ एप्रिल १९२७ | बहिष्कृत भारत पाक्षिकाचे प्रकाशन. |
| १९२७ | मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड. |
| ४ सप्टेंबर १९२७ | समाज समता संघाची स्थापना. |
| १३ नोव्हेंबर १९२७ | अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह. |
| २५ डिसेंबर १९२७ | महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन. |
| जून १९२८ | मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक. |
| २९ जून १९२८ | समता पाक्षिकाचा आरंभ. |
| २३ ऑक्टोबर १९२८ | सायमन कमिशनपुढे साक्ष. |
| १९२९ | अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण. |
| ३ मार्च १९३० | काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ. |
| २ ऑक्टोबर १९३० | लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना. |
| नोव्हेंबर १९३० | गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली. |
| २४ नोव्हेंबर १९३० | जनता साप्ताहिकाचा आरंभ. |
| १४ ऑगस्ट १९३१ | मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट. |
| ८ ऑक्टोबर १९३१ | अल्पसंख्यकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध. |
| २६ नोव्हेंबर १९३१ | गांधी-आंबेडकर-पंचम जार्ज यांची भेट. |
| २५ सप्टेंबर १९३२ | पुणे करारावर स्वाक्षरी. |
| २७ मे १९३५ | पत्नी रमाबाई यांचे निधन. |
| २ जून १९३५ | मुंबई, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती. |
| १३ ऑक्टोबर १९३५ | येवला, हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही. डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा. |
| मे १९३६ | जातिप्रथेचे उन्मूलन भाषण प्रकाशित. |
| ३१ मे १९३६ | मुक्ती कोन पथे विख्यात भाषण, मुंबई |
| १५ ऑगस्ट १९३६ | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना. |
| १७ फेब्रुवारी १९३७ | मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ. आंबेडकर विजयी. |
| १७ सप्टेंबर १९३७ | कोकणातील खोती नष्ट करण्याकरिता मुंबई विधिमंडळात बिल मांडले. |
| ४ जानेवारी १९३८ | पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण. |
| १२-१३ फेब्रुवारी १९३८ | मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद. |
| मे १९३८ | मुंबई विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून राजीनामा. |
| सप्टेंबर १९३८ | औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. |
| ७ नोव्हेंबर १९३८ | स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह. |
| जानेवारी १९३९ | महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद-कॉंग्रेसच्या शेतकरी-विरोधी-धोरणावर टीका. |

| | |
|---|---|
| २२ जून १९४० | मुंबई, सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट. |
| १९४० | थॉट्स ऑन पाकिस्तान ग्रंथाचे प्रकाशन. |
| एप्रिल १९४२ | अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना. |
| १९ जुलै १९४२ | भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर. |
| १९४२ | मजूर मंत्री म्हणून निवड. |
| १९ जाने.१९४३ | पुणे येथे विख्यात भाषण. रानडे, गांधी आणि जिन्ना. |
| जून १९४५ | काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले? ग्रंथ प्रकाशित. |
| २० जून १९४६ | मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना |
| १९४६ | शुद्र पूर्वी कोण होते? हा ग्रंथ प्रकाशित. |
| १७ डिसेंबर १९४६ | भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण. |
| ऑगस्ट १९४७ | भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश. |
| २९ ऑगस्ट १९४७ | संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड. |
| १५ एप्रिल १९४८ | डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह. |
| ऑक्टोबर १९४८ | दि अनटचेबल्स ग्रंथ प्रकाशित. |
| सप्टेंबर १९४८ | सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्या सोबत भेट. |
| ४ नोव्हेंबर १९४८ | घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला. |
| २५ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण. |
| २६ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीने घटना स्वीकार केली. |
| मे १९५० | बुद्ध आणि त्यांच्या धम्मा चे भवितव्य लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध. |
| २५ मे १९५० | कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| १९ जून १९५० | औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन. |
| मे १९५१ | लोकप्रतिनिधित्व विधेयक लोकसभेपुढे मांडले. |
| सप्टेंबर १९५१ | हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित. |
| २७ सप्टेंबर १९५१ | हिंदू कोडबिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा. |

| | |
|---|---|
| जानेवारी १९५२ | प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव. |
| मार्च १९५२ | राज्यसभेसाठी निवड. |
| ५ जून १९५२ | कोलंबिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी अर्पण. |
| १२ जानेवारी १९५३ | हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी अर्पण. |
| ३० जानेवारी १९५४ | महात्मा फुले बोलपट चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित. |
| मे १९५४ | भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव. |
| ३ ऑक्टोबर १९५४ | आकाशवाणीवर माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान भाषण. |
| २८ ऑक्टोबर १९५४ | माझे आयुष्य तीन गुरूंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले. |
| डिसेंबर १९५४ | रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| ४ मे १९५५ | भारतीय बौद्ध महासभा स्थापित. |
| ४ फेब्रुवारी १९५६ | मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली. |
| २४ मे १९५६ | नरेपार्क येथे ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईल अशी घोषणा केली. |
| १४ ऑक्टोबर १९५६ | नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. |
| १५ ऑक्टोबर १९५६ | बौद्ध धम्म का स्वीकारला या विषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपल्टीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण. |
| १६ ऑक्टोबर १९५६ | चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूना धम्मदीक्षा दिली. |
| २० नोव्हेंबर १९५६ | काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत बुद्ध आणि कार्लमार्क्स हे अभूतपूर्व भाषण दिले. |
| ६ डिसेंबर १९५६ | दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण. |
| ७ डिसेंबर १९५६ | मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार. |

*(लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)*

**धार्मिक ग्रंथातील विचारसरणी प्रमाण मानून विशिष्ट मानव समूहाला गुलाम बनवणाऱ्या विचारसरणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुराव्याच्या, तर्काच्या आधारे वस्तुनिष्ठ इतिहास मांडून छेद दिला. अर्थात पर्यायी इतिहासलेखनातून अस्पृश्यांचा, वंचितांचा पराक्रमी इतिहास मांडला म्हणून बदल म्हणजे इतिहास होय असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच एक इतिहासकार म्हणून उभे राहिले.**

# इतिहास मीमांसा

**डॉ. किशोर जोगदंड**

इतिहासाच्या संशोधनातून मानवी समूहाच्या अस्तित्वाचे, स्वत्त्वाचे व समस्यांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न निरंतरपणे घडत आला आहे. ऐतिहासिक ज्ञानातून वास्तवातील प्रश्न सोडवण्यासाठी उपयोग करून घेणे ही मानवाची गरज आहे. इतिहासकार हा मानवी समूहाचा एक घटक असतो याचे भान ठेवून त्याला इतिहासलेखन करावे लागते. कारण इतिहासलेखनाची प्रक्रिया ही संस्कारशील प्रक्रिया आहे. इतिहासकार, घटनेवर संस्कार करून ती घटना सबंध मानवी समूहासमोर मांडत असतो. इतिहास वास्तवाला अनेक प्रकारे प्रभावित करत असतो. समाजामध्ये विशिष्ट व्यक्तिचे, गटाचे वर्गाचे, जातीचे व पुरुषांचे प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इतिहासाचा विचारसरणी म्हणून अवलंब केला जात असतो.

## इतिहासाचा पाया रचला

न्यायाने, अन्यायावर विजय मिळवणे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ताकद आहे. ब्रिटिशांच्या अन्यायी नीतीला १८५७च्या उठावाने सुरूंग लावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यालाही अपयश आले; पण आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय समाजरचनेतील विषमतेचा चक्रव्यूह आपल्या बुद्धिवैभवाच्या जोरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भेदण्यात यशस्वी झाले आणि त्यांनी उपेक्षितांच्या इतिहासाचा पाया रचला. आजचे शूद्र पूर्वी क्षत्रिय वर्णाचाच भाग म्हणून मानले जात होते असे त्यांनी शूद्र पूर्वी कोण होते? या ग्रंथातून सांगितले. हा इतिहास भीमा कोरेगावच्या स्तंभातून अधिक स्पष्ट झाला. 'द प्राब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथात भारतीय रुपयाच्या झालेल्या अवमूल्यनाचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषण करून आर्थिक इतिहासाचा दृष्टिकोन दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासाचा आधार घेऊन अन्यायग्रस्त, पीडित, उपेक्षित, वंचित मानवी समूहामध्ये लढण्याची प्रेरणा निर्माण केली. सत्याचा अत्यंत कौशल्याने उपयोग करून इतिहासाची पुनर्मांडणी केली, त्यांनी इतिहास मीमांसा करताना चातुर्वण्य जातिसंस्था, अस्पृश्यता यांच्या निर्मितीचा इतिहास, त्याच्या संरक्षणासाठी निर्माण केलेले वाङ्मय, त्याच्याविरुद्ध इतिहासकाळात झालेले संघर्ष याची इतिहास मीमांसा केली. त्यांनी केलेल्या इतिहास मीमांसेला एक उपयोगिता होती. सामाजिक क्रांतीला पूरक व प्रेरक म्हणून ती इतिहास मीमांसा होती. सामाजिक परिवर्तनाचे साधन होती. त्यांनी केवळ इतिहासलेखन केले नाही, तर इतिहासाचा आधार घेऊन व उपयोग करून नवा इतिहास घडवला. अस्पृश्याच्या गुलामगिरीचे मूळ हे जातिव्यवस्थेमध्ये आहे हे ओळखून त्यांना जागे करण्यासाठी अविरत प्रयत्न करत राहिले. अस्पृश्यासाठी गांधी आणि काँग्रेसने काय केले? या ग्रंथात महात्मा गांधीजींना उद्देशून बाबासाहेब म्हणतात, 'चातुर्वण्य व्यवस्था आणि जातिव्यवस्था यांची हिंदू धर्मशास्त्रातून हकालपट्टी होईल, तेव्हा आम्ही हिंदू आहोत असे दलितांना म्हणता येईल. हे महात्मा गांधी व हिंदू सुधारकांना मान्य आहे का? त्याचा ध्येय म्हणून स्वीकार करणार का? त्यांच्या मते, खरे शत्रू जातिभेद पाळणारे लोक नसून त्यांना जातिभेद पाळावयास लावणारी शास्त्रे आहेत. थोडक्यात बाबासाहेब प्रश्न उपस्थित करून थांबत नाहीत, तर ते प्रश्न सोडवण्यासाठी पर्याय उपलब्ध करून



देतात आणि खरे पाहता हीच सच्च्या इतिहासकारांची कसोटी असते. ती कसोटी यशस्वीपणे पार पाडण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. हिंदू समाजव्यवस्थेत सुधारणा करण्याची भाषा बोलणे हे या वर्गातील लोकांना भयंकर पाप वाटते, असे बाबासाहेबांचे मत होते. ही मानसिकता आजही भारतीय समाजव्यवस्थेत दिसून येते. बदल घडवून आणण्यासाठी मानसिकतेवरच्या आजारावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घाव घातला होता. नव्हे त्याचे अग्रदूतच ठरले होते. प्रस्थापित बंदिस्त चौकटीची मांडणी, चिकित्सा करून पुराव्यानिशी त्याच्यातला खोटेपणा दाखवून देत आणि तत्कालीन समस्येवर उपाय ही त्यांनी आपल्या लिखाणातून, कृतीतून स्पष्ट केले. आपण मांडलेल्या मतांना उघडपणे प्रतिवाद करावा यांची तयारी ते ठेवत असत.

## इतिहास लेखनविषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कुठलाही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न ठेवता इतिहासाची मांडणी केली. ही मांडणी करताना काही परखड मतेही मांडली. हिंदू धर्मग्रंथाची चिकित्सा करताना म्हणतात, 'सत्य शोधून काढण्याच्या हेतूने ते वाङ्मय रूढ नियमांच्या कसाला लावून त्यांची पाहणी परीक्षा करावयाची ही इतिहासकारांची परंपरा आहे.'

प्रो. थॉर्नडाईक यांनी म्हटले की, माणूस विचार करतो, ही प्राणिशास्त्रसिद्ध बाब आहे आणि माणूस जो काही विचार करतो, ती समाजशास्त्रसिद्ध बाब आहे म्हणून घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा ठरतो. जर आपला दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित असेल तर ऐतिहासिक संशोधनाला हानिकारक ठरण्याची शक्यता असते. अशा संशोधनात स्वतंत्र बुद्धीची विचारशक्ती दिसून येत नाही. भौतिक विचाराची भर टाकता येत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शुद्र पूर्वी कोण होते? या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की, इतिहासकार हा कोटेकोर तळमळीचा आणि पंक्तिप्रपंच न करणारा असा असला पाहिजे. भावनारहित आपुलकीची भावना, भीती, तिरस्कार किंवा प्रेमाची ओढ त्याच्यापासून मुक्त असली पाहिजे, इतिहासाची जननी जी सत्यनिष्ठा ती रोमारोमात भिनलेली असली पाहिजे. महत्कृत्यांना सुरक्षित ठेवणारा, अंधाराचा संहार करणारा, पूर्व काळाचा साक्षी आणि भावी काळाचा नेता असा तो असला पाहिजे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, अगदी रिकामे नसणारे नव्हे पण उघडे असणारे त्याचे मन पाहिजे, खोटेनाटे पुरावे जरी त्याच्या हाती लागले तरी त्या सर्व पुराव्याची छाननी करण्याची त्यांची तयारी पाहिजे इतिहासकार, व्यक्ति या नात्याने



समाजाचा अपत्य असल्याकारणाने तो ज्या समाजात जन्माला आला त्या समाजाविषयी त्याला सहानुभूती असणे साहाजिकच आहे. या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे ते असे, जुन्या वाङमयातील सत्य व असत्य भाग शोधून काढताना तो ब्राह्मणेतर राजकारणाचे वारे आपल्या अंगात आणील हे संभवनीय असले तरी संशोधन करत असताना असल्या वृत्तीच्या आहारी मी गेलो नाही, याबद्दल मी खात्री देऊ शकतो. शुद्रासंबंधी लिहिताना माझ्या मनात शुद्ध इतिहासाच्या विचाराशिवाय दुसरा कोणताही विचार आला नव्हता. या देशात ब्राह्मणेत्तर चळवळ अस्तित्वात आहे ती शूद्राची राजकीय चळवळ आहे. हे सर्वांना माहीत होते. त्या चळवळीशी त्यांच्या संबंध होता. तरीसुद्धा बाबासाहेबांनी कुठलाही पूर्वग्रह दृष्टिकोन न ठेवता इतिहासलेखन केले.

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतिहासलेखन हे खुशामत करणारे नव्हते तर पूर्वीही तशीच स्थिती होती आणि आताही तशीच स्थिती आहे. म्हणून त्यात परिवर्तन करण्यासाठीची गरज म्हणून इतिहासलेखनाला सत्याचा पुरावा देऊन इतिहासलेखन केले. इतिहासाच्या संदर्भात बाबासाहेबांची व्याख्या मोठी उद्‌बोधक आहे. ते म्हणतात, इतिहास म्हणजे बदल होय. मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी, समतेसाठी न्यायासाठी आणि प्रत्येक मनुष्याला सन्मानाने जगता यावे यासाठीच बाबासाहेबांचे लेखन प्रेरणा देणारे आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि परखड मते काळाच्या कसोटीवर खरी ठरली, यातच त्यांच्या इतिहासलेखनाचे इतिहासाबद्दलच्या दृष्टीचे वेगळेपण स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ**


- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद), खरमोडे चांगदेव, शुद्र पूर्वी कोण होते? मिलिंद प्रकाशन, वर्धा, मार्च २००९.
- डॉ.बी.आर.आंबेडकर, व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टॅ द अनटचेबल्स, महाराष्ट्र शासन, फस्ट एडिशन, जानेवारी १९९१.
- बाली एम. आर., डॉ. आंबेडकर और भारतीय संविधान, भीम पत्रिका पब्लिकेशन, तृतीय संस्कारन, २०११.
- इतिहासलेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका: खंड-१ लोकवाङमय गृह प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च २०१०.
- य. दि. फडके २०व्या शतकातील महाराष्ट्र, खंड -३, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, २ ऑक्टोबर १९९१.
- मागाडे बाळासाहेब, (संपादक), समग्र बाबासाहेब थिंक टँक पब्लिकेशन, सोलापूर, प्रथमावृत्ती, मार्च २०१६.
- गायकवाड अशोक, (संपादक), समाजशास्त्रज्ञ डॉ. बी.आर. आंबेडकर, अनुप प्रकाशन, सोलापूर प्रथम आवृत्ती, १४ एप्रिल २०१३.
- मोरे शंकरराव, डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, जून १९९८.
- खरात शंकरराव (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, २०१४.
- धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, निसरी आवृत्ती, २००३.
- खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड ७, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८.


**(लेखक हे वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर येथे इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.)**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वांगीण कार्यात त्यांच्या शैक्षणिक विचारांचा आणि कार्याचा अविस्मरणीय वाटा दिसून येतो. डॉ. बाबासाहेब यांच्या विविध ग्रंथसंपदेतून सातत्याने शैक्षणिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेबांची शैक्षणिक चळवळ ही त्यांच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. शिक्षण हाच मानवाच्या प्रगतीचा मूळ गाभा आहे, असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा होता.**

# मानदंड व्यासंगाचा

जगभरातील अभ्यासकांना प्रेरणा देणाऱ्या बाबासाहेबांचा अर्थशास्त्र, राजकारण, समाजकारण, इतिहास, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, कृषी, जलसंधारण, कुटुंबनियोजन, भाषावार प्रांतरचना अशा विविधांगी ज्ञानशाखांचा सखोल अभ्यास होता. प्रत्येक विषयाचे विस्तृत विवेचन, अभ्यासपूर्ण मांडणी आणि सार्वकालिक उपयुक्तता ही त्यांच्या लेखनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

डॉ. बाबासाहेब एक निष्णात अर्थतज्ज्ञ होते. सैद्धान्तिक व व्यावहारिक आर्थिक प्रश्न दोन्हीबाबत त्यांनी अभ्यासपूर्ण दर्जेदार अर्थशास्त्रीय लेखन केले आहेत. एम.ए.ची पदवी संपादन करण्यासाठी १९१५ साली त्यांनी कोलंबिया विद्यापीठाला 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' या विषयावर प्रबंध सादर केला. १९३२ साली त्यांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी इट्स ओरिजन ॲण्ड इट्स सोल्युशन' हा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेला डी. एस्सी.साठी सादर केलेला अत्यंत मौलिक ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्यांनी रुपयाचा विनिमय दर, त्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या, भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम, त्यावरील उपाय याबाबत मूलगामी सैद्धान्तिक मीमांसा केली आहे.



### पुस्तकांवर जिवापाड प्रेम

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ प्रा. एडविन कॅनन यांनी या ग्रंथास प्रस्तावना लिहिली आहे. हा ग्रंथ एवढा महत्त्वाचा ठरला की, अवघ्या एक दोन वर्षातच त्याच्या सर्व प्रती संपल्या. १९२५ साली बाबासाहेबांचा दुसरा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध झाला. तो म्हणजे 'द इव्होल्युशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया : अ स्टडी इन द प्रोविन्शियल डिसेंट्रलायझेशन ऑफ इंपिरियल फायनान्स' हा होय. हा ग्रंथ म्हणजे पीएच.डी. पदवीसाठी कोलंबिया विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध होय. या ग्रंथात बाबासाहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या वित्तीय व्यवहारांची मूलगामी मीमांसा केली आहे. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या उत्पन्नाची साधने कोणती असावीत व त्यांनी कोणत्या गोष्टींवर खर्च करावा, यासंबंधीचे अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन बाबासाहेबांनी या ग्रंथात केले आहे. या ग्रंथाला कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक व प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ एडविन आर. सेलिग्मन यांनी प्रस्तावना लिहून या ग्रंथांची थोरवी व्यक्त करताना म्हटले आहे, 'प्रस्तुत विषयाच्या प्रतिपादनास डॉ. आंबेडकर यांनी फार मोठे योगदान दिले आहे. या योगदानाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सादर केलेल्या तपशिलाची वस्तुनिष्ठता आणि त्यांच्या स्वतःच्या देशात घडून येत असलेल्या महत्त्वपूर्ण स्थित्यंतरांचे (घटनेचे) निष्पक्षपाती विश्लेषण हे होय. त्यांच्या अभ्यासातून निघणारे निष्कर्ष हे इतर देशानांही लागू होणारे आहेत, याबाबतच्या सिद्धान्ताचा इतका तपशीलवार अभ्यास, माझ्या माहितीप्रमाणे दुसऱ्या कुणीही केलेला नाही.'

विद्यार्थीदशेपासूनच तल्लख बुद्धिमत्ता लाभलेल्या बाबासाहेबांचे वाचन आणि पुस्तकांवर जिवापाड प्रेम होते. एकवेळ त्यांना जेवणासाठी वेळ मिळाला नाही तरी चालत असे मात्र वाचनात, अभ्यासात व्यत्यय आलेला त्यांना चालत नसे. कोणत्याही विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यावर त्यांचा नेहमीच कटाक्ष होता. त्यामुळेच बाबासाहेबांचे विविध विषयांवरचे प्रभुत्व, परिपक्वता आणि बौद्धिक समृद्धी

त्यांच्या समग्र कार्यकर्तृत्वातून प्रकर्षाने अधोरेखित होत राहते.

त्यांच्या ग्रंथसंपदेत अर्थशास्त्रीय विषयावरील लेखनात इस्ट इंडिया कंपनी-प्रशासन आणि वित्त प्रणाली (१९१५), ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती (१९१७), भारतातील लहान जमीनधारणा समस्या आणि उपाय (१९१८), रुपयाचा प्रश्न - उदगम आणि उपाय (१९२३) हे ग्रंथ आहेत. तसेच समाजशास्त्रीय विषयावरील जातिनिर्मूलन (१९३६), महात्मा गांधी यांना उत्तर (१९३७), मुक्ती कोन पथे (१९३६) हे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय आणि एकंदरीतच सर्व लेखन प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आर्थिक समस्यांशी निगडित असूनदेखील त्यांचा दूरदर्शीपणा व त्यांच्या विचारातील सखोलपणा यामुळे त्यांचे लेखन देशाच्या काही आर्थिक समस्यांवर अगदी आजही उपयुक्त उपाय सुचवणारे आहे.



## मूलभूत लिखाण

अर्थतज्ज्ञ आणि कायेदपंडित असलेल्या बाबासाहेबांनी मानवी जीवनाशी निगडित अनेक ज्ञानशाखांचा अभ्यास करून त्याची सखोल मांडणी केलेली आहे. मानववंशशास्त्र हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामध्ये त्यांनी मूलभूत लिखाणही केलेले असून, त्यातील भारतातील जाती-त्यांची उत्पत्ती, विकास आणि प्रसार (१९२८), शूद्र पूर्वी कोण होते (१९४६), अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे झाले (१९४८) या ग्रंथांचा समावेश आहे.

## वृत्तपत्रीय लेखनातही हातखंडा

समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये स्त्रियांची प्रगती ही अत्यावश्यक बाब आहे. याची आग्रही मांडणी बाबासाहेबांनी सातत्याने केली. त्यासोबतच त्याला कायदेशीर अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी हिंदू कोडबिल १९५१ साली मांडले. या सर्व ज्ञानशाखांसोबतच बाबासाहेबांनी विविध धर्मांचाही अभ्यास केलेला होता. त्यातून त्यांनी द बुद्ध अँड हिज धम्म (१९५६-५७) बुद्ध आणि कार्ल मार्क्स (१९५६) या ग्रंथांचे लेखन केले. यासोबतच बाबासाहेबांनी विविध आयोग, कमिशन यांना तत्कालीन सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने वस्तुस्थितिदर्शक निवेदने, साक्षही दिलेली आहेत. जे कुठल्याही ग्रंथाइतकेच मार्गदर्शक आणि उल्लेखनीय आहेत. यामध्ये साऊथबरो कमिटी- १९१९, सायमन कमिशन- १९२८, गोलमेज परिषद- १९३०-३१, लोथियन कमिटी-१९३२, क्रिप्स सुधारणा प्रस्ताव-१९४२, कॅबिनेट मिशन- १९४६, ही निवेदने तसेच साक्षी पुरावे यांचाही समावेश आहे. संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य (१९३९), पाकिस्तान अथवा भारताची फाळणी (१९४०), रानडे, गांधी आणि जिना (१९४३), काँग्रेस आणि गांधी यांचे अस्पृश्यांविषयीचे धोरण (१९४५), सांप्रदायिक पेचप्रसंग आणि उपाय (१९४६), राज्य आणि अल्पसंख्याक (१९४७), महाराष्ट्र - एकभाषिक राज्य (१९४८), भाषावार प्रांतरचना - काही विचार (१९५५) यांचा समावेश आहे. त्यासोबतच समाजप्रबोधनासाठी प्रभावी माध्यम असलेल्या वृत्तपत्रीय लेखनातही बाबासाहेबांचा हातखंडा राहिलेला आहे. त्यांच्या जनता, समता, प्रबुद्ध भारत, मूकनायक यांमधील वृत्तपत्रीय लेखन, अग्रलेख हे सडेतोड व तत्कालीन वस्तुस्थितीवर प्रखर भाष्य करणारे आहेत.

डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम हे जगप्रसिद्ध असून ‘राजगृह’ या आपल्या मुंबईतील निवासस्थानी त्यांनी ग्रंथालयासाठी स्वतंत्र मजला राखीव ठेवून खास रचना केली होती. या वैयक्तिक ग्रंथसंग्रहात त्यांच्या अभ्यासविषयासह युद्धशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान यांसारख्या विविधांगी महत्त्वपूर्ण आणि दुर्मीळ ग्रंथांचा समावेश होता.

बाबासाहेबांनी आपल्या द्रष्टेपणातून देशासह समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेले मूलभूत चिंतन येत्या काळालाही दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणारे आहे. कारण सार्वकालिकता हा त्यांच्या सखोल चिंतनातून निर्माण झालेल्या ग्रंथसंपदेचे ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे आजही देशापरदेशातून त्यांच्या ग्रंथांची तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वावरील साहित्याची दरवर्षी विक्रमी विक्री होत असते.

**संदर्भ -**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, साहित्य संस्कृती मंडळ
- प्रज्ञा महामानवाची,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखनकार्य,खंड १, २, ग्रंथाली प्रकाशन

**शब्दांकन : वंदना थोरात–वारेगावकर**

डॉ. बाबासाहेबांच्या या ग्रंथाची तुलना १७५५ मध्ये डॉ. सॅम्युअल जॉन्सन यांच्या इंग्रजी शब्दकोशाशी केली जाते. मात्र त्यात एक मोठा फरक आहे. डॉ. जॉन्सनने जेव्हा इंग्रजीचा शब्दकोश लिहिला, तेव्हा इंग्रजी ही जागतिक भाषा होऊ पाहत होती, तर बाबासाहेबांनी जेव्हा पाली शब्दकोश लिहिला, तेव्हा पाली जवळपास एक मृत भाषा होती. मृत भाषा प्रवाहात नसल्यामुळे त्यातील वेगवेगळे शब्द शोधून, त्यांचे अर्थ व वाक्यरचना करणे हे महाकठीण काम बाबासाहेबांनी केले.

# पाली भाषेला योगदान

**अतुल भोसेकर**

कार्लाईलच्या मते सत्य हा थोर पुरुषाचा पाया आहे. मात्र जर सत्यनिष्ठा आणि बुद्धी बरोबरच समाजाच्या गतिमानतेबद्दल तळमळ असेल तर हा पुरुष, महापुरुष होत असतो कारण महापुरुष समाजाच्या शुद्धीकरणाचे आणि प्रशासकाचे काम करत असतो हे वाक्य आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रानडे, गांधी आणि जीना या भाषणांमधील. हीच कसोटी जर आपण बाबासाहेबांच्या कार्याला लावली तर लक्षात येईल की, बाबासाहेबांना महापुरुष म्हणून का संबोधले जाते!



## डॉ. बाबासाहेबांचे पाली भाषेबद्दलचे प्रेम

डॉ. बाबासाहेबांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक प्रवास हा थक्क करणारा आहे. असमानतेने जातिपातीत विभागलेल्या आणि कायम शोषित राहिलेल्या समाजाला स्वातंत्र्य, समतावादी व मानवमुक्ती आणि कल्याणाचा मार्ग असलेल्या बौद्ध धम्माची दीक्षा त्यांनी दिली. मात्र केवळ दीक्षा देऊन बाबासाहेब थांबले नाही, तर द बुद्ध अँड हिज धम्म आणि पाली व्याकरण व शब्दकोशासारखे दोन अद्वितीय ग्रंथ लिहिले. ज्यामुळे बाबासाहेबांचे पाली भाषेबद्दलचे प्रेम, आदर आणि दूरदृष्टी दिसून येते. या संदर्भात बाबासाहेब लिहितात, बौद्धधम्माच्या प्रसाराबद्दल लोकांमध्ये ज्या दिवसापासून आतुरता उत्पन्न झाली आहे त्या दिवसापासून बौद्धधम्म म्हणजे काय, व त्याचे वाङ्मय काय आहे, व कोठे काय मिळते यासंबंधाने भारतीय जनतेमध्ये अतिशय मोठे कुतूहल दिसून येते.

सन १९४० मध्ये म्हणजे वयाच्या पन्नाशीनंतर बाबासाहेबांनी पाली व्याकरण व शब्दकोश लिहिला. त्यांचे हे काम अद्वितीय होते. हा ग्रंथ, महाराष्ट्र शासनाने १९९८ साली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र लेखन आणि भाषणे या मालिकेतील १६वा खंड म्हणून प्रकाशित केला आहे. जगातील विविध भाषांचे शब्दकोश गेल्या १०० वर्षांत अनेक भाषातज्ज्ञांनी लिहिले आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या या ग्रंथाची तुलना १७५५ मधे डॉ. सॅम्युअल जॉन्सन यांच्या इंग्रजी शब्दकोशाशी केली जाते. मात्र त्यात एक मोठा फरक आहे. डॉ. जॉन्सनने जेव्हा इंग्रजीचा शब्दकोश लिहिला, तेव्हा इंग्रजी ही जागतिक भाषा होऊ पाहत होती, तर बाबासाहेबांनी जेव्हा पाली शब्दकोश लिहिला, तेव्हा पाली जवळपास एक मृत भाषा होती. मृत भाषा प्रवाहात नसल्यामुळे त्यातील वेगवेगळे शब्द शोधून, त्यांचे अर्थ व वाक्यरचना करणे हे महाकठीण काम बाबासाहेबांनी केले. या ग्रंथाचे चार प्रमुख भाग असून पहिल्या भागात, पाली इंग्रजी शब्दकोश आहे, दुसऱ्या भागात पाली मराठी, इंग्रजी, गुजराथी आणि हिंदी या भाषांचा विस्तारित शब्दकोश आहे, तर तिसऱ्या भागात पाली व्याकरण आणि चौथ्या भागात बौद्ध पूजापाठ आहे. एवढेच नव्हे, तर पाली भाषेतील वाक्यरचना कशी करावी व दोन व्यक्तींमधील घरगुती अथवा व्यावसायिक संवाद पालीमध्ये कसा असावा हेही बाबासाहेबांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे हा शब्दकोश जगातल्या इतर सर्व शब्दकोशांपेक्षा वेगळा ठरतो.

## पाली भाषेचे व्याकरण

चाईल्ड्‌र्सने पाली इंग्रजीमध्ये शब्दकोश लिहिला होता; पण सर्वसामान्य भारतीयांसाठी त्याचा उपयोग नव्हता. पालीमध्ये कच्चायन व्याकरण सर्वात जुने आहे. पाली व्याकरणासह वाक्यरचनेवर, त्याच्या धातू आणि प्रत्ययावर अनेक प्राचीन ग्रंथ आहेत. त्यामुळे पालीभाषेचे व्याकरण लिहीत असताना बाबासाहेबांना प्रचंड अभ्यास करावा लागला. या सर्व ग्रंथांचा अभ्यास करून, त्याची अतिशय सोप्या पद्धतीने मांडणी करून, सर्वसामान्यांनादेखील समजेल असे

व्याकरण आणि त्याची वाक्यरचना असे विलक्षण काम बाबासाहेबांनी आपल्या ग्रंथात केले आहे. त्यामुळे पाली भाषा व तिचे व्याकरण शिकताना सोयीचे जाते. भविष्यात भारतात बौद्ध धम्माचे आकर्षण वाढेल आणि बुद्धविचार समजून घेण्यासाठी लोक पाली भाषा शिकतील हा दूरदृष्टीपणा ठेऊन बाबासाहेबांनी पाली शब्दकोश व व्याकरण हा ग्रंथ लिहिला जो आजही पाली भाषा शिकण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

सम्राट अशोक यांनी महिन्द आणि संघमित्ता यांना श्रीलंकेत बुद्धविचारांचा प्रसार करण्यास पाठवले. भन्ते महिन्द यांनी त्यांच्याबरोबर पाली त्रिपिटक आणि त्याच्या अट्ठकथा घेऊन गेले. कालांतराने त्यांनी त्याचे 'सिंहली' भाषेत भाषांतर केले. काही कारणास्तव मूळ पाली अट्ठकथा नष्ट झाल्या. त्या वेळेस इ.स. ५व्या शतकात, अत्यंत विद्वान, बौद्ध आचार्य बुद्धघोष यांनी श्रीलंकेत जाऊन या सर्व सिंहली अट्ठकथांचे भाषांतर पाली भाषेत केले. चाईल्ड्र्सच्या म्हणण्यानुसार, आचार्य बुद्धघोष यांच्यासारख्या विद्वान, पालीभाषेच्या आचार्यांनी लिहिलेल्या अट्ठकथा पुन्हा पालीभाषेत लिहून संपूर्ण जगावर, विशेषतः बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांवर मोठे उपकार केले आहेत. कालांतराने बुद्धविचार जसे शेजारील देशांत पोहचले तसे पाली त्रिपिटक आणि अट्ठकथांच्या प्रती थायलंड, बर्मा व इतर देशांत पोहोचल्या. बुद्धघोषांनी लिहिलेले मूळ अट्ठकथा आणि अर्हत महिन्द यांच्या सिंहली भाषेतील पाली त्रिपिटक हे श्रीलंकेतील अनुराधापुर येथील विहारात ठेवल्या होत्या. १२व्या शतकात श्रीलंकेवर आक्रमण केलेल्या चोला राजांनी अनुराधापुर लुटले. ते बुद्धविचारांचे विरोधक असल्याने त्यांनी सर्व बौद्ध ग्रंथ नष्ट केले. यात अर्हत महिन्द यांचे सिंहली भाषेतील त्रिपिटक आणि बुद्धघोष यांच्या पाली अट्ठकथा नष्ट करण्यात आल्या. मात्र हे पाली ग्रंथ इतर देशांत सुरक्षित असल्याने नंतरच्या काळात त्यांचा प्रसार जगभर झाला.

### द बुद्ध अँड हिज धम्म

'द बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिताना बाबासाहेबांना संपूर्ण त्रिपिटक आणि इतर बौद्ध ग्रंथ वाचावे लागले. त्यावेळेस, त्यांनीच लिहिलेल्या पाली



व्याकरण व शब्दकोश या ग्रंथाचा उपयोग त्यांना झाला. 'द बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिताना बाबासाहेबांनी संपूर्ण पाली त्रिपिटकाचा अभ्यास केला होता, याची साक्ष या ग्रंथाच्या प्रत्येक पानावर दिसते. त्या काळी अस्पृश्य म्हणून हिणवले गेलेल्या समाजाला बौद्ध धम्माची दीक्षा द्यायची हे बाबासाहेबांनी निश्चित केलेच होते, मात्र नवदीक्षित झालेल्या समाजाला तसेच ज्यांना बुद्धविचार समजून घ्यायचेत त्यांच्यासाठी सोप्या भाषेतील ग्रंथ त्यांना लिहायचा होता.

१९५० ते ५६ या कालावधीत बाबासाहेबांनी प्रकृती साथ देत नसतानाही अतिशय सखोल आणि तार्किकरीत्या हा ग्रंथ निर्माण केला. पाली त्रिपिटकामधे काही विरोधभासी वाक्यांवर बाबासाहेबांनी प्रश्न उपस्थित केले व भ.बुद्धांच्याच पालीवचनांचा आधार घेत स्पष्टीकरणही दिले. या ग्रंथात बाबासाहेबांनी तळटीप न दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर काही जणांनी या ग्रंथावर शंका घेतली. मात्र १९६१ मध्ये डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांनी बाबासाहेबांच्या ग्रंथातील कोणते वाक्य त्रिपिटकमधील कोणत्या सुत्तातील आहेत हे शोधून काढले व बाबासाहेबांनी लिहिलेला 'द बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथाला पाली त्रिपिटकच आधार असल्याचे सिद्ध केले. पाली त्रिपिटक हे तुलनेने प्रचंड आहे. बायबलपेक्षा ११ पटीने मोठे आहे. पिढी दर पिढी मौखिक रूपाने बुद्ध वचनांचा प्रसार होत होता. त्यामुळे नकळतपणे त्यात काही अघटित घटनांचा उल्लेख आला आहे. बाबासाहेबांनी अशा प्रत्येक घटनेचे खंडन केले आहे व सर्वसामान्यांना बोध होईल, असा बुद्धांचा इतिहास आणि त्यांचा धम्म लिहिला.

महापंडित राहुल सांकृत्यायन यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात, बौद्ध धम्म पुनर्जीवित करताना असा खांब रोवला आहे की, कोणी तो हलवू शकणार नाही'.

बौद्ध धम्म आणि बौद्ध समाजासाठी जे योगदान बाबासाहेबांनी नागपूर येथे दीक्षा देऊन केले त्यापेक्षा कैकपटीचे योगदान बाबासाहेबांनी हे दोन ग्रंथ लिहून दिले आहे.' डॉ. बाबासाहेबांना खरी आदरांजली अर्पण करायची असेल, तर पाली भाषा आणि बौद्ध संस्कृतीचा अभ्यास करून, आपण ती आदरांजली द्यायला हवी तरच या महापुरुषाच्या कष्टाचे चीज होईल!

**कष्टकरी, मजूर, शोषित, पीडित समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून योग्य ते कायदे केले आहेत. समस्त कामगार, शेतकरी, शोषित, पीडित, विद्यार्थी अशा सर्वांनाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे. कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी लढा दिला व कामगारांना न्याय मिळवून दिला.**

# डॉ. बाबासाहेब आणि कामगार चळवळ

**प्रा. डॉ. प्रवीण बनसोड**

भारतीय परिप्रेक्ष्यामध्ये जातिव्यवस्थेच्या जोडीला आर्थिक विषमतेचा प्रश्न प्रामुख्याने भेडसावत असतो. समाजातील जातिभेद, जातीयविषमता आणि अस्पृश्यतेच्या चक्रव्यूहात दारिद्र्य, बेरोजगारी, अनारोग्य, अज्ञान यासारख्या समस्या निर्माण झाल्याने त्याचा सरळ परिणाम मानवी विकास आणि कष्टकऱ्यांच्या जीवन पद्धतीवर होत असतो. कष्टकरी, मजूर, शोषित, पीडित समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून योग्य ते कायदे केले आहेत. भांडवलदार आणि श्रीमंत यांना भेदभावाची वर्तणूक करण्यापासून रोखण्याचे अतिशय महत्त्वाचे आणि अवघड काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या कायद्यानुसार केले आहे. समस्त कामगार, शेतकरी, शोषित, पीडित, विद्यार्थी अशा सर्वांनाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे. कामगारांचे प्रश्न, त्यांची परिस्थिती, समस्या, व्यथा त्यांनी जवळून बघितल्या होत्या. हे प्रश्न किंवा समस्या सोडवण्यासाठी आणि कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी नेहमी लढा दिला व कामगारांना न्याय मिळवून दिला. अशा वेळी कामगार आणि कष्टकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा आणि सन्मानाचा जाहीरनामाच सर्वांसमोर मांडला.



### कामगार चळवळ : जागतिक संदर्भ

इ.स. १८२७ साली फिलाडेल्फियामध्ये कामाचे तास दहावर आणण्यासाठी बांधकाम उद्योगातील कामगारांचा संप घडविण्याचे श्रेय जगातील पहिली ट्रेड युनियन मानल्या गेलेल्या 'मेकॅनिक्स यूनियन ऑफ फिलाडेल्फिया'ला जाते. १८३४ साली न्यूयॉर्कमध्ये बेकरी कामगारांच्या संपादरम्यान 'वर्किंग मेन्स ॲडव्होकेट' नावाच्या वृत्तपत्राने छापले होते की, 'पावरोटी उद्योगात काम करणारे कारागीर अनेक वर्षांपासून इजिप्तच्या गुलामांपेक्षा जास्त यातना सहन करत आहेत. त्यांना दर २४ तासांपैकी सरासरी १८ ते २० तास काम करावे लागते. याच दरम्यान जगातील काही भागांमध्ये काम करण्याच्या तासांवरून आंदोलने करण्यात येत होती. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशामध्ये ही आंदोलने जोरात सुरू होती. ऑस्ट्रेलियात १८५६ मध्ये तर अमेरिकन काँग्रेसने १८६८ मध्ये आठ तास कामाचा कायदा पास केला. याशिवाय स्त्रियांच्या बाबतीत अनेक प्रश्नांबाबत सर्वत्र चर्चा सुरू होती. या वेगवेगळ्या आंदोलनातून पुढे कामगारांचे प्रश्न जगासमोर येऊ लागले. '१ मे कामगार दिन' आणि '८ मार्च जागतिक महिला दिन' हे दिवस याच लढ्याच्या स्मरणार्थ जगात सर्वत्र साजरे करण्यात येतात.

इ.स. १७९९ ते १८०९ या मुदतीत इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या कायद्यामध्ये (कॅम्बिनेशन ॲक्ट) कामगारांनी आपली संघटना उभी करणे हे बेकायदेशीर होते. या कारणामुळे सुरुवातीच्या काळात कामगार संघटना गुप्तपणे कार्यरत होत्या. इंग्लंडमध्ये पहिला राजकीय पक्ष 'इंडिपेन्डंट लेबर पार्टी' १८९३ मध्ये जन्माला आला, तो आज 'मजूर पक्ष'

म्हणून ओळखला जातो.

एकत्रित येऊन मागण्या केल्यास आपला प्रभाव मालकांवर पडू शकतो, याचा अनुभव आल्याने कामगार एकत्रित येऊ लागले, लढू लागले. अमेरिकेतील कामगारांनी १ मे १८८६ रोजी सार्वत्रिक संपाचे हत्यार उपसल्याने जागतिक पटलावर कामगार वर्गाविषयी जागृती होऊ लागली. कार्लमार्क्स यांनी सन १८६९ मध्ये लंडन येथे कामगारांची पहिली आंतरराष्ट्रीय संघटना "International Working Men's Association" स्थापना केली. त्यामुळे जागतिक पातळीवर नवा विचारप्रवाह निर्माण झाला. १९१७ साली रशियात राज्यक्रांती झाल्याने संपूर्ण जगाचे लक्ष्य वेधले गेले.

## कामगार चळवळ आणि भारत

भारतात सत्यशोधक समाजाचे नेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नातून १८८५ साली कामगार वर्ग संघटित होण्यास सुरुवात झाला. जी.आय.पी. रेल्वेच्या सिग्नल खात्याच्या लोकांनी १८८५ मध्ये संप केला, तर १९०५ साली वंगभंग चळवळीतून आगगाडी कारखाना, कापड गिरण्या आणि सरकारी छापखाण्यातील कामगारांचे संप झाले. १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन'ची स्थापना झाली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षा'ची १९३६ मध्ये स्थापना केली. पुढे बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत कष्टकरी कामगारांबाबत महत्त्वाचे कायदे केले.

स्वातंत्र्योत्तर काळात कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय कामगार चौकशी आयोग २४ डिसेंबर १९६६ रोजी न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. या आयोगाने ८ ऑगस्ट १९६९ रोजी अहवाल शासनास सादर केला. मात्र या अहवालात औद्योगिक कामगारांबाबत काही त्रुटी प्रामुख्याने होत्या. या अहवालामध्ये असंघटित, ग्रामीण कामगारांबाबत फारसा विचार करण्यात आला नाही. परंतु त्यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून कामगारांसाठी ठोस तरतुदी केल्या होत्या.

**अनुच्छेद ४१ :** राज्य हे आपल्या आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क, बेकारी, वार्धक्य, आजार, विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत लोकसाहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.



**अनुच्छेद ४२ :** राज्य हे कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसूतीविषयक साहाय्यासाठी तरतूद करील.

**अनुच्छेद ४३ :** राज्य हे यथायोग्य, विधी-विधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक वा सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि विशेषत: ग्रामीण क्षेत्रामध्ये कुटीर उद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

**अनुच्छेद ४३-क :** राज्य हे कोणत्याही उद्योगात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे, यासाठी यथायोग्य विधी-विधानाद्वारे किंवा अन्य मार्गाने उपाययोजना करील.

अशा प्रकारे संविधानाने आर्थिक न्याय, सामाजिक सहभाग, रोजगार आणि कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती याची तरतूद केली आहे. १८९१ साली जो फॅक्टरी ॲक्ट निर्माण झाला. त्यामध्ये अनेक चांगल्या तरतुदी केवळ नारायण मेघाजी लोखंडे यांच्या आग्रहामुळे आल्या होत्या, त्याची फलश्रुती वरील तरतुदीतून घडू शकली.

## डॉ. आंबेडकर यांची कामगार धोरणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अभ्यासाचा मुख्य विषय अर्थशास्त्र हा होता. 'बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीचे सदस्य असताना (१९२६) ग्रामीण भागातील दारिद्र्याच्या समस्येचे समग्र आकलन त्यांनी उभारलेल्या आंदोलनातून प्रतिबिंबित होते. शेतीमधील खोती पद्धतीविरुद्ध त्यांनी आवाज उठवून ग्रामीण कामगारांना न्याय दिला. 'महार वतन' या

नावाखाली सुरू असलेल्या गुलामगिरीविरुद्ध त्यांनी आवाज उठवल्यानंतर ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांचा फार मोठा वर्ग जागृत झाला. 'व्हॉइसरॉयज एक्सिक्युटिव्ह कॉन्सिलचे कामगार सदस्य या नात्याने १९४२ ते १९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारविषयक धोरणात आमूलाग्र सुधारणा सुचवल्या. त्यामध्ये सेवायोजन कार्यालयाची स्थापना ही महत्त्वाची सूचना होती.

'स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज' नावाने ब्रिटिश सरकारला इ.स. १९४७ साली सादर केलेल्या टिप्पणीमध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार करून लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे तसेच खासगी उत्पादकांना कोणतीही आडकाठी न करता आणि संपत्तीचे समान वाटप होईल अशा पद्धतीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे दायित्व आहे, असे त्यांनी नमूद केले होते.

स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी अधिकार, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समतेसाठी अथक प्रयत्न केले. 'सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्ष करून राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही', असा खणखणीत इशाराच त्यांनी दिला होता. 'डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ दि स्टेट पॉलिसी' हा अनुच्छेद घटनेत समाविष्ट करून त्यांनी आर्थिक लोकशाहीचा हेतू स्पष्टपणे विषद केला. परंतु त्यापूर्वीच १९४२ ते १९४६ या कालखंडात व्हाईसरॉय मंत्रिमंडळातील मजूर मंत्री म्हणून कामगारांच्या प्रश्नाबाबत महत्त्वपूर्ण भाषणे व लेख लिहिले होते. १३ नोव्हेंबर १९४३ रोजी भारतीय श्रमिक संघटना कायद्यामध्ये दुरुस्ती करणारे विधेयकही त्यांनी विधिमंडळामध्ये मांडले. या विधेयकामध्ये कामगार संघटनांना मान्यता देण्याचे बंधन मालकांवर टाकण्यात आले होते. तसेच कामगार संघटनांनी पूर्तता करायच्या अटीही त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केल्या होत्या. १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पक्षाच्या जाहीरनाम्यातच कारखान्यातील कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या हिताला अनुसरून कार्यरत राहण्याची ग्वाही दिली होती.

सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विभाग मंडळामध्ये मांडण्यात आलेल्या औद्योगिक विवाद विधेयकावर तुटून पडताना आपल्या भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'संप म्हणजे स्वातंत्र्याच्या हक्काचे दुसरे नाव आहे. प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क आहे असे कबूल करता, तर प्रत्येक कामगाराला संप करण्याचा अधिकार आहे हेही तुम्हाला कबूल करावे लागेल.' डॉ. बाबासाहेबांनी या विधेयकातील सक्तीच्या तडजोडीच्या कलमाला कडाडून विरोध केला. व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये डॉ. बाबासाहेबांनी २० जुलै १९४२ रोजी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हातात घेतली. १९४२ ते १९४६ या कालावधीत ते या पदावर कार्यरत होते. याच काळामध्ये बाबासाहेब कामगारांच्या हितसंबंधाचे संरक्षक व उद्धारक ठरले. बाबासाहेबांनी कामगारांचे प्रश्न, अडचणी, व्यथा, व परिस्थिती जवळून बघितली त्यामुळे कामगारांविषयी त्यांना जाणीव होती. या वेळी विविध परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि व्यासपीठावरून केलेल्या भाषणामधून देशातील कामगारांचे हितरक्षण व कल्याणकारी धोरणांचा पाया घातला. १९५३ साली 'मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३' हा कायदा गठित करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ध्येयधोरणे कारणीभूत ठरली.

## खोती–जमीनदारी पद्धती नष्ट करणारे भारतातील पहिले विधेयक सादर

१७ सप्टेंबर १९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विधिमंडळात खोती-जमीनदारी पद्धती नष्ट करणारे भारतातील पहिले विधेयक सादर केले. १ जुलै १९३८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक महत्त्वाचे पत्रक प्रसिद्ध केले. 'शेठ-सावकारांचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य नव्हे,' असे या पत्रकाचे शीर्षक होते. या पत्रकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे श्रमिकांच्या जीवनाविषयीचे समग्र चिंतन आणि विचारांचे दर्शन घडते. २६ नोव्हेंबर १९४५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित सातव्या भारतीय श्रमिक परिषदेपुढे श्रममंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातूनसुद्धा कामगारांबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.


## डॉ.आंबेडकरांनी कामगार कल्याणाचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा केला

सर्वात भयावह समस्या ही बेकारीची समस्या आहे. श्रमिकांचे जीवनमान खालावू नये, म्हणून या समस्येच्या समाधानाकरिता आम्हाला जे काही शक्य आहे ते आम्ही केलेच पाहिजे आणि तेसुद्धा तातडीने केले पाहिजे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यास तीन गोष्टी अनिवार्य आहेत, असे माझे मत आहे. पहिली म्हणजे कामाचे तास कमी करणे जेणेकरून अनेकांना रोजगार मिळेल. दुसरी म्हणजे किमान वेतन यंत्रणा निर्माण करणे, अशा यंत्रणेच्या अभावाला बेरोजगारीची साथ मिळाली, तर श्रमिकांच्या जीवनस्तरात घसरण होणार हे अपरिहार्य आहे. याला प्रतिबंध केलाच पाहिजे. तिसरी म्हणजे, कारखानदार आणि कामगार यांना सामूहिक वाटाघाटी व अन्य सर्वसाधारण समस्यांमधून मार्ग काढण्यास एकत्रित काम करणे हे शिकण्याचा प्रस्ताव असला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार कल्याणाचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा केला, असे म्हणता येईल. कारण कामगारांच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढा देऊन अन्यायाला वाचा फोडली आणि आजच्या कामगाराला खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिला. वरील भाषणातून बाबासाहेबांचा कामगार वर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती विशाल होता हे स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला लोकशाहीची नवीन व्याख्या दिली. मूलभूत हक्क, सामाजिक लोकशाही व आर्थिक लोकशाही मिळाल्याशिवाय कामगार, शेतकरी, शोषित श्रमिकांना त्यांचे हक्क प्राप्त होणार नाही, याची जाणीव आणि नवे भान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांना करून दिले.

(लेखक हे नेहरू कला वाणिज्य
विज्ञान महाविद्यालय, नेरपरसोपंत, यवतमाळ
मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.)

**भारताच्या सामाजिक स्वातंत्र्य लढ्यातील महान योद्धे व संविधान सभेतील मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला अनेक मौल्यवान गोष्टी दिलेल्या आहेत. त्यांनी प्रचंड मोठ्या बौद्धिक परिश्रमातून भारतीय संविधानाचे शिल्प घडवले आणि भारत या आधुनिक राष्ट्राची पायाभरणी झाली.**




# संविधाननिष्ठ राष्ट्रवाद

**प्रा. अनंत राऊत**

एक राष्ट्र बनण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांमध्ये धर्म, वंश, जात, भाषा हे घटक महत्त्वाचे असतात असे अनेक जण मानतात; परंतु असे मानणे योग्य नाही. अशा घटकांची वैविध्यता बाळगूनही एकजीव अशा राष्ट्राची निर्मिती करता येऊ शकते, ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून पुढे येते. राष्ट्र संकल्पनेसंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार आधी लक्षात घेऊ. ते असे म्हणतात की, 'राष्ट्रीयत्व ही एक सामाजिक ऐक्यभावना आहे. राष्ट्रातील लोकांना वाटते की आपण सर्व परस्परांचे नातलग आहोत.' 'राष्ट्रीयत्व ही दुधारी भावना आहे, समान राष्ट्रीयत्व असलेल्यांविषयी ती आपुलकीची भावना निर्माण करते, तर इतरांविषयी शत्रुत्वाची भावना उत्पन्न करते. राष्ट्रीयत्वाची भावना त्या लोकांना एका बाजूने एवढी घट्ट बांधून ठेवते की, त्यांच्यातील आर्थिक संघर्ष किंवा सामाजिक विषमता अशा गोष्टींवरही ती मात करते; दुसऱ्या बाजूने त्यांना इतरांपासून तोडते.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्र व राष्ट्रवाद या संदर्भात अशीही भूमिका मांडतात की,' राष्ट्रीयत्व व राष्ट्रवाद यात फरक आहे. या मानवी मनाच्या दोन मानसिक अवस्था होत. राष्ट्रीयत्व म्हणजे वेगळेपणाची जाणीव. वेगळेपणा दाखवणाऱ्या एकत्वाची जाणीव. राष्ट्रवाद म्हणजे एकत्व पावलेल्या लोकांची राष्ट्रीय अस्तित्वाची आकांक्षा. हे खरे आहे की राष्ट्रीयत्वाशिवाय राष्ट्रवाद असू शकत नाही. परंतु त्याचा प्रत्यय नेहमीच सत्य असेल असे नाही. प्रत्येक वेळी राष्ट्रीयत्वातून राष्ट्रवादाचा जन्म होतोच असे नाही. राष्ट्रीयत्वापासून राष्ट्र निर्माण होण्यासाठी दोन अटींची गरज असते. म्हणजे राष्ट्र म्हणून राहण्याची इच्छा असली पाहिजे. या इच्छेचेच ज्वलंत प्रकटीकरण म्हणजे राष्ट्रवाद. दुसरी गोष्ट म्हणजे त्यासाठी एक भूमी पाहिजे, की जिथे राष्ट्रवाद कार्यान्वित होईल व ती भूमी एक राज्य व सांस्कृतिक आधारस्थान बनेल. अशा भूमीअभावी राष्ट्रवाद म्हणजे अस्तित्वासाठी देहाच्या शोधार्थ भटकत असलेला आत्मा ठरेल.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्र व राष्ट्रवादासंदर्भातील वैचारिक भूमिका पृथ्वीवरील विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या सर्व समूहांमध्ये नातलग भाव असला पाहिजे असे मानणारी आहे.



## संविधानात मानवी मूल्यांचा समावेश


परस्परांमध्ये रक्ताचे नाते असलेल्या लोकांमध्ये परस्परांच्या बद्दल जो प्रेमभाव असतो, त्यालाच नातलग भाव असे म्हणता येईल. परस्पर प्रेमभावातूनच विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या सर्व समूहांमध्ये एकजीवता निर्माण होऊ शकते, असे

मानणारी आहे. या भूमिकेच्या प्रभावातूनच भारत या आधुनिक राष्ट्राची निर्मिती एकच एक धर्म, वंश, जात, भाषा या घटकांना बाजूला सारून सर्व समूहातील भारतीय नागरिकांनी आत्मीयतेने वागले पाहिजे, असे मानणाऱ्या संविधानाच्या आधारावर झालेली आहे.

संविधान हा आधुनिक काळातील राष्ट्रनिर्मितीचा महत्त्वपूर्ण घटक असतो. कोणतेही आधुनिक राष्ट्र उभे असते ते संविधानाच्या पायावर. विशिष्ट भूप्रदेशावरील लोकांचे एक राष्ट्र घडवणारा संविधान हा मूलभूत असा तात्त्विक व कायदेशीर आधार असतो. संविधान आपल्या आदर्श नियमांनी व मूल्यात्मक धाग्यांनी राष्ट्रातील समग्र जनतेला एकत्रित गुंफत असतो. माणसाच्या शारीरिक व मानसिक अस्तित्वाच्या चैतन्यशील चलनवलनात मेंदू या घटकाला जेवढे महत्त्वाचे स्थान असते, तेवढेच राष्ट्र या संकल्पनेच्या चैतन्यशील चलनवलनात संविधान या घटकाला महत्त्वपूर्ण असे स्थान असते. आधुनिक काळात संविधानाशिवाय कोणतेही राष्ट्र अस्तित्वात येऊ शकत नाही व घडूही शकत नाही. ज्याला कुठलेही संविधान नाही, असे कोणतेच राष्ट्र आज अस्तित्वात असू शकत नाही.

राष्ट्र या संकल्पनेच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक असलेल्या काही मूलभूत घटकांना केंद्रस्थानी ठेवून राष्ट्र संकल्पनेसंदर्भात मी अशी भूमिका मांडतो की, 'पृथ्वीवरील नैसर्गिक अथवा कृत्रिम सीमांनी बंदिस्त असलेल्या विशिष्ट भूप्रदेशातील असे लोक, की ज्यांचे मूलभूत हितसंबंध सारखे आहेत. जे आपल्या भूप्रदेशासंदर्भातील नजीकच्या इतिहासाकडून प्रेरणा घेऊन नवराष्ट्र निर्माणाच्या उदात्त ध्येयवादाने प्रेरित होऊन कार्यरत आहेत. ज्यांनी संघटितपणे परकीय सत्ता झुगारून स्वातंत्र्य व सार्वभौमत्व प्राप्त केले आहे. ज्यांच्यात मानवनिर्मित धर्म, जात, भाषा, संस्कृती असे काहीसे वेगळेपण असले तरी जे आपल्या अशा वैविध्यतेला भूषण मानून त्यांचा गौरव करत व परस्परांचा आदर करत मानसिकदृष्ट्या एकजीव होऊन आपल्या भूप्रदेशातील लोकांमध्ये सेंद्रिय एकजीवता आणू पाहतात, एका कुटुंबातील माणसे ज्याप्रमाणे परस्परांच्या सुखदुःखात सहभागी होऊन परस्परांना जीव तोडून मदत करतात, ज्यांनी एक राष्ट्र म्हणून वाटचाल करण्याची प्रागतिक दिशा देणारे स्वतःचे संविधान बनवलेले आहे व जे आपल्या संविधानाला मूलभूत मार्गदर्शक ग्रंथ मानून त्यातील तत्त्व व मूल्यांना अनुसरून आपल्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनातील प्रत्येक पाऊल टाकतात, त्यांना एक राष्ट्र म्हणता येईल. राष्ट्र हे सांविधानिक मूल्यधाग्यांनी सेंद्रिय रीतीने एकत्रित गुंफलेले नागरिकांचे संघटन असते, असेही म्हणता येईल.

जे लोक स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, सेक्युलरिझम, सहिष्णुता, सेवा, सहकार, त्याग, बुद्धिवाद विज्ञानवाद या मूल्यांना आपल्या जीवनात सर्वोच्च स्थान देऊन वावरतात. ज्यांनी हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करून परस्परांमधील प्रश्न शांततामय अशा चर्चेच्या मार्गाने सोडवण्याचा निश्चय केलेला आहे. ज्यांनी एक संविधान, एक राष्ट्रध्वज, एक राष्ट्रगान, एक फौज, एक संसद, एक प्रधानमंत्री किंवा एक राष्ट्राध्यक्ष, एक सर्वोच्च न्यायालय, एक निवडणूक आयोग, एक रिझर्व बँक, एक मुद्रा, एक प्रशासन व्यवस्था या गोष्टींचा मनोमन स्वीकार केलेला आहे. जे लोक आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी सदैव तयार असतात. जे आपल्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदैव झटतात, असे लोक स्वतःस एक राष्ट्र म्हणवून घेण्यास पात्र होत असतात. ज्या भूभागावरील लोक वरील प्रकारच्या मानसिकतेतून सर्व प्रकारचे सार्वजनिक वर्तन करतात ते संविधाननिष्ठ राष्ट्रवादी लोक आहेत असे म्हणता येईल.'



### वास्तवाधिष्ठ जनहितकारी राष्ट्रवाद

प्रत्येकच राष्ट्राचे संविधान चांगले व परिपूर्ण असेलच असे नाही. चांगल्या संविधानासंदर्भातील माझी भूमिका अशी आहे की, 'जे संविधान कुठल्याही अंध स्वरूपाच्या कल्पित घटकावर आधारलेले नसून, नैसर्गिक सत्याला भिडणारे व वास्तववादी असते. जे आपल्या भूप्रदेशातील नागरिकांमध्ये धर्म, जात, लिंग, वंश, इत्यादी कारणांवरून कोणताही भेदाभेद न करता सर्वांना माणूस म्हणून समान दर्जा देते व सर्वांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे अशी भूमिका घेते. ज्या संविधानाच्या तत्त्वज्ञानात मानवी कल्याणाच्या मूल्यांना सर्वोच्च स्थान आहे. जे सकलजण कल्याणकारी नैतिकता, बुद्धिवाद व विज्ञानवादाला सर्वाधिक महत्त्व देते. ज्या संविधानात भविष्यकाळात उद्भवू

शकणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करू शकण्याचा भविष्यवेधी दृष्टिकोन असतो. ज्याच्यात कालानुकूल अशा मानव्यनिष्ठ दुरुस्त्या करण्याची तरतूद असते, ते चांगले संविधान असू शकते.'

संविधाननिष्ठ राष्ट्रवाद खालील उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी भारतीयांच्या मनामनात रुजवणे आवश्यक आहे. वर्तमानातील भारतीय नागरिकांना जात्यांध, धर्मांध, प्रांतांध, भाषांध प्रवृत्तींच्या विघटनकारी बहकाव्यांना बळी पडण्यापासून वाचवणे, भारतीयांना संकुचित अस्मितांमधून बाहेर काढून व्यापक स्वरूपाच्या राष्ट्रीय अस्मितेशी जोडणे, सत्यनिष्ठ, वास्तवाधिष्ठित व सकल जनहितकारी राष्ट्रवादाची भारतीयांना ओळख करून देणे, भारतीयांच्या मनात प्रागतिक राष्ट्रवादी भूमिका रुजवणे, समग्र भारतीयांना संविधाननिष्ठ राष्ट्रवादाच्या धाग्यांनी सेंद्रिय रीतीने एकत्रित गुंफणे, संविधानाच्या पायावर उभ्या असलेल्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटत राहण्यास प्रवृत्त करणे.

आधुनिक अर्थाने भारताचे एक राष्ट्र बनवण्याची प्रक्रिया भारतातील इंग्रजी सत्तेच्या प्रस्थापनेनंतर सुरू झाली. इंग्रज भारतातून निघून गेले, तेव्हा येथे जवळपास ६०० राज्ये/संस्थाने अस्तित्वात होती. ही लहान-मोठी राज्ये पूर्वीच्या काळात स्वतंत्र राष्ट्राप्रमाणेच वावरत होती. प्राचीन इतिहासाच्या व धर्म-संस्कृतीच्या आधारावर आजचे भारत हे राष्ट्र उभे नाही, तर ब्रिटिश इंडियामधील सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळींनी केलेल्या वैचारिक पायाभरणीतून आधुनिक भारत हे राष्ट्र निर्माण झाले आहे. भावी भारताच्या नवराष्ट्र निर्मितीचे तत्त्वज्ञानच या कालखंडात विकसित होत होते. या तत्त्वज्ञानाच्या पायावरच व्यापक व सखोल असे विचार मंथन करून प्रगल्भ भारतीय नेत्यांनी आपल्या संविधानाची निर्मिती केली. समतावादी, बुद्धिवादी, विज्ञानवादी व सेक्युलर संविधानाची निर्मिती ही भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासातील अत्यंत क्रांतिकारी अशी गोष्ट आहे.

### राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक प्रतीके

२६ नोव्हेंबर १९५० पासून भारतात नव्या संविधान युगाची सुरुवात झाली. संविधान युग हे भारताच्या पूर्व परंपरेतील अतार्किक, विषमतावादी, अंधश्रद्धामूलक घटकांना नाकारणारे व भारताचे नवे समतावादी, बुद्धिवादी, सेक्युलर व सार्वभौम राष्ट्र निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू करणारे युग आहे. भारतीय संविधानाने विविधतेने नटलेल्या व जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, संस्कृती इत्यादी घटकांमुळे परस्परांपासून तुटलेल्या व फाटलेल्या भारत भूमीतील लोकांना एक राष्ट्रीयत्वाच्या पक्क्या धाग्यामध्ये गुंफण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण असे काम केलेले आहे. भारतीय संविधान येथील लोकांचे मूलभूत स्वातंत्र्य हिरावून जबरदस्तीने त्यांना एकत्रित ठेवत नाही, तर सर्वांना त्यांच्या प्रगतीसाठीचे मूलभूत स्वातंत्र्य देऊनच एकत्रित गुंफते. भारताचे संविधान सकल जनकल्याणाच्या नव्या राष्ट्रनिष्ठा जनमानसात रुजवून परस्पर सहकार्याच्या तत्त्वाद्वारे नवराष्ट्र निर्माणाची प्रेरणा जागवते.

भारतीय संविधानाच्या मुळाशी असलेले, जन्माधारित उच्चनीचतेला नाकारणारे मानव कल्याणकारी तत्त्वज्ञान, संविधानाने पुरस्कारिलेली जीवनमूल्ये, मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्यांच्याद्वारे भारतीय नागरिकांसाठी घालून दिलेली आचारसंहिता, राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिवर्तनासाठी उभ्या करून दिलेल्या अनेकविध संस्था, भारतीयांसमोर ठेवलेले आदर्श, नव्याने निर्माण केलेली राष्ट्रीय प्रतीके, समग्र भारतीयांसाठीचे राष्ट्रीय सण, संशोधन संस्था, औद्योगिक संस्था, सिंचन प्रकल्प व स्मारकाच्या स्वरूपातील नवी पर्यटन संस्कृती इत्यादी घटकांवर निष्ठा ठेवणाऱ्या राष्ट्रवादास संविधाननिष्ठ राष्ट्रवाद असे म्हणता येईल. एक धर्म, एक वंश, एक जात, एक संस्कृती हे घटक राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक असतात. हा संकुचित विचार स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील प्रगल्भ भारतीय नेत्यांनी व तेवढ्याच प्रगल्भ जनतेने स्पष्टपणे नाकारलेला आहे.

### संमिश्र संस्कृतीचा आदर

संविधाननिष्ठ राष्ट्रवाद नैसर्गिक सत्यावर, मानवी मूल्यांवर व विवेकावर आधारलेला आहे. तो संकुचित नाही, तर व्यापक व सर्वसमावेशक स्वरूपाचा आहे. तो कुणाच्याही द्वेषावर आधारलेला नाही, तर सर्वांच्या सर्वांवरील प्रेमावर आधारलेला आहे. हा राष्ट्रवाद भारत भूमीतील प्रत्येक माणसाची माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा जपणारा व सर्वांचा आदर करणारा आहे. संविधाननिष्ठ राष्ट्रवाद अशी भूमिका घेतो की, तुमचा व्यक्तिगत धर्म व तुमची संस्कृती काहीही असो, तुम्ही भारत या राष्ट्राचे सन्माननीय नागरिक आहात. तुम्ही तुमच्या व्यक्तिगत पातळीवरील कोणत्याही श्रद्धा, निष्ठा जरूर बाळगा. पण तुमच्या मनातील अग्रक्रमाची निष्ठा ही संविधानाच्या तात्त्विक व मूल्यात्मक पायावर उभ्या राहिलेल्या भारत या राष्ट्रावर असली पाहिजे. भारत या राष्ट्रावरील निष्ठा म्हणजे केवळ जमीन, पर्वत, नद्या, धर्म, रूढी, परंपरा, पुराण, गाय, जुनी तीर्थस्थाने यांच्यावरील निष्ठा नव्हे, तर भारतावरील निष्ठा म्हणजे भारतात राहणाऱ्या सर्व माणसांवरील निष्ठा. सर्व माणसांचा सर्वांगीण विकास करू पाहणाऱ्या भारतीय संविधानाच्या मूल्यांवरील व संविधानाने घालून दिलेल्या आचारसंहितेवरील निष्ठा. केवळ आपलाच धर्म व आपलीच संस्कृती श्रेष्ठ आहे, असे मानून दुसऱ्यांच्या धर्म संस्कृतीचा द्वेष करणे संविधाननिष्ठ राष्ट्रवादात बसत नाही, तर संविधाननिष्ठ राष्ट्रवाद भारताच्या संमिश्र संस्कृतीचा आदर करावयास सांगतो. जुन्या धर्म संस्कृतीमधील जे जे नैतिक मूल्यांनी युक्त व विवेकावर आधारलेले आहे. त्याची जोपासना करावी व जुन्या धर्म संस्कृतीमधील जे जे अनैतिक, अतार्किक, मानवघातकी, अंधश्रद्धामूलक व कालबाह्य झालेले आहे ते ते टाकून द्यावे. ही संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची भूमिका आहे.

संविधानाच्या उद्देशिकेत भारतीय लोकांनी केलेल्या व्यापक व उदात्त अशा संकल्पावर निष्ठा ठेवून जो वर्तन करतो तो संविधाननिष्ठ राष्ट्रवादी असतो.

### आम्ही भारताचे लोक

संविधानाने समग्र भारतीय नागरिकांसाठी एक नवी राष्ट्रसंस्कृतीच

दिलेली आहे. त्या राष्ट्रसंस्कृतीचे निष्ठेने पालन करणे व तिचा विकास करणे ही प्रत्येक भारतीय नागरिकाची जबाबदारी आहे, अशी संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची भूमिका आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये 'आम्ही भारतीय लोकांनी' (आम्ही भारतीयांमध्ये सर्व जात, धर्म, पंथाचे लोक येतात.) भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा संकल्प केलेला आहे. या संकल्पामध्ये येथील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय देणे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य देणे.



दर्जाची व संधीची समानता देणे. सर्व नागरिकांची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करणे याही महत्त्वपूर्ण अशा बाबी आहेत. हा संकल्प नवे राष्ट्र घडवण्यासंभर्तातील आहे. संविधानाच्या उद्देशिकेत भारतीय लोकांनी केलेल्या व्यापक व उदात्त अशा संकल्पावर निष्ठा ठेवून जो वर्तन करतो तो संविधाननिष्ठ राष्ट्रवादी असतो. संविधानातील संकल्प ज्याच्या गावीच नसतो तो खऱ्या अर्थाने राष्ट्रनिष्ठ नसतो तर धर्मनिष्ठ, जातनिष्ठ किंवा पुराण परंपरानिष्ठ असतो. तुमची प्रथम क्रमांकाची निष्ठा संविधानावर व त्याने घालून दिलेल्या आचारसंहितेवर असली पाहिजे, असे संविधाननिष्ठ राष्ट्रवाद सांगतो.

बहुतांश भारतीय लोक अजूनही खऱ्या अर्थाने संविधाननिष्ठ राष्ट्रवादी बनलेले नाहीत. स्वतःच्या कुटुंबातील अथवा समूहातील परंपरेने चालत आलेल्या धर्मरूढींचा प्रभाव घेऊनच बहुतांश लोक वावरतात. त्यामुळे ते संविधाननिष्ठ राष्ट्रवाद काय असतो हे नीटपणे समजूनच घेत नाहीत.

संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची भूमिका ही आहे की, तुम्ही प्रथम राष्ट्रनिष्ठ स्वरूपाचे सामाजिक व संस्कृतिक वर्तन करा आणि नंतर धर्म, जात, परंपरानिष्ठ स्वरूपाचे सांस्कृतिक वर्तन करा. विशिष्ट पुराणाधारित सण उत्सव साजरे करणे, तीर्थयात्रा करणे, विविध धार्मिक कर्मकांडे करणे याला सांस्कृतिक वर्तन असे म्हणतात. अशा सांस्कृतिक वर्तनात अंधश्रद्धेचा प्रभाव असतो, तर बुद्धिवाद व चिकित्सेचा अभाव असतो. भारतीयांनी संविधाननिष्ठ बुद्धिवादी व विज्ञानवादी स्वरूपाचे सांस्कृतिक वर्तन केले पाहिजे, अशी संविधाननिष्ट राष्ट्रवादाची अपेक्षा आहे.

संपूर्ण भारतीय नागरिकांनी आपल्या मनात, सर्वांच्या सामाईक असलेल्या भारत या राष्ट्राच्या सांस्कृतिक वर्तनातून घटकावरील आपली श्रद्धा व निष्ठा अधिक निश्चयपूर्वक आणि दृढ करायला हवी.

भारतीय संविधानाने संपूर्ण भारतीय नागरिकांचा म्हणून असलेला सामाईक स्वरूपाचा ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा संपूर्ण भारतीयांच्या समोर ठेवलेला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा ऐतिहासिक वारसा, त्यातील मूल्ये हा सर्वांचा सामाईक वारसा आहे. या वारशावर सर्वांची निष्ठा हवी. संविधान सर्व भारतीयांचे सामाईक आहे. त्यात सर्वांच्या विकासासाठीची कायदेबद्ध विचारधारा आहे. संसद सर्व भारतीयांची सामाईक आहे. या संसदेमध्ये संविधानाने घालून दिलेल्या आचारसंहितेनुसार सर्व भारतीयांच्या भवितव्यासंदर्भातील निर्णय होत असतात. अशोक चक्रांकित तिरंगा राष्ट्रध्वज, भारतीय सीमेवर रात्रंदिवस पहारा देणारी भारताची फौज ही सर्वांची सामाईक आहे. निवडणूक आयोग, राजमुद्रा, राष्ट्रीय प्रशासन व्यवस्था, राष्ट्रीय प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षण व्यवस्था, रुपया हे चलन या साऱ्याच गोष्टी सर्वांच्या सामाईक आहेत. विशेषतः 'स्वातंत्र्यदिन' व 'प्रजासत्ताक दिन', 'संविधान दिन' हे सर्व भारतीयांचे सामाईक असलेले सर्वश्रेष्ठ असे राष्ट्रीय सण आहेत. हे सण भारतीयांनी स्वतःच्या घराघरांतदेखील स्वयंस्फूर्तीने व आत्यंतिक उत्साहाने साजरे केले पाहिजेत. संविधाननिष्ठ राष्ट्रवादाचे हे आग्रही प्रतिपादन आहे की, संपूर्ण भारतीय नागरिकांनी आपल्या भावविश्वात सर्वांच्या सामाईक असलेल्या भारत या राष्ट्राच्या सांस्कृतिक घटकांवरील आपली श्रद्धा व निष्ठा अधिकाधिक दृढ करावी. आपली ही श्रद्धा व निष्ठा आपल्या उत्स्फूर्त अशा सांस्कृतिक वर्तनातून स्पष्टपणे दिसून यावी. आम्ही सारे प्रथम भारतीय आहोत व शेवटीही भारतीयच आहोत, हा मूल्यभाव सर्वांच्या मनात रुजावा. मी आदिअंती भारतीय आहे, या मूल्यभावाला अनुसरून जो सर्व प्रकारचे वर्तन करतो तो नागरिक संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची जोपासना करत असतो.

**मागासवर्गीय व्यक्तीस शिक्षण, सेवा, निवडणूक व इतर संविधानिक लाभ आरक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करून घेताना जात प्रमाणपत्र हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. अनेकदा मागासवर्गीय व्यक्तीस विहित कालावधीत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र न मिळाल्याने त्यांना संविधानिक अधिकारापासून वंचित राहावे लागते असे निदर्शनास आले आहे. याअनुषंगाने तसेच शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार शालेय प्रवेशासाठी तसेच पुढील विविध लाभांसाठी जात प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.**

# जातप्रमाणपत्र पडताळणीची **सुलभ प्रक्रिया**

**उमेश सोनवणे**

जाती आधारे व्यवसाय व व्यवसाय आधारित जाती हे भारतीय समाजव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य आहे. जातिव्यवस्था निर्मूलनासाठी अनेक थोर महामानव, महापुरुष, संतमहात्मे यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले व विचार मांडले आहेत. तसेच भारतीय राज्यघटनेने सर्व व्यक्तिंना सामाजिक न्याय, दर्जाची व संधीची समानता प्रदान केली आहे. जातिव्यवस्थेमुळे विकासाची संधी न मिळालेल्या समाज घटकांना आरक्षणाच्या माध्यमातून विशेष संधी राज्यघटनेत उपलब्ध करून दिल्या आहेत.

## बार्टीमार्फत विशेष मोहीम

भारताला स्वातंत्र्यप्राप्तीच्या ७५व्या वर्धापन वर्षानिमित्त साजरा होत असलेल्या 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' यामध्ये लोकांचा लोकप्रशासनामध्ये जास्तीत जास्त सहभाग वाढावा, याकरिता नावीन्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. याअनुषंगाने विभागाचे सचिव सुमंत भांगे, आयुक्त, डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या संकल्पनेतून आणि बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती याचे औचित्य साधून, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत राज्यामध्ये एकाच वेळी ६ ते १४ एप्रिल २०२२ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह राबवण्यात आला. तसेच १७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा'निमित्त जातप्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम बार्टीमार्फत राबवण्यात आली होती.

## समित्यांची पार्श्वभूमी व उद्देश

१४ मार्च १९८५ अन्वये राज्यात पहिली जात पडताळणी समिती स्थापन करण्यात आली. त्यानंतर १९९४ मध्ये सहा समित्या, २००६ मध्ये १५ समित्या आणि २०१६ मध्ये प्रत्येक जिल्ह्यास एक याप्रमाणे ३६ समित्यांची स्थापना करण्यात आली. पूर्वी या समित्यांना केवळ आरक्षित जागेवर प्रवेश घेणाऱ्या वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आरक्षित जागेवर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी करणे एवढेच मर्यादित काम होते. जात नामसाधर्म्याचा गैरफायदा घेऊन खोटे जातीचे प्रमाणपत्र मिळवून मागासवर्गीयांकरिता असलेल्या आरक्षणाचा लाभ उच्च जातसमूहाने मिळवण्याच्या प्रवृत्तीला आळा बसवणे हा या मागील उद्देश होता.



त्यानंतर विनाअनुदानित आणि कायम अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण शुल्क समितीद्वारे शुल्क भरमसाठ वाढल्याने खोटे जातीचे दाखले सादर करून आरक्षित जागेवर प्रवेश मिळवण्याची प्रवृत्ती जास्त वाढली. त्यामुळे अशा व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना जात पडताळणी दाखला अनिवार्य करण्यात आला. माधुरी पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याची कार्यवाही व उपाययोजनेबाबत सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० संमत केला. त्यानुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी निवड श्रेणी, उपायुक्त, समाज कल्याण, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचा समावेश असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची निर्मिती करण्यात आली. तसेच पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई या अधिकाऱ्यांचे दक्षता पथक अर्जदाराची गृहचौकशी करणे आणि दस्तऐवजांच्या खरेपणाची पडताळणी करणे यासाठी समितीला साहाय्य करत असते. सद्यःस्थितीत शासकीय नोकरी, शैक्षणिक सवलती याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षित जागेवर निवडणूक लढवणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांनासुद्धा जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

## मुख्य समन्वयक

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडील शासन निर्णय २९ ऑगस्ट

२०१२ अन्वये महासंचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांची जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे मुख्य समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कामकाजाबाबत समन्वयक, प्रशिक्षण व समित्यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे, संगणकीय साधनसामग्री पुरवणे, कामाकाजाकरिता मानधन तत्त्वावर आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करून देणे इत्यादी अधिकार महासंचालक यांना दिले आहेत.

बार्टीमधील प्रशिक्षण विभागामार्फत समितीमधील सदस्य, दक्षता पथकाचे अधिकारी/कर्मचारी यांना विस्तृत स्वरूपाचे प्रशिक्षण नियमितपणे देण्यात येते. तसेच जातप्रमाणपत्र देणारे प्रांत अधिकारी, उपजिल्हाधिकारी व त्यांचे अधीनस्थ अधिकारी/ कर्मचारी यांच्यादेखील प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, नागरिक यांच्यासोबतदेखील प्रत्यक्षात कॉलेज पातळीवर आणि ऑनलाइन पद्धतीने संवाद साधून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीची कार्यपद्धती समजावून देण्यात येत आहे. सद्य:स्थितीत राज्यातील सर्व समित्यांमार्फत प्रतिवर्षी सरासरी सुमारे ४.०० लाख प्रकरणे निकाली निघतात. त्यातील प्रतिवर्षी सुमारे ६०० प्रकरणे अवैध होतात.



सद्य:स्थितीत, सेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच ऐनवेळी विद्यार्थी व नागरिकांना आर्थिक, शारीरिक मानसिक त्रास होऊ नये, यासाठी बार्टी, पुणे मुख्यालय येथून दैनंदिन समित्यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्यात येत आहे.

## सुलभ प्रक्रिया

१ ऑगस्ट २०२० पासून जातप्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया बार्टीने विकसित केलेल्या सीसीव्हीआयएस प्रणालीमार्फत अंशत: ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व जात पडताळणीचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येतात. तसेच अर्जदारांना जात वैधता प्रमाणपत्र उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात पडताळणी समिती यांच्या ई-स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येते. सद्य:स्थितीत ऑनलाइन प्रणालीद्वारे एकूण ५,९२,५३० वैधता प्रमाणपत्रे अर्जदारांना देण्यात आले आहेत. वडिलांच्या रक्तनाते संबंधातील नातेवाइकांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे निर्णय घेण्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. पासपोर्टच्या धर्तीवर ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र देताना Digilocker, bulk E-mail, payment gateway व bulk SMS सुविधा उपलब्ध करून देऊन समित्यांच्या कार्यपद्धतीत गतिशीलता व पारदर्शकपणा आणण्यात आला आहे. महसूल विभाग, आपले सरकार पोर्टल, म्हाडा आणि सीईटी सेल या विविध पोर्टल सोबत एपीआय इंटिग्रेशन करण्यात येत आहे. ज्यामुळे समितीचे कामकाज अधिक गतिमान होऊन त्याचा लाभ उमेदवारांना होईल. विद्यार्थी व नागरिकांना जात पडताळणीबाबत बार्टी हेल्पलाईनच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण मदत व मार्गदर्शन करण्यात येते. तसेच मुख्यमंत्री हेल्पलाइनकडील प्राप्त तक्रारी व सूचना यानुसार तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.

## मंडणगड पॅटर्न विशेष मोहिमेचे आयोजन

शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार शालेय प्रवेशासाठी तसेच पुढील विविध लाभांसाठी वेळोवेळी जात प्रमाणपत्राची मागासवर्गीय विद्यार्थी व नागरिकांना आवश्यकता आहे. तथापि मागासवर्गीय पालकांमधील अज्ञान व योग्य मार्गदर्शनाचा अभाव इत्यादी कारणांमुळे विद्यार्थ्यांना जातप्रमाणपत्र मिळण्यामध्ये अडचणी येतात. याकरिता सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यार्थिदशेमध्ये मंडणगड पॅटर्नप्रमाणे जातप्रमाणपत्र मिळावे, याकरिता सर्व जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या अधीनस्थ यंत्रणांना सूचना देण्याबाबत कळवण्यात आले आहे.

अनु.जाती. विजाभज, इमाव व विमाप्रप्रवर्गातील विज्ञान शाखेच्या इयत्ता ११ वी, १२ वी मध्ये शिकत असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता समितीकडे विहित कालमर्यादेत अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि विद्यार्थी/पालक यांनी विहित कालमर्यादेत समितीकडे अर्ज सादर न केल्याने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवताना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागते.

यासाठी मंडणगड पॅटर्नप्रमाणे राज्यातील इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समिती स्तरावरून जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, शिक्षण विभाग यांच्याशी समन्वय साधून विशेष मोहिमेचे नियोजन करण्यात येत आहे. विशेषत्वाने महाविद्यालयांचे प्राचार्य, कॉलेज पातळीवरील समान संधी केंद्र, संपर्क अधिकारी, नागरिक, लोकप्रतिनिधी यांना समाविष्ट करून ही विशेष मोहीम सुसूत्र पद्धतीने पार पडेल, याची दक्षता घेण्यात येत आहे.

थोडक्यात अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांमधील सर्व मागासवर्गीय घटकांना त्यांचे संविधानिक अधिकार आरक्षणाच्या माध्यमातून मिळवताना पासपोर्टच्या धर्तीवर सुलभ प्रक्रियेद्वारे समितीचे कामकाज अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व गतिमान करून, जात वैधता प्रमाणपत्र देण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे ही शासनाची स्वायत्त संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

(लेखक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे उपायुक्त तथा विभाग प्रमुख,सीव्हीसी म्हणून कार्यरत आहेत.)

**गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प ही राष्ट्राची संपत्ती आहे. प्रकल्पात निर्माण झालेला जलाशय ही राज्याची जलसंपत्ती आहे. प्रकल्पामध्ये साठवलेला प्रत्येक थेंब हा शेतकऱ्यांपासून उद्योजकांपर्यंत सर्वांच्या समृद्धीसाठी सेवेत आहे. आबालवृद्धांना निसर्गाबद्दल असलेल्या स्वाभाविक प्रेमाला साद घालण्यासाठी आणि त्यांच्या जीवनात आनंदाचे काही क्षण निर्माण करण्यासाठी येथील जल-वनसृष्टी त्यांची वाट बघत आहे. पूर्व विदर्भामध्ये निर्माण झालेला हा सागर त्यावर अवलंबून असलेल्या आणि नसलेल्यांच्या जीवनात परिवर्तन आणणार आहे. त्याला अवश्य भेट दिली पाहिजे.**

# जलपर्यटनातून
# जीवन परिवर्तनाकडे

**आशिष देवगडे**

राज्य शासनाचा जलसंपदा, महसूल व वन, मदत व पुनर्वसन विभाग यांनी गेल्या अनेक वर्षात २२,२०० हेक्टर जमिनीचे भूसंपादन, १५०० हेक्टर वनजमिनीचे संपादन आणि ८५ गावांचे पुनर्वसन करताना प्रखर विरोध, न्यायालयीन प्रक्रिया आणि अगणित टीकांचे वार सोसत अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून जे निर्माण केलेय ते राष्ट्राच्या सेवेत आहे.

## भूसंपादन व पुनर्वसनाला प्राधान्य

प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या १४,००० कुटुंबाचे त्यांच्या मूळ जागेहून स्थलांतरण होणे ही साधारण बाब नाही. प्रकल्पासाठी त्यांनी केलेल्या त्यागामुळेच हे शक्य झाले, केवळ लाभक्षेत्रातील इतर कुणाच्या आणि राष्ट्राच्या निर्मितीसाठी केंद्र व राज्य शासनाने काही आर्थिक पॅकेजेस देऊन त्यांच्या जखमांवर फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. दर्जेदार पुनर्वसन करण्यासाठी प्रसंगी काही नियमांमध्ये बदल केले. वेळोवेळी आर्थिक पाठबळ दिले. उपलब्ध निधीतून खर्चाचे नियोजन करताना भूसंपादन व पुनर्वसनाला प्रथम प्राधान्य दिले. यात बरीच वर्षे गेल्याने प्रकल्प पूर्ण होईल, यावर शंका निर्माण झाल्या, पण ९ जानेवारी २०२२ रोजी प्रकल्पात १००% पाणीसाठा निर्माण झाला. प्रकल्पाच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरामध्ये लिहिला गेला.



## अथांग जलाशय

काठोकाठ पाण्याने भरलेला जलाशय आणि भक्तिभावाने भरलेले मन एकसमान. आता त्यात तरंग उठले तरीही ओसंडून वाहील. प्रकल्पातून ओसंडून वाहणारे पाणी आणि भावनावेगाने ओसंडून वाहणाऱ्या मनाचा संगम गोसीखुर्दच्या जलाशयावर घडला तर तो अनुभवणाऱ्याला समाधी लागल्याचे ह्याची देही ह्याची डोळा अनुभूती येईल. निसर्गरम्य वनराईने चहुबाजूने बहरलेला आणि नटलेला हा जलाशय, वेगवेगळ्या ऋतूत वेगवेगळे रूप अंगीकारतो, ते स्वानुभवानेच प्राशन करावे. आयुष्याच्या चढउतारांच्या लाटेचा कुठलाही स्पर्श न अनुभवलेला बालक असो अथवा त्या सर्व लाटांवर स्वार होऊन पार पडलेला अनुभवी वृद्ध असो, या जलाशयाजवळ आला आणि त्याच्या दर्शनाने संवेदनशील झाला नाही तर तो जिवंतच आहे की नाही असा प्रश्न पडावा. क्षितिजापर्यंत पसरलेला अथांग जलाशय दिङ्मूढ करून ठेवतो. गोसीखुर्द जलाशय सर्वांना निमंत्रण देत आहे आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाकडे वळण्यासाठी.

## चैतन्येश्वर महादेवाचे प्राचीन मंदिर

जलाशयाच्या उजव्या तीरावर चैतन्येश्वर महादेवाचे प्राचीन मंदिर अंभोरा येथे आहे. मंदिर प्रशस्त आणि स्वच्छ आहे. येथील विश्वस्तांनी अत्यंत काळजीपूर्वक जतन केलेली वास्तू एका निमुळत्या रस्त्याने जोडलेली आहे. अन्यत: चारही बाजूला गोसीखुर्दचा जलाशय आहे. जलाशयाने मंदिराचे सौंदर्य वाढवले असले तरी सतत पाण्यात स्तब्ध राहिल्याने परकोटात काही प्रमाणात ओलावा आढळतो. तरीही मंदिर अढळ आहे. येथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. वर्षभर श्रद्धाळूंची आणि

पर्यटकांची मांदियाळी असते. मंदिराच्या बाजूला जलाशयाच्या पश्चिमतटावर बुद्धविहार आहे. तेथे जाण्यासाठी निसरडी पायवाट आहे.

## राहण्याची व्यवस्था

पर्यटकांच्या विसाव्यासाठी व निवासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे छानसे रिसॉर्ट टेकडीच्या पायथ्याशी आहे. येथे जेवणाचीही सोय आहे. मंदिराशेजारी काही प्रकल्पग्रस्तांनी उपजीविकेसाठी छोटीछोटी दुकाने उभारली



आहेत. तसेच उमरेड-क-हांडला व्याघ्र प्रकल्पाच्या गोठणगाव गेटला प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या घरात (होम-स्टे) व्यवस्था केली आहे, त्यांचे समन्वय अंभोरा येथील छोटे व्यावसायिक करतात. पर्यटनाच्या माध्यमातून जो व्यवसाय गोसीखुर्द तीरावर निर्माण झालेला आहे, यामुळे पर्यटकांच्या आणि प्रकल्पग्रस्तांच्याही जीवनात परिवर्तन घडले आहे.

## रोजगाराच्या संधी

सर्वसाधारण माणसांच्या जीवनात परिवर्तन करण्याची प्रचंड क्षमता या जलाशयात आहे. विशेषत: जलपर्यटनात. सामान्य जनतेला रोजगाराच्या संधी मिळाव्यात या मुख्यमंत्र्यांच्या धोरणाला अनुसरून भंडाराचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी नेटाने पाठपुरावा केला. जलपर्यटनाचे प्रकल्प उभारले जावे, त्याद्वारे आर्थिक गुंतवणूक व रोजगाराच्या संधी उपलब्ध होणारे नवे दालन उघडले जावे यासाठी प्रयत्न केले. शासनाने त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलक्रिडा केंद्र व पर्यटन स्थळ विकसित करण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला. आता तो मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. विदर्भातील पर्यटन व्यवसायात व्याघ्रस्थळ पर्यटनासोबत जलक्रीडा पर्यटन सुरू झाल्यावर वैविध्याच्या शोधात असलेल्या पर्यटकांना अनेक पर्याय उपलब्ध होतील. Tiger Water Circuit अशी अभिनव संकल्पना साकारण्याचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने नियोजन केले आहे. या संकल्पनेला प्रतिसाद देण्यासाठी वन विभागासोबतच जलसंपदा विभागही तयार आहे.

## जलक्रीडा पर्यटनाचा आनंद

गोसीखुर्द जलक्रीडा पर्यटनात आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडासाधने, कॅफेटेरिया, हॉटेल, रिसॉर्ट इत्यादी उभारण्याचे मोठे उपक्रम हाती घेणार आहेत. भंडारा जिल्ह्यात अंभोरा पुलाच्या दुसऱ्या टोकावर 'माऊदी' या गावाजवळ हे स्थळ विकसित करण्याचे नियोजन आहे. भंडारा शहराजवळ जलतरण, बोटिंग यांची सुविधा उपलब्ध होईल. गोसीखुर्द जलाशयातून तब्बल २० कि.मी. बोटिंगने प्रवास करून माऊदी गावाजवळ येऊन इथल्या जलपर्यटनाचा आनंद घेता येईल. तिथून पुढे सागरासमान भागातून २० कि.मी. बोटिंग करून गोसीखुर्द धरणापर्यंत येता येईल. या परिसरातही स्वतंत्र पर्यटन क्षेत्र विकसित करण्याचा विचार आहे. उमरेड-क-हांडला व्याघ्र प्रकल्प जलाशयाच्या तीराला लागून असल्याने त्या निसर्गाचे दर्शन होईल. प्राणवायूने परिपूर्ण प्रदूषणमुक्त वातावरण आणि निरव शांतता या ठिकाणी सतत वास्तव्यास आहे. जलाशयातील लाटांवर बोटीत तरंगताना जंगलाजवळील शांत वातावरणात जीव कानात आणून एखाद्या अज्ञात पक्षाचा गोड आवाज ऐकणे म्हणजे चैतन्येश्वर अनुभवणे होय. पर्यटनाच्या संपूर्ण अनुभवाचा सदानंद देण्यासाठी आणि त्याला Encash करण्यासाठी ज्या बाबी निर्माण होतील, त्यातून राज्य शासनाला थेट महसूल मिळेल आणि पूरक उद्योगातून स्थानिक तरुणांच्या हाताला काम मिळेल.

मुख्यमंत्र्यांनी गोसीखुर्द येथे सांगितलेच आहे की, जगातील काही देश आणि आपल्या देशातील काही राज्ये केवळ पर्यटनावर विकसित झाली आहेत. आपल्या राज्यातील भंडारा जिल्हा पर्यटनावर विकसित होऊ शकेल. येत्या दोन वर्षांत टप्प्याटप्प्याने हे केंद्र जनसामान्यांच्या सेवेत दाखल होईल. हिवाळी अधिवेशनात येणारा प्रत्येक पाहुणा गोसीखुर्द अनुभवेल. गोसीखुर्द महोत्सव सुरू झाल्यावर देश -विदेशातून पर्यटक आकर्षित होतील. दूरवरच्या पंचमढी, पेंच, भेडाघाटला जाणारे पर्यटक अप्रतिम पर्याय उपलब्ध झाल्याने भंडारा, अंभोरा, गोसीखुर्दकडे वळतील. ताज, ललित यांसारखी पंचतारांकित हॉटेल येथे फुलतील.

जलाशयातील बेटावर मॉरिशससारखे हट्स उभारले जातील. त्यामुळे केवळ पर्यटकांच्याच नव्हे, तर त्यावर उपलब्ध होणाऱ्या पूरक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या युवकाच्या जीवनात परिवर्तन घडेल. गोसीखुर्दचा प्रत्येक थेंब हा सर्वसामान्यांच्या समृद्धीचे साधन बनेल. त्याकरिता गोसीखुर्दचा सागरासम विस्तीर्ण जलाशय स्वागतासाठी व सेवेसाठी विनम्रपणे तयार आहे.

(लेखक हे गोसीखुर्द प्रकल्प,
नागपूर येथे मुख्य अभियंता आहेत.)

**राज्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध व्हावे, समाजातील दुर्बल, दुर्लक्षित दिव्यांगांच्या जीवनातील अंधःकार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे. तसेच त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्यांच्यामधील असलेले गुणसामर्थ्य विकसित करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासन वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करत आहे. दिव्यांगांसाठी शासनाच्या विविध योजनांविषयी थोडक्यात माहिती...**

# दिव्यांगांच्या कल्याणार्थ

**संध्या गरवारे**

१९९५ मध्ये कलम ६० अन्वये दिव्यांग कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता १९ ऑगस्ट २००० च्या शासन निर्णयान्वये अपंग आयुक्तालयांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने दिव्यांग व्यक्तीसाठी शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम आयुक्तालयाकडून केले जाते. सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या अपंग कल्याण व पुनर्वसन योजनांसाठी अनुदान वितरण करणे, योजनांवर नियंत्रण ठेवणे, योजनांमध्ये सुधारणा करणे व योजनेच्या अंमलबजावणीची कामे आयुक्तालयाकडून केली जातात.

## शासकीय संस्थेमधून शिक्षण व प्रशिक्षण

शासकीय संस्थांमध्ये ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पद्धतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. त्याचबरोबर निवास न भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते. त्याचबरोबर १८ वर्षांवरील विविध अपंग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे अपंगत्व विचारात घेऊन अपंगत्वानुरूप विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे त्यांच्या निवास व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते.दिव्यांग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे दिव्यांगत्त्व विचारात घेऊन दिव्यांगत्वानुरूप विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येते.

## अपंगाचे शिक्षण व प्रशिक्षण

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या विशेष शाळेमधून वय वर्षे ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग व मतिमंद दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पद्धतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. त्याचबरोबर निवास व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते. त्याचबरोबर १८ वर्षावरील दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या दृष्टीने त्यांचे अपंगत्त्व विचारात घेऊन अपंगत्त्वानुरूप विविध व्यवसायाचे अपंग कर्मशाळांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे त्यांच्या निवास व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते.



## दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

दिव्यांग शाळेतील अनिवासी विद्यार्थी तसेच सामान्य शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत दिव्यांग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न लावता शालेय शिक्षणासाठी शालान्त पूर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेखाली खालील दराने शिष्यवृत्ती रक्कम प्रदान केली जाते. इयत्ता पहिली ते चौथी (अंध, अंशतः अंध, अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त तसेच कर्णबधिरांसाठी पायरी वर्गापासून) दरमहा १०० रुपये, इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा १५० रुपये, इयत्ता पाचवी ते दहावी दरमहा २०० रुपये, मतिमंद व मानसिक विकलांग विद्यार्थी (नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळांतील) दरमहा १५० रुपये, दिव्यांगांच्या कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी दरमहा ३०० रुपयेप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

## शालान्त परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिष्यवृत्ती

अंध, अधूदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरूग्ण विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीनंतरचे महाविद्यालयीन व्यावसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमाचे गट करून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, तसेच दिव्यांगांसाठी शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

- अपंग दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्यासाठी आवश्यक ती शिष्यवृत्ती देण्यात येते.
- वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण, ॲग्रिकल्चर, व्हीटरनरीमधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण वसतिगृहात राहणारे दरमहा १२०० रुपये, वसतिगृहात न राहणारे ५५० रुपये देण्यात येतात.
  - अभियांत्रिकी, तांत्रिक स्थापत्य, वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम वसतिगृहात राहणारे दरमहा ८२० रुपये, वसतिगृहात न राहणारे ५३० रुपये देण्यात येतात.
- कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यवसायिक पदविका अभ्यासक्रम शिकत असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना वसतिगृहात राहणारे ८२० रुपये आणि वसतिगृहात न राहणारे दरमहा ५३० रुपये देण्यात येतात.
- द्वितीय वर्षे व त्यानंतर पदवीपर्यंतचा शिकणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना वसतिगृहात राहणारे ५७० रुपये आणि वसतिगृहात न राहणारे दरमहा ३०० रुपये दिले जातात.
- ११वी, १२वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम) वसतिगृहात राहणारे ३८० रुपये आणि वसतिगृहात न राहणारे दरमहा २३० रुपये देण्यात येतात.
- दिव्यांग व्यक्तींना वाचक भत्ता मासिक रुपये १००, ७५, ५०/- देण्यात येतात.

**शैक्षणिक शुल्क :-** मान्यताप्राप्त संस्थेचे

## दिव्यांगत्वाचे प्रकार (दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार)

● शारीरिक दिव्यांगता (अस्थिव्यंग) Locomotor Disabled, ● कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured Persons) ● मेंदुचा पक्षाघात (Celebral Palsy) ● शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism) ● स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy) ● आम्ल हल्ला बाधित (Acid Attack Victims) ● दृष्टिदोष (Blindess) ● दृष्टिक्षीणता (Low-vision) ● कर्णबधिरता (Hearing Impairment / Deaf) ● ऐकण्यास कठीण जाणे (Hard of Hearing) ● वाचा व भाषा दोष (Speech and language Disability) ● बौद्धिक दिव्यांगता (Intellectual Disability / Earlier Known as Mentally Retireded) ● अध्ययन अक्षमता (Specific Learning Disability) ● स्वमग्नता (Autism Sprctrum Disorder) ● मानसिक आजार (mental illness) ● मज्जासंस्थेचे जुने आजार (Chronic Neurological Condision - मल्टिपल स्क्लेरॉसिस)● मज्जासंस्थेचे जुने आजार (Chronic Neurological Condision - पार्किनसन्स) ● रक्त विकार संबंधित आजार (Blood Disorder - Haemophilia हिमोफिलिया)● रक्त विकार संबंधित आजार (Blood Disorder - Thalassemia थॅलेसेमिया) ● रक्त विकार संबंधित आजार (Blood Disorder - Sickle Cell Disease (gHSb gob) ● बहूर्विकलांगता (Multiple Disability).

/ विद्यापिठाचे सत्तीच्या शैक्षणिक शुल्काची रक्कम) **टंकलेखन खर्च** :- रु. ६००/- (वार्षिक) इ.) अभ्यास दौरा खर्च :- रु. ५००/- इतके देण्यात येते.

**स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल -** १८ ते ५० वयोगटातील दृष्टीहीन कर्णबधिर व अस्थिविकलांग दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रुपये १,५०,०००/-, तर व्यवसायाकरिता ८० टक्के बँकेमार्फत देण्यात येते, तर रुपये ३०,०००/- सामाजिक न्याय विभागामार्फत अनुदान देण्यात येते.

**दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा -** दिव्यांगांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून प्रतिवर्षी राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

**गुणवत्ता विद्यार्थ्यांना पारितोषिके -** प्रत्येक विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून, इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण होणाऱ्या गुणवत्ता यादीतील प्रथम तीन क्रमांकांच्या प्रत्येकी तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना १००० रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येते.

### कृत्रिम अवयव व साधने पुरवणे

समाजातील प्रत्येक व्यक्ती संपूर्ण स्वावलंबी असावा ही मूलभूत संकल्पना आहे. परंतू नैसर्गिकरित्या आलेल्या शारीरिक मर्यादा व एक विशिष्ट मर्यादेपलीकडे न येणाऱ्या स्वालंबत्व यामुळे कित्येक व्यक्तींना दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून राहावे लागते. शारीरिक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग दिव्यांगांकरिता कॅलिपर, कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, कर्णबधिरांकरिता श्रवणयंत्र, अंध विद्यार्थ्यांकरिता टेपरेकॉर्डर व कॅसेट्स इत्यादी साधनांसाठी ३००० रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येते.

### व्यवसायासाठी अर्थसाहाय्य

अपंग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल योजना कार्यान्वित केली आहे. अपंग व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय, धंदा, उद्योग, शेतीपूरक उद्योग सुरू करण्यासाठी शासकीय तसेच शासनमान्य संस्थेमधून १८ ते ५० वयोगटातील दिव्यांग व्यक्तिंस अर्थसाहाय्य केले जाते.

### राज्य शासन पुरस्कृत योजना

शासकीय तसेच शासनमान्य संस्थेमधून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १८ ते ५० वयोगटातील दिव्यांग व्यक्तिंस प्रशिक्षण पूर्ण केलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या साधनांकरिता १००० रुपये अर्थसाहाय्य देण्यात येते.

### दिव्यांग कल्याण राज्य पुरस्कार

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दिव्यांग कर्मचारी / स्वयंउद्योजक, दिव्यांगांचे नियुक्तक यांना 'दिव्यांग कल्याण' राज्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

### जागतिक दिव्यांग दिन

दिव्यांगत्वाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, त्यांच्या समस्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमाचे आयोजन करून समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

### दिव्यांग मार्गदर्शन व सल्ला केंद्र

दिव्यांग व्यक्तींना विविध सोयीसुविधांची माहिती व मार्गदर्शन करणे, तसेच त्यांना या सुविधा मिळवून देण्यासाठी समाज कल्याण अधिकारी कार्यालयात दिव्यांग मार्गदर्शन व सल्ला केंद्र कार्यरत आहे.

**मतिमंद बालगृहे -** बालहक्क (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित नियम २००६ अन्वये सुरू करण्यात आलेली आहे.

दिव्यांग अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना सुरू करण्यात आलेली आहे. किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्त्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्त्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा दिव्यांग नसलेल्या वधू किंवा वराने दिव्यांग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास ५०,००० रुपये अर्थसाहाय्य देण्याची तरतूद आहे.

### दिव्यांग व्यक्तींकरिता सोयीसुविधा

- रेल्वे,एसटी महामंडळाकडून दिव्यांग व्यक्तीस प्रवास भाड्यामध्ये आणि त्याच्या मदतनीसासुद्धा सवलत दिली जाते.
- जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडून दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्त्वाचे मोफत प्रमाणपत्र दिले जाते.
- दिव्यांगांना वाहन भत्ता, व व्यवसाय करामध्ये सवलत देण्यात आली आहे.
- दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निम शासकीय, महामंडळे यांच्या नोकर भरतीमध्ये ४ टक्के आरक्षणाची सूट देण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालय, वसतिगृह व तत्सम उपक्रम यांमधील प्रवेशामध्ये ५ टक्के इतके आरक्षण दिले जाते.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रिमंडळातील सर्व सदस्य राज्याच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. राज्यात विविध योजना, अभियानांचा शुभारंभ केला जात आहे. विविध विभागांचा मंत्रिमंडळाकडून आढावा घेतला जात आहे. आढावा बैठकांमध्ये देण्यात आलेल्या सूचना, निर्देश तसेच प्रकल्पांचे लोकार्पण, प्रकल्पाच्या कामांची पाहणी, पुरस्कार वितरण आदींचा थोडक्यात आढावा....**



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# पाऊल पडते पुढे

### ‘अमृत महाआवास’ अभियानाचा शुभारंभ

२०२४ पर्यंत ‘सर्वांसाठी घरे’ हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट असून आता ‘अमृत महाआवास योजना’ २०२२ - २३ अभियानातील ५ लाख घरे पुढील १०० दिवसांत बांधण्यात येणार आहेत. विक्रमी वेळेत घरकुले बांधली जाणार आहेत, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित ‘अमृत महाआवास अभियान २०२२-२३’ चा राज्यस्तरीय शुभारंभ व पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ. राजाराम दिघे तसेच राज्यस्तरीय वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

### सामाजिक न्याय विभागाचा आढावा

नागपूर सुधार प्रन्यासने बांधलेली २५२ घरे तृतीयपंथीयांना देण्यात येणार असून त्यासाठी वित्त विभागाने आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वित्त विभागाला दिले. सामाजिक न्याय विभागाने नागपूरच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशात तृतीयपंथीयांना घरे देण्यासाठी विशेष योजना तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या. दरम्यान यापुढे मैला उपसण्यासाठी नागरी स्वराज्य



अमृत महाआवास अभियानाचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.

संस्थांच्या क्षेत्रात रोबोटचा वापर करता येईल का, या दृष्टीने चाचणी घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या विविध योजनांचा मंत्रालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, नागरी हक्क संरक्षण विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विनय कारगावकर, समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय रोजगार मेळावा

रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नियुक्तिपत्र मिळालेल्या राज्यातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी पारदर्शक आणि लोकाभिमुखपणे काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केल्यानुसार येत्या वर्षभरात राज्यात ७५ हजार नोकऱ्या उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यस्तरीय रोजगार मेळाव्यांतर्गत कोकण विभागातील पात्र उमेदवारांना नियुक्तिपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, उद्योगमंत्री तथा रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, कृषी मंत्री अब्दुल सत्तार, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव साप्रवि (सेवा) नितीन गद्रे, प्रधान सचिव वल्सा नायर सिंह आदी उपस्थित होते.

## नूतन वास्तूचे लोकार्पण

किनारपट्टी क्षेत्र विकास आराखड्यास मान्यता दिली असून पर्यावरण संवर्धनासह स्थानिकांच्या आकांक्षा लक्षात घेऊन समतोल विकास साधला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या नूतन वास्तूचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून झाला. या लोकार्पण कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

या वेळी पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण (दूरदृश्यप्रणालीद्वारे), खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग (दूरदृश्यप्रणालीद्वारे) राज्याचे धर्मादाय आयुक्त महेंद्र महाजन, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सहायक धर्मादाय आयुक्त दिनकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## दिव्यांग कल्याण विभागाची निर्मिती

दिव्यांगांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग निर्माण करण्यात येणार असून त्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, आमदार बच्चू कडू, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, दिव्यांग कल्याण आयुक्त ओमप्रकाश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

## पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी नियोजन

नवनिर्मित इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामांना विशेषतः हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील नगरपालिकांमधील बाजारपेठेतील महत्त्वाच्या रस्त्यांचा विकास, पाणीपुरवठा तसेच या परिसरातील वस्त्रोद्योगासह, पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

ऐतिहासिक माणगाव परिषदेच्या शताब्दी महोत्सवासाठी आणि वाटेगाव (ता.वाळवा) येथील अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकासाठी उत्कृष्ट नियोजन करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. पंचगंगा नदीकाठच्या १६१ गावांच्या सांडपाणी प्रक्रियेसाठी क्लस्टर एसटीपी पद्धतीने आराखडे तयार करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

हातकणंगले मतदारसंघातील ग्रामीण आणि नागरी प्रश्नांबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. मंत्रालयात झालेल्या बैठकीस कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा शिक्षण मंत्री दीपक केसरकर, खासदार धैर्यशील माने, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन करीर, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, पर्यावरण विभागाचे सचिव प्रवीण दराडे, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार, इचलकरंजी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक सुधाकर देशमुख आदी उपस्थित होते.

## 'मीसिंग लिंक' प्रकल्प

जगभरातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात येणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गातील 'मीसिंग लिंक प्रकल्प' देशातील पथदर्शी प्रकल्प ठरणार असून लाखो प्रवाशांना फायदेशीर ठरेल, असे

प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. डिसेंबर २०२३ हा प्रकल्प पूर्णत्वास येईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते कुसगाव या लांबीतील नवीन मार्गिकेच्या (मीसिंग लिंक) प्रकल्पाला भेट देऊन लोणावळा (सिंहगड संस्था) येथे सुरू असलेल्या बोगद्याच्या कामाची पाहणी केली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) महासंचालक राधेश्याम मोपलवार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, एमएसआरडीसीचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर आदी उपस्थित होते

## महामंडळास केंद्राकडून निधी

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज तर उद्योग-व्यवसायासाठी मुदत कर्ज आणि सूक्ष्म पतपुरवठा योजना राबवण्यात येत आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून कर्जस्वरूपात निधी उपलब्ध झाला असून, या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

अल्पसंख्याक विभागाच्या शैक्षणिक कर्ज, मुदत कर्ज आणि सूक्ष्म पतपुरवठा योजनेचा लाभ घेण्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीदिनापासून अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये हे अर्ज स्वीकारले जाणार असून, या कार्यालयांचे पत्ते व संपर्क महामंडळाच्या www.mamfdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या योजनेंतर्गत अर्ज करणाऱ्या पात्र लाभार्थींना १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक अधिकारदिनी कर्जवाटप करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. महामंडळामार्फत अल्पसंख्याकासाठी राबवण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत व्यवसाय सुरू करणाऱ्या उद्योजकांच्या व्यवसायाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. नवउद्योजकांना त्यांच्या फूड व्हॅन आणि प्रवासी टॅक्सीच्या चाव्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आल्या.

दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार राहुल शेवाळे आणि आमदार सदा सरवणकर उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह आदी उपस्थित

## आपला दवाखाना योजनेचे लोकार्पण



संग्रहित छायाचित्र

मुंबई शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी व्हावे असे धोरण आहे. यात धारावीचा पुनर्विकास हा महत्त्वाचा असून, येत्या काही काळात जगाचे लक्ष वेधून घेईल अशी वसाहत प्रत्यक्षात येईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. तसेच मुंबईतील प्रत्येक गरजूला वैद्यकीय उपचार मिळावे, यासाठी आरोग्य यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

राज्यातील ग्रामीण भागातही मुंबईतील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेचा विस्तार करण्यात येईल, असेही त्यांनी जाहीर केले. मुंबई महानगरपालिकेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सेवा सक्षमीकरण योजनेंतर्गत कार्यान्वित 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' यांचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

या प्रसंगी शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, पर्यटन आणि महिला व बालविकास मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, महानगरपालिका आयुक्त व प्रशासक डॉ. इक्बाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. संजीव कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

धारावी परिसरातील संत रोहिदास मार्गावरील काळा किल्ला येथील दवाखान्याचे प्रत्यक्ष तसेच अन्य ठिकाणच्या ५१ दवाखान्यांचे दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण झाले.

होते. या वेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ येथे निवड झालेल्या सहा उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तिपत्र देण्यात आले. यात आशिष जाधव, हर्षाली धनगर, भरत गांजले, रूपाली साखरे, लक्ष्मण शिंदे आणि विनोद राऊत यांचा समावेश होता.

## स्मारकाच्या कामाची पाहणी

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्मारक जनतेला प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करतानाच त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी दिली. स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दादर येथील महापौर बंगला परिसरात सुरू असलेल्या स्मारकाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या वेळी त्यांनी आढावा बैठकही घेतली. बैठकीस मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार राहूल शेवाळे, आमदार दिलीप लांडे, मंगेश कुडाळकर, माजी मंत्री रामदास कदम, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर श्रीनिवास उपस्थित होते.

## राजगृहाचा ऐतिहासिक ठेवा जोपासणार

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या दादर येथील हिंदू कॉलनी परिसरातील 'राजगृह' निवासस्थानाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट दिली. राजगृहाचा ऐतिहासिक ठेवा जोपासला जाईल, असे मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

राजगृहतील डॉ. बाबासाहेब आणि रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केले. मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार भावना गवळी, आमदार डॉ बालाजी किणीकर, वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर आदी उपस्थित होते.

## न्यायालयीन लढ्याच्या समन्वयासाठी नियुक्ती

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात राज्य शासन संपूर्णपणे सीमा भागातील बांधवांच्या भक्कमपणे पाठीशी उभे आहे. या संदर्भातील कायदेशीर लढाईसाठी एकजुटीने प्रयत्न करत असून, त्यासाठी वरिष्ठ विधिज्ञ वैद्यनाथन याची नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रियेच्या समन्वयासाठी मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई या दोन मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगत महाराष्ट्र शासनाच्या योजनांचा लाभ सीमा भागातील बांधवांना प्रभावीपणे होण्यासाठी सीमा प्रश्न हाताळणाऱ्या विशेष कक्षाचे बळकटीकरण करावे. मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ पूर्वीप्रमाणे सीमा भागात देण्याचा तसेच महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभदेखील सीमा भागातील बांधवांना देण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात उच्चाधिकारी समितीची बैठक झाली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, समितीचे सदस्य मंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. तानाजी सावंत, दीपक केसरकर, शंभुराज देसाई, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, आमदार पृथ्वीराज चव्हाण, राजेश क्षीरसागर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ज्येष्ठ संपादक किरण ठाकूर आणि महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य उपस्थित होते.

## आत्महत्या रोखण्यासाठी प्राधान्य

राज्यातील मराठवाडा, विदर्भ भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचे पाणी वळवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनाने तयार केला असून, त्यासाठी जागतिक बँकेने अर्थसाहाय्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केले.

जागतिक बँकेचे भारतातील प्रमुख ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. शिष्टमंडळात शबनम सिन्हा, आदर्श कुमार, सुदीप मोजुमदार, झियांग वाँग सदस्यांसमवेत निवृत्त सनदी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, बेस्टचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग आदी या वेळी उपस्थित होते.

## कृषी उद्योग उभारणार

महाराष्ट्राचा मंगल कलश आणणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची शेतकरी व कष्टकऱ्यांबरोबर नाळ जोडलेली होती. त्यांच्याच विचारावर राज्य शासन काम करत असून, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला चांगला भाव



मिळावा, यासाठी सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात (ग्रो इंडस्ट्री) कृषी उद्योग उभारण्यात येईल. तसेच कराड विमानतळाच्या विकासासाठी हे विमानतळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे

हस्तांतर करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

सातारा जिल्ह्यातील कराड येथे यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक, पशु-पक्षी प्रदर्शन व जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्‌घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभुराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार बाळासाहेब पाटील, आमदार महेश शिंदे, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख आदी उपस्थित होते.

## सीमा भागातील संघटनांना बळ

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील विविध संस्था आणि संघटना यांना मोठे बळ मिळणार आहे. या भागातील ८६५ गावांमधील सामाजिक, शैक्षणिक, धर्मादाय, सांस्कृतिक तसेच निमसार्वजनिक संस्था व संघटनांनादेखील मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीतून अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सीमा प्रश्नी अलीकडेच सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीमा भागातील मराठी बांधव आणि संस्था यांना महाराष्ट्राकडून अर्थसाहाय्य देण्यासंदर्भात सूचना दिल्या होत्या, त्याप्रमाणे शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

'मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी'मधून मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छाधिकारातून राज्यातील विविध संस्था, संघटना यांना अर्थसाहाय्य करण्याची तरतूद आहे. यात सुधारणा करुन नव्या शासन निर्णयात आता सीमा भागातील ८६५ गावांचादेखील यात समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्री धर्मादाय निधीसाठी पुढील वर्षासाठी म्हणजे २०२३-२४ करिता १० कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.

## २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना मानवंदना

मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८च्या दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करताना शहीद झालेल्या मुंबई पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील वीरांना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानवंदना दिली. तसेच त्यांच्या स्मृतीस्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. या वेळी सर्व मान्यवरांनी तसेच गणवेशातील अधिकारी व पोलीस जवानांनी हुतात्म्यांना सलामी दिली.

मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या प्रांगणातील शहीद स्मारक येथे आयोजित अभिवादन संचलन कार्यक्रमास मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनिश सेठ, पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि शहीद कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. या सर्व उपस्थितांनीही पुष्प अर्पण करून शहिदांना अभिवादन केले. या वेळी सर्व मान्यवरांनी उपस्थित शहिदांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन शहीद पोलिसांच्या कुटुंबीयांप्रति सहसंवेदना व्यक्त केली.

## पदभरतीसाठी कार्यवाही

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अनुदानित महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक पदांचा आढावा घेऊन संबंधित पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही करावी. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रलंबित अनुदान दरात ६० टक्के वाढ करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभागातील रिक्त पदांचा तसेच वस्त्रोद्योग विभागातील सूतगिरण्यांच्या पुनर्वसनाबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ.पी. गुप्ता, वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक अभय वाघ उपस्थित होते.



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

## पायाभूत सुविधांबाबतची माहिती

प्रधानमंत्री गतीशक्ती योजना पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. आपल्याकडे विविध योजनांची माहिती उपलब्ध आहे. तथापि संबंधित विभागांनी ही माहिती एका पोर्टलवर एकत्रित ठेवावी, यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरने (एमआरसॅक) सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रधानमंत्री गतिशक्ती योजनेच्या अनुषंगाने राज्यातील विविध प्रकल्पांची माहिती एकत्रित उपलब्ध व्हावी, यासाठी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथिगृह येथे करण्यात आले. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, अपर मुख्य सचिव नितीन करीर, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधेशाम मोपलवार, एमआरसॅकचे संचालक डॉ. ए. के. जोशी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ

अधिकारी उपस्थित होते.

### दीक्षाभूमीला ‘अ’ वर्ग दर्जा देण्यास गती

संपूर्ण देशासाठी मानबिंदू असलेल्या दीक्षाभूमीला ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाला तातडीने गती द्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत आयोजित बैठकीत दिले.

नागपूर शहर आणि जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर सह्याद्री अतिथिगृह येथे श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. त्या वेळी त्यांनी हे निर्देश दिले. बैठकीला आमदार चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, समीर मेघे, विकास कुंभारे, मोहन मते, आशीष जयस्वाल, कृष्णा खोपडे, टेकचंद सावरकर आदी लोकप्रतिनिधी तसेच माजी मंत्री सुलेखा कुंभारे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, विविध विभागांचे सचिव, नागपूरच्या विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

संत जगनाडे महाराजांच्या स्मारकाचा वाढीव खर्च पाहता तो तत्काळ प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावा. या स्मारकाच्या निविदा अंतिम टप्प्यात आहेत. या स्मारकासाठी निधीची कोणतीही कमतरता पडू दिली जाणार नाही. ड्रॅगन पॅलेस टेंपललासुद्धा आवश्यक निधी देण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरसाठी २२ कोटी, शांतिवनसाठी ७.७६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. याही कामाला गती देण्यात यावी. ११८ कोटी रुपये खर्च करून संत चोखामेळा वसतिगृहाचे काम करण्यात येणार आहे. भविष्यातील गरजा ओळखून हे वसतिगृह १३ मजली करून १००० विद्यार्थी क्षमतेचे ते असावे, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यटन टूर सर्किट’चे उद्घाटन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यटन सर्किटच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य, त्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. या पर्यटन सर्किटची व्याप्ती वाढवून शालेय स्तरावरदेखील सहलींचे आयोजन करण्याचा मानस आहे, असे उद्गार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

चेंबूर येथील फाईन आर्ट सोसायटी मध्ये २६ नोव्हेंबर या संविधान दिनाचे औचित्य साधून ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यटन टूर सर्किट’च्या उद्घाटनाप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या वेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा, पर्यटन सचिव सौरभ विजय, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये, पर्यटन संचालक बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी, समाज कल्याणच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, भदंत डॉ. राहुल बोधी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता रणजीत हांडे यासह मान्यवर उपस्थित होते

### शहिदांना आदरांजली

२६/११च्या दहशतवादी हल्ल्या वेळी धाडसी कामगिरी बजावलेल्या पोलीस कर्मचारी, बेस्ट कर्मचारी, सफाई कर्मचाऱ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

पोलीस बॉईज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही गेट वे ऑफ इंडिया येथे २६/११च्या हल्ल्यातील शहीद वीरांच्या स्मरणार्थ श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलिसांचा आणि कर्मचाऱ्यांचा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते गुलाबाचे फुल देऊन सत्कार करण्यात आला.

### माझा गोठा, स्वच्छ गोठा अभियान

लम्पीसारख्या संसर्गजन्य रोगापासून पशुधन सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यात माझा गोठा, स्वच्छ गोठा अभियान प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

मंत्री श्री. विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाविषयी मंत्रालयात बैठक झाली. त्या वेळी त्यांनी राज्यातील संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. या बैठकीस पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जगदीश गुप्ता, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, सह सचिव मानिक गुट्टे, सह आयुक्त डॉ. डी. डी. परकाळे यांच्यासह दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

माझा गोठा, स्वच्छ गोठा अभियान हे एक क्रांतिकारक अभियान असून एक चळवळ उभी करावी. हे अभियान महसूल, कृषी, पशुसंवर्धन आणि ग्रामविकास विभागाने समन्वयाने राबवावे. गोठा स्वच्छ ठेवल्यास लम्पी तसेच इतर संसर्गजन्य



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास

रोगांपासून भविष्यातही पशुधन सुरक्षित राहू शकेल. लम्पी चर्मरोग हा केवळ गोवंश वर्गातील जनावरांना होणारा विषाणुजन्य त्वचारोग आहे. हा रोग कीटकांपासून पसरतो. महाराष्ट्र पशू व मत्स्य विद्यापीठाने कीटकांच्या नियंत्रणासाठी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून राज्यात गोठ्यातील कीटक नियंत्रण, निर्जंतुकीकरण या महत्त्वपूर्ण बाबी पशुपालक व ग्रामपंचायती यांनी मोहीम स्वरूपात राबवाव्यात, असे पशुसंवर्धन मंत्री श्री. विखे- पाटील यांनी सांगितले.

## रोजगार निर्मितीसाठी निधी

राज्यातील ग्रामीण कुटुंबीयांना नियमितपणे रोजगार उपलब्ध करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एनसीडीसी) ही एक केंद्र शासनाची वित्तीय संस्था असून यांच्याकडून राज्याला १० हजार कोटी रुपये मिळणार आहेत. यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळांनी रोजगार निर्मितीचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

शेळी - मेंढीपालन सहकारी संस्थेच्या योजनांच्या अनुषंगाने एनसीडीसीचे सादरीकरण मंत्रालयात आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी श्री. विखे-पाटील बोलत होते. या वेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जगदीश गुप्ता, राष्ट्रीय सहकारी विकास निगमचे महाव्यवस्थापक विनीत नारायण, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक रुबल अग्रवाल, उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हेमंत वसेकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शशांक कांबळे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## योजना आणि प्रकल्पांची माहिती

राज्य शासनाच्या महत्वाच्या विकास योजना आणि महत्त्वाच्या विकास प्रकल्पांची सद्य:स्थिती नेमकी काय आहे. त्यात काय अडचणी आहेत, याची माहिती मुख्यमंत्री (सीएम) डॅशबोर्डद्वारे तत्काळ मिळणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. मुख्यमंत्री डॅशबोर्डची रचना वापरकर्त्यांसाठी सुलभ आणि सहज असण्यावर भर देण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मंत्रालयातील मुख्यमंत्री वॉर रुममध्ये मुख्यमंत्री डॅशबोर्डसंदर्भात सादरीकरण आणि मध्यप्रदेश मुख्यमंत्री डॅशबोर्डचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद आयोजित करण्यात आला होता. या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, माहिती व तंत्रज्ञानचे प्रधान सचिव असिम कुमार गुप्ता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक जयश्री भोज, उपमुख्यमंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

## लोगो आणि पोस्टरची निर्मिती

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने लोगो आणि पोस्टरची निर्मिती करण्यात येईल. आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतून उत्कृष्ट ठरणारा लोगो आणि पोस्टरची अंतिम निवड करण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सवानिमित्त मराठवाड्यात शासकीय सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यासंदर्भात तसेच सांस्कृतिक कार्य विभागातील विविध विषयांवरील बैठक सह्याद्री अतिथिगृह येथे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे, सहव्यवस्थापकीय संचालक कुमार खैरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, उपसचिव विद्या वाघमारे यांच्यासह सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## वन सेवा केंद्र

सामान्य नागरिकांना 'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून अनेक सेवा सुविधा उपलब्ध होत असतात. याच धर्तीवर वन विभागामार्फत केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व सेवा एका छताखाली देण्यासाठी वन सेवा केंद्र सुरू करण्याचे निर्देश वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

वन मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नियामक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, आमदार आशीष जयस्वाल, राजकुमार पटेल, मनोहर चंद्रिकापुरे, विजय हांगडाले, प्रकाश भारसाखळे यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## दृक्श्राव्य केंद्राचे उदघाटन

महाराष्ट्राला संपन्न असा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या संपन्न अशा वारसाचे जतन आणि जोपासना करून येणाऱ्या काळात जगामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारसाचे उदाहरण दिले जाईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या दृक्श्राव्य केंद्राचे स्वरालय दालनात उद्घाटन केले. या वेळी ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री वामन केंद्रे, दर्शनिका विभागाचे सचिव दिलीप बलसेकर, सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांच्यासह सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाच्या निकषानुसार एससी/एसटी/ओबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे वर्षाला ६० हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी)

याअंतर्गत वसतिगृह, शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीबाबत मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे व संबंधित अधिकारी या वेळी उपस्थित होते.



**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

### वैयक्तिक कर्जव्याज परतावा योजनेची मर्यादा

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत मराठा समाजातील व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना राबवण्यात येते. यामध्ये १० लाखाच्या मर्यादेत असणाऱ्या कर्जावरील व्याज परतावा महामंडळामार्फत देण्यात येतो. या योजनेंतर्गत कर्ज मर्यादेत वाढ करून १५ लाख करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्ज मर्यादा वाढवल्यामुळे लाभार्थींना कर्जाच्या हप्त्यांमध्ये सुलभता राहावी. म्हणून कर्ज परताव्याचा कालावधीसुद्धा ५ वर्षांवरून ७ वर्षापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा मराठा समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासोबतच मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठित केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्रालयात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांच्या संदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते उपस्थित होते.

### मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन

भारत आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनात माहिती तंत्रज्ञानाचे योगदान मोठे आहे. आत्मनिर्भर भारताच्या मजबूत पायाभरणीसाठी आणि देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी नवीन संशोधनाला चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

मुंबई विद्यापीठ येथे तंत्रशिक्षण संचालनालय आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी निर्मित केलेल्या पदविका व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या मराठी भाषेतील पाठ्यपुस्तकांचा वितरण सोहळा संपन्न झाला. केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष सरकार आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या पदविका व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन आणि वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार आशिष शेलार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष तथा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रा. जगदेश कुमार, नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन नवी दिल्ली अध्यक्ष प्रा. के. के. अग्रवाल, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली उपाध्यक्ष प्रा. एम. पी. पुनीया, तंत्रशिक्षणचे संचालक डॉ. अभय वाघ, महाराष्ट्रातील प्राध्यापक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### गट ब, क संवर्गातील पदे भरणार

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्थ सरळसेवेची गट-ब (अराजपत्रित), गट-क तांत्रिक / अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील साधारण: ४ हजार ५०० पदे भरण्यात येणार असल्याची माहिती, वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्थ असलेल्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, आयुष संचालनालय, अन्न व औषध प्रशासन व मानसिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेली गट-क तांत्रिक / अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे भरण्याची प्रक्रिया टि.सी. एस. आयओएन या कंपनीमार्फत करण्यास राज्य शासनाकडून मान्यता प्रदान करण्यात आली आहे.



**गिरीष महाजन**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये शासकीय कार्यालयातील ७५ हजार रिक्त पदे भरण्यास मंत्रिमंडळानेही मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्यानुसार विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया संपूर्ण देशात सुरू झालेली आहे. अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येणार आहे.

### ग्रामसडक योजनेचा राज्यस्तरीय आढावा

ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून होणारे रस्ते अधिक दर्जेदार होण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात येत आहेत. यात गुणवत्तेबाबत कुठलीही तडजोड करू नये. ग्रामीण भागामध्ये रस्त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी, यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी केले.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना या दोन्ही योजनांची राज्यस्तरीय आढावा बैठक सह्याद्री अतिथिगृह येथे झाली. या बैठकीस ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार मीना, योजनेचे सचिव खंडेराव पाटील, मुख्य अभियंता संभाजी माने तसेच मंत्रालयीन अधिकारी व क्षेत्रीय अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

## अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता

जिल्हा परिषदांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना रूपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यासाठी पूर्वलक्षी प्रभावाने अधिसंख्य पदे निर्माण करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.



**गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

या कर्मचाऱ्यांच्या वेतन/भत्ते व सेवानिवृत्ती वेतनासाठी जिल्हा परिषदांना अनुदान उपलब्ध करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी पाठपुरावा केला होता. पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास आणि वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सातत्याने बैठका घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. राज्याच्या १९ जिल्हा परिषदांमधील ५४७ सेवानिवृत्त कर्मचारी आणि ३४७ कार्यरत कर्मचारी यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

## जल वाहतूक प्रकल्पांना गती देणार

नवीन प्रवासी जल वाहतूक प्रकल्पांमुळे प्रवाशांचा वेळ व पैसा या दोन्हीची मोठी बचत होणार असल्याने मुंबईतील प्रवासी जल वाहतूक प्रकल्पांना गती देण्यात येत असल्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.



**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

मंत्रालयातील दालनात मुंबईतील जलवाहतूक यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री श्री. भुसे बोलत होते. या वेळी बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष राजीव जलोटा, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, बंदरे विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, मुख्य बंदर अधिकारी कॅ. संजय शर्मा आदी उपस्थित होते.

## बंदरे विकासाला गती देणार

राज्याच्या विकासात व आर्थिक प्रगतीत बंदरे क्षेत्राचा वाटा महत्त्वाचा असून या क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यास प्रोत्साहन देवून राज्यातील बंदरे विकासाला गती देण्यात येत असल्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

बंदरे विकास धोरण संदर्भात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड सभागृह येथे लोकप्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. त्या वेळी श्री भुसे बोलत होते. या वेळी शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार आदिती तटकरे, आमदार नितेश राणे, भरत गोगावले, महेंद्र दळवी, वैभव नाईक, शांताराम मोरे, प्रकाश सुर्वे तसेच बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, बंदरे विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, मुख्य बंदर अधिकारी कॅ. संजय शर्मा आदी उपस्थित होते.

## 'सागरमाला' अंतर्गत प्रकल्पांना मंजुरी

केंद्र सरकारने सागरमाला योजनेंतर्गत महाराष्ट्रातील चार नवीन जेट्टी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यामध्ये मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ क्लब अपोलो बंदर, जंजीरा बंदर, पद्मदुर्ग बंदर व सुवर्णदुर्ग येथील बंदरांचा समावेश आहे. राज्यातील जलवाहतूक वाढणार असून याचा लाभ प्रवासी, मालवाहतूक आणि पर्यटकांना होणार आहे. जलवाहतूक सुरू होणार असल्याने रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होणार असल्याची माहिती बंदरे आणि खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार बंदरे आणि खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी राज्यातील बंदरांचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, यासाठी ११ सप्टेंबर २०२२ रोजी केंद्रीय पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांना विनंती केली होती. राज्य सरकारच्या प्रस्तावाला तत्काळ प्रतिसाद देत केंद्रीय मंत्री श्री. सोनोवाल यांनी या चारही प्रकल्पांना मंजुरी दिली. सागरमाला प्रकल्पांच्या खर्चामध्ये ५० टक्के खर्च राज्य

सरकार आणि ५० टक्के केंद्र सरकार करणार आहे. केंद्र सरकारने या चार प्रकल्पासाठी ३१२ कोटी रुपये मंजूर केल्याची माहितीही श्री. भुसे यांनी दिली.

## सन्मान धन योजनेंतर्गत लाभ

राज्य शासनाच्या कामगार विभागामार्फत राज्यात घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या आणि ५५ वर्ष पूर्ण केलेल्या नोंदणीकृत घरेलू कामगारांना सन्मान धन योजनेंतर्गत दहा हजार रुपयांचा आर्थिक लाभ मिळणार असल्याची माहिती, कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे यांनी दिली.



**डॉ. सुरेश खाडे**
मंत्री, कामगार

'जागर मुंबईचा' या अभियानांतर्गत कामगारांसाठी चेंबूर येथे भाऊबीज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास राज्याचे कामगार मंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, आमदार ॲड. आशिष शेलार, सावित्रीबाई फुले घरेलू कामगार संघटना संस्थापक-अध्यक्ष सुभाष मराठे, नगरसेविका आशाताई मराठे आदी उपस्थित होते.

घरेलू कामगार हा आपल्या कुटुंबाचा भाग असतो. विभक्त कुटुंब पद्धतीत व बदलत्या जीवनशैलीमध्ये त्यांचे कुटुंबात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. यामुळेच या घरेलू कामगारांचे जीवनमान हे आर्थिक तसेच सामाजिक स्तरावर अधिक उंचावण्यासाठी शासनस्तरावर अनेक प्रयत्न केले जात आहेत. यासाठी शासनाने महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत नोंदणीकृत कामगारांना आर्थिक लाभ देण्यात येतो. पुढील काळात नोंदणीसाठीचे शुल्क नाममात्र करण्यात येणार असून त्यासोबतच आयुष्यभर लोकांची सेवा करणारे आणि समाजाचा अतिशय महत्त्वाचा घटक असलेल्या घरेलू कामगारांसाठी ज्यांचे वय ५५ वर्षांपेक्षा अधिक आहे, अशा सर्व नोंदणीकृत कामगारांना शासनातर्फे सन्मान धन योजनेंतर्गत १० हजार रुपयांचा आर्थिक लाभ देण्यात येणार आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

## रोहयो अंतर्गत सिंचन विहिरींची कामे

राज्यातील प्रत्येक कुटुंबाचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींच्या कामासाठी प्रमाणित संचालन प्रक्रिया (एसओपी) तयार करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ही कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याची माहिती रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी दिली.



**संदिपान भुमरे**
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन

महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजनेचा जनक आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हा कायदा भारत सरकारने त्या आधारावरच केला आहे. काळपरत्वे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये बदल करण्यात आले असून त्यात वैयक्तिक लाभावर भर देण्यात आलेला आहे. अलीकडेच वैयक्तिक कामांमध्ये किमान ६० टक्के राशी खर्च करण्याचे निर्देश भारत सरकारकडून प्राप्त झाले आहे. अर्थात मनरेगा फक्त रोजगार देणारी योजना नसून विकासात भर घालणारी योजना असल्याचे मंत्री श्री. भुमरे यांनी सांगितले.

## उद्योजक घडवण्याचे उद्दिष्ट

राज्यात सुमारे २५ हजार उद्योजक घडवण्याचे उद्दिष्ट असून यातून ७५ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

राज्यातील तरुणांच्या हाताला काम मिळावे. तसेच त्याद्वारे नवउद्यमी घडवण्यासाठी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

योजनेद्वारे कर्ज देण्यासाठी जिल्हा बँकांचाही समावेश करण्यात आला आहे. या योजनेसाठी २०२२ ते २०२३ वर्षामध्ये ५५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेत पूर्वी अनुसूचित जाती, जमाती, महिला, दिव्यांग आदींचा समावेश होता. आता इतर मागास वर्ग, भटके विमुक्त, अल्पसंख्याक आदी घटकांचा या योजनेत समावेश करण्यात आल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांचाही या योजनेत समावेश करण्यात येईल.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

राबवण्यासाठी राष्ट्रीय बँकांद्वारे कर्ज वितरित करण्यात येत होते. आता यापुढे जिल्हा बँकाद्वारे तरुणांना कर्ज मिळणार आहे. याबाबतचे शासनादेश पारित करण्यात येतील.

केंद्र सरकारच्या मदतीने राज्यात २२८० कोटींचे अन्न प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार आहे. हे प्रकल्प खासगी जागांवर होणार असून त्यासाठी शासन नियमांप्रमाणे प्रोत्साहने देणार आहे. याद्वारे २५ हजार रोजगार निर्माण होतील, असे श्री. सामंत यांनी सांगितले.

## फुटवेअर आणि लेदर धोरण

राज्यात फुटवेअर आणि लेदर क्लस्टर, स्टील पार्क, इलेक्ट्रिक वाहन व अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी राज्यामध्ये मुबलक प्रमाणात संसाधने उपलब्ध असून फुटवेयर आणि लेदरसंदर्भात येत्या महिनाभरात धोरण निश्चित होणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

उद्योग उभारण्याबाबत उद्योगमंत्री श्री.सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपिन शर्मा, उद्योजक, सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## लसीकरण वाढवण्याचे निर्देश

मुलांचे लसीकरण वाढवा, मुलांसाठी स्वतंत्र ओपीडी सुरू करावी आणि सर्वेक्षण करून संशयित लक्षणे असणाऱ्या मुलांवर लक्ष ठेवा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई महानगर पालिका अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री श्री. सावंत यांनी मुंबई महापालिकेमार्फत शहरातील काही भागात राबवण्यात येणाऱ्या गोवर प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. संजीव कुमार, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक आणि आयुक्त डॉ. तुकाराम मुंढे, महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमारे, जागतिक आरोग्य संघटनेचे तज्ज्ञ डॉ. राहुल शिंपी, राज्य साथरोग अधिकारी डॉ प्रदीप आवटे आदी उपस्थित होते.



**प्रा. डॉ. तानाजी सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

## लसीकरण करून घेण्याचे आवाहन

गोवरच्या संसर्गावर नियंत्रण मिळवण्यात आरोग्य यंत्रणांना यश येत आहे. येत्या काही दिवसांतच व्यापक सर्वेक्षण आणि लसीकरणाच्या माध्यमातून गोवर संसर्गावर पूर्ण नियंत्रण मिळवण्यात येईल. पालकांनी मुलांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केले.

आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी गोवर प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी कस्तुरबा रुग्णालयात भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली. तिथेही त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून सूचना दिल्या. मंत्रालयात झालेल्या बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ संजीव कुमार, आरोग्य आयुक्त डॉ तुकाराम मुंढे, महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमारे, जागतिक आरोग्य संघटनेच्या डॉ. मीता वशी, डॉ. अरुण गायकवाड आदी उपस्थित होते.

## रेल्वेस्थानकांचा कायापालट करणार

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण रेल्वेच्या सर्व प्रमुख स्थानकांच्या सुशोभीकरणाची प्रक्रिया येत्या सात दिवसांत सुरू करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले. कोकण रेल्वे स्थानक ते मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, नूतनीकरण, स्थानकांचे सुशोभीकरण आदी विविध विषयासंदर्भात सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्या वेळी कोकण रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि रेल्वे पोलीस अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## ‘आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण गोवा’च्या धर्तीवर महाराष्ट्रातही योजना

गोवा सरकारतर्फे राबवण्यात येणारी ‘आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण गोवा’ ही अतिशय अभिनव व प्रेरणादायी स्वरूपाची योजना आहे. या योजनेसाठी सरकारी अधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेले काम कौतुकास्पद आहे. त्यामुळे ‘आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण गोवा’ योजनेची अभिनव कल्पना भविष्यात महाराष्ट्रात लवकरच सुरु करण्याबाबत विचार करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.



**रवींद्र चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

गोवा सरकारच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या ‘आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण गोवा’ योजनेचा अभ्यास करण्यासाठी गोवा येथे गेलेल्या शिष्टमंडळामध्ये महाराष्ट्राच्या

वतीने सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चव्हाण उपस्थित होते. गोवा सरकारच्या नियोजन महासंचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण गोवा' कार्यक्रमांतर्गत मंत्री श्री. चव्हाण यांनी विशेष परिसंवादामध्ये आपली भूमिका मांडली.

## राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

कृषी क्षेत्रात काळानुरूप बदल करून शेतकऱ्याला संपन्न करण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे कृषी क्षेत्रातील जागतिक स्पर्धेत पुढे जाण्यासाठी मूल्यसाखळी वृद्धीच्या माध्यमातून प्रयत्न करावे लागतील, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंह तोमर यांनी केले.

पुणे येथील वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेत 'फलोत्पादन पिकांमधील मूल्यसाखळी वृद्धी-क्षमता व संधी' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. बैठकीस राज्याचे कृषी मंत्री अब्दुल सत्तार, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव मनोज आहुजा, अतिरिक्त सचिव डॉ. अभिलक्ष लिखी, राज्याच्या कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, केंद्रीय सहसचिव प्रिय रंजन, केंद्रीय फलोत्पादन आयुक्त प्रभात कुमार, कृषी आयुक्त धीरज कुमार आदी उपस्थित होते.



**अब्दुल सत्तार**
मंत्री, कृषी

## कृषी महाविद्यालयासाठी निधी

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत मूल-मरोडा (चंद्रपूर) येथे शासकीय कृषी महाविद्यालयाच्या निर्मितीकरिता कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी २५.५५ कोटी रुपये वितरित करण्याचे आदेश दिले. वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करत होते.

मंत्रालयात गुरुवारी कृषी मंत्री श्री. सत्तार यांच्यासोबत मुल कृषी महाविद्यालयासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. कृषी मंत्री श्री.सत्तार यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने स्वाक्षरी करून निधी मंजूर केला.

## प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक

राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या प्रलंबित मागण्यांबाबत राज्य शासन सकारात्मक असून, त्याबाबत शिक्षण संस्था महामंडळामार्फत सुचवण्यात आलेल्या विविध सूचनांची दखल घेण्याबाबतचे निर्देश शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या प्रलंबित मागण्यांबाबत बैठकीचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते. त्या वेळी श्री. केसरकर बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या अध्यक्ष तथा खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री तथा महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे कार्याध्यक्ष विजय पाटील, आमदार तथा महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था सरकार्यवाह विजय गव्हाणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, शिक्षण संचालक शरद गोसावी, उपसचिव समीर सावंत, उप सचिव तुषार महाजन, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे प्रदेश कार्यवाह रामकिशन रोंदळे, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कानडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'संकल्प संपूर्ण स्वास्थ्य' कार्यक्रम

राज्य शासनाच्या विद्यार्थी समग्र विकास धोरणांतर्गत राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी 'संकल्प संपूर्ण स्वास्थ्य' कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. यासंदर्भात इंडियन कॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) सोबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सामंजस्य करार केला आहे. शासकीय शाळांमधून बालकांच्या आरोग्याबाबत प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचा करारात समावेश आहे.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत रामटेक या शासकीय निवासस्थानी हा करार करण्यात आला. शासनाच्या वतीने शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देओल आणि आयएपी संस्थेचे अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव इम्तियाज काझी, डॉ. समीर दलवाई, डॉ. हेमंत गंगोलिया, डॉ. हेमंत जोशी आदी उपस्थित होते.

## घरकुलांसाठी निधी देणार

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर मतदारसंघात यशवंतराव मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून भटक्या विमुक्त समाजाच्या घरकुलांसाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल, असे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

बल्लारपूर मतदारसंघात यशवंतराव मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून निधी मिळण्याबाबत चंद्रपूरचे पालकमंत्री तथा वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांची मंत्रालयात भेट घेतली. त्यावर



**अतुल सावे**
मंत्री, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण

श्री. सावे यांनी तत्काळ निर्णय घेत घरकूल योजनेसाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश विभागाला दिले. या वेळी इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. नंदकुमार तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पर्यटनस्थळांच्या विकासासाठी निधी

सातारा जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास होऊन रोजगार निर्मितीसाठी जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी, तापोळा व कोयनानगर या पर्यटन क्षेत्रातील सूक्ष्म पर्यटन विकास आराखड्यानुसार विकास कामांना गती द्यावी. तसेच सातारा जिल्ह्यातील डोंगराळ, दुर्गम भागात येत्या पावसाळ्यापूर्वी दळण- वळणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानुसार तातडीने कार्यवाही करावी, मुख्यमंत्र्यांनी जिल्ह्यातील पर्यटन विकासाचा आढावा घेतलेल्या कामांना निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश साताराचे पालकमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले.



**शंभुराज देसाई**
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क

महाबळेश्वर- पाचगणी व इतर परिसरातील पर्यटनविषयक प्रलंबित विविध कामांचा आढावा मंत्री श्री. देसाई, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. त्या वेळी मंत्री श्री. देसाई बोलत होते. या वेळी पर्यटन विभागाचे सचिव सौरभ विजय, साताराचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस. साळुंखे, कार्यकारी अभियंता संजय सोनवणे, महसूल विभागाचे सहसचिव अतुल कोदे, ग्रामविकास विभागाचे उपसचिव का. गो. वळवी, महाबळेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. साताराचे जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, पोलिस अधीक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## ‘स्वच्छ मुंबई, स्वस्थ मुंबई’ अभियान

'स्वच्छ मुंबई स्वस्थ मुंबई अभियान मुंबई उपनगर जिल्ह्यातील १५ वॉर्डमध्ये १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबवण्यात येणार आहे. शासनाचे सर्व विभाग, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना तसेच नागरिकांनी या अभियानात श्रमदान करून हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

‘स्वच्छ मुंबई, स्वस्थ मुंबई’ अभियान याविषयी मुंबई महानगर प्रदेश विकास कार्यालय येथे पूर्व तयारीबाबत आयोजित बैठकीत मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशिष शर्मा, मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अधिकारी चंदा जाधव, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष दळवी, जिल्हा नियोजन अधिकारी भूषण देशपांडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, विविध क्षेत्रातील सामाजिक संस्था, असोसिएशनसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ‘सक्षम महिला, सक्षम महाराष्ट्र’ उपक्रम

महिलांच्या विविध तक्रारी तसेच समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, याकरिता सक्षम महिला, सक्षम महाराष्ट्र (जनसुनावणी) हा उपक्रम महिला व बालविकास विभागामार्फत १ डिसेंबर २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर शासकीय महिला वसतिगृहातील महिला व इतर गरजू महिलांसाठी कौशल्य विकास विभागामार्फत रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणार असल्याची माहिती कौशल्य विकास, महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.



**मंगलप्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास.

मंत्रालयातील दालनात महिला व बालविकास विभागाच्या आढावा बैठकीत मंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी महिला व बालविकास आयुक्त आर. विमला, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त रुबल अग्रवाल, महिला आयोगाच्या प्रशासकीय अधिकारी दीपा ठाकूर, महिला व बालविकासचे सह सचिव श्री. अहिरे एकात्मिक बालविकास आयोगाचे विजय क्षीरसागर उपस्थित होते.

**– टीम लोकराज्य**

राज्य मंत्रिमंडळाच्या १७ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत नगर विकास, सामान्य प्रशासन, उच्च व तंत्रशिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, विधी व न्याय, पणन, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, सामाजिक न्याय आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...




# मंत्रिमंडळात ठरले !

## मालमत्ता दर न बदलण्याचा निर्णय

कोविडमुळे झालेल्या विपरित परिणामांमुळे मुंबईतील भांडवली मुल्याधारित मालमत्ता दर सध्या म्हणजे २०२२-२३ करिता न सुधारण्याचा निर्णय घेण्यात आला. याप्रमाणे मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम १५४(१ड) मध्ये सुधारणा करण्यात येईल.

कोविडमुळे लागू केलेल्या टाळेबंदी तसेच प्रादुर्भावाच्या भीतीमुळे अनेक लहानमोठे उद्योगधंदे, शैक्षणिक संस्था, विकासाची कामे, कारखाने, बहुतांशी औद्योगिक क्षेत्रे, दैनंदिन रोजगार बंद होता. यामुळे सर्वसाधारण अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला. त्यामुळे बहुतांशी मालमत्ताधारक, संस्था, लोकप्रतिनिधींकडून मालमत्ता कर माफ करणे किंवा सवलत देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे निवेदने दिली होती. या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर भांडवली मूल्य सुधारित करण्यास २०२२-२३ करिता सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत दिल्याने महानगरपालिकेची अंदाजे १११६.९० कोटी रुपये इतकी महसूल हानी होणार आहे.

## निवृत्तिवेतनात दुपटीने वाढ

राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्तीवेतन दुपटीने वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आता स्वातंत्र्य सैनिकांना १० हजार रुपयांऐवजी दरमहा २० हजार रुपये निवृत्तिवेतन मिळेल. भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, मराठवाडा मुक्ती संग्राम व गोवा मुक्तिसंग्रामातील



स्वातंत्र्यसैनिकांना याचा लाभ मिळणार आहे. या निवृत्तिवेतनात वाढ करण्याची मागणी वारंवार होत होती. यासाठी वार्षिक अंदाजे ७४.७५ कोटी रुपये इतका अधिक खर्च येईल. या निवृत्तिवेतन वाढीचा राज्यातील ६२२९ स्वातंत्र्यसैनिकांना लाभ होईल. भारतीय स्वातंत्र्य लढा, हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्राम अशा देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी दरमहा निवृत्तिवेतन देण्याची योजना महाराष्ट्र शासनाने १९६५ पासून सुरू केली आहे. त्यानुसार २ ऑक्टोबर २०१४ पासून दर महिन्याला १० हजार रुपये इतके निवृत्तिवेतन देण्यात येते.

## विधी विद्यापीठात सुविधा उपलब्ध

नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठात सुविधा उपलब्ध करण्यासाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. या विद्यापीठाच्या वारंगा येथील स्थायी कॅम्पसमधील शैक्षणिक संकुल मुलामुलींचे वसतिगृह मेनिटी ब्लॉक व प्रशासकीय संकुल या इमारतींमध्ये हिटिंग, व्हेंटिलेशन व एअरकंडिशन यंत्रणा लावण्यात येणार आहेत.

## जेएसपीएम विद्यापीठास मान्यता

पुणे येथे जेएसपीएम विद्यापीठ या स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. हे विद्यापीठ २०२३-२४ पासून सुरू होईल. तसेच याबाबतीत विधिमंडळासमोर विधेयक सादर करण्यात येईल. हे प्रस्तावित विद्यापीठ हवेली तालुक्यातील वाघोली येथे असेल.

## निवड पद्धतीत सुधारणा

राज्यातील अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू यांची निवड पद्धती आता विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्याप्रमाणे होणार आहे. यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला, तसा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांच्या निवडीची पद्धत, अर्हता इत्यादीसंदर्भात १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा केलेल्या आहेत. या सुधारणा आणि त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अधिनियम १९८९, कवी



कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, अधिनियम १९९७ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते.

या अध्यादेशाद्वारे प्रामुख्याने पुढील सुधारणा करण्यात येणार आहेत. कुलगुरू पदावर नियुक्तीसाठी प्राध्यापक पदावरील किमान १० वर्षे इतका अनुभव विहित करण्यात आला आहे. कुलगुरुपदाची निवड

करण्यासाठी शोध व निवड समितीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रतिनिधीचा समावेश करण्यात आला आहे. कुलगुरूंनी केलेली शिफारस विचारात घेऊन प्र-कुलगुरूची नियुक्ती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकडून करण्यात येणार आहे.

## महाविद्यालयांच्या परवानगीसाठी मुदत

नवीन महाविद्यालयांच्या परवानगीसाठी आता १५ जानेवारी २०२३ पर्यंत अर्ज स्वीकारण्यास व त्याप्रमाणे वेळापत्रकात बदल करून अध्यादेश प्रख्यापित करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणेनुसार राज्यामध्ये नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था, नवीन अभ्यासक्रम, विषय, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी अधिनियमात असलेल्या वेळापत्रकात बदल करण्यात येतील.

## कला संस्थांमधील शिक्षकांना लाभ

अशासकीय अनुदानित कला संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध सेवाविषयक लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत कला संचालनालयाच्या नियंत्रणाखाली ३१ अशासकीय अनुदानित कला संस्था आहेत. या कला संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध लाभ ५ ऑक्टोबर २०१७ पासून लागू करण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

हे लाभ पुढीलप्रमाणे राहतील - अशासकीय अनुदानित कला संस्थांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९९८ मधील सर्वसाधारण तरतुदी (भविष्यात करण्यात येणाऱ्या सुधारणांसह) लागू करणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती योजना लागू करणे, अध्यापकीय पदांना द्विस्तरीय / त्रिस्तरीय वेतन संरचना लागू करणे, अध्यापकांनी विनाअनुदानित कला संस्थेमध्ये केलेली सेवा उच्च वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाच्या तरतुदी लागू करणे, शिक्षक आणि शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांपर्यंत प्रसुती रजा मंजूर करणे, कॅन्सर पक्षाघात झालेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजाविषयक तरतुदी लागू करणे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचार आणि वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती लागू करणे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत अनुज्ञेय करणे, अशासकीय अनुदानित कला संस्थामधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबीयांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय करणे.

## रोजंदारी कर्मचाऱ्यांना दिलासा

ग्रामीण पाणीपुरवठा योजनांमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. त्यांच्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक, जळगाव, अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलडाणा, अकोला, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांतील ५४७ सेवानिवृत्त व ३४७ कार्यरत कर्मचारी यांना याचा लाभ मिळणार असून, यासाठी २४.०४ कोटी रुपये इतक्या आवर्ती खर्चास व थकबाकीपोटी येणाऱ्या ५०.०१ कोटी रुपये इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. पाणीपुरवठा योजना तयार केल्यानंतर योजना चालवण्यासाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात येते. अशा योजनेवरील कार्यरत रोजंदारी कर्मचारी यांना जिल्हा परिषदेकडून वेतन देण्यात येते. विविध कारणास्तव या रोजंदारी कर्मचाऱ्यांना वेतन देण्यासाठी जिल्हा परिषदांना आर्थिक अडचणी येत आहेत. यामुळे या कर्मचाऱ्यांना पुरेसे व वेळेवर वेतन अदा न झाल्याने पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे चालवण्यास मर्यादा येत आहेत.

रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांकडून विविध न्यायालयामध्ये उपस्थित प्रकरणामध्ये दिलेले आदेश, कालेलकर आयोगाच्या शिफारशी, पाणीपुरवठा योजना चालवण्यासाठी जिल्हा परिषदांना येणाऱ्या अडचणी विचारात घेवून शासनाने या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे दायित्व उचलण्याचा निर्णय घेतला आहे. याकरिता या कर्मचाऱ्यांना एक वेळची विशेष बाब म्हणून कर्मचारी कार्यरत असेपर्यंतच पद निर्मिती करण्याचे ठरवले असून त्यांना रूपांतरित नियमित अस्थायी (सीआरटी) आस्थापनेवर सामावून घेण्यात येईल.

## बाजार समितीची निवडणूक

आता सर्वसामान्य शेतकरीदेखील बाजार समितीची निवडणूक लढवू शकतील. या संदर्भात महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सुधारणेमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीवर सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व तसेच कामकाजात प्रत्यक्ष सहभाग वाढणार आहे.

या अधिनियमाच्या १३ (१)(अ) या कलमामध्ये सुधारणा करून कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना निवडणूक लढवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या सुधारणेमुळे कृषी पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था यांच्या व्यवस्थापन समितीवरील निर्वाचित सदस्य व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासोबतच सर्वसामान्य शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढवता येईल.

## प्रकल्पाच्या कामास गती

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नाधवडे लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी १०७.९९ कोटी खर्चास सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. या



निर्णयामुळे वैभववाडी तालुक्यातील नाधवडे व सरदारवाडी गावातील सुमारे ५०० हेक्टर जमिनीला फायदा होणार आहे. हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशात असून या

प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ८.२२ द.ल.घ.मी. असा आहे.

## गौण खनिजाबाबत दंडाचे आदेश रद्द

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठीचे गौण खनिजाबाबत दंडनीय कारवाईचे आदेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महामार्गासाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजांच्या उत्खननावर आकारणी पात्र असलेले स्वामित्वधन बसवण्यास सूट दिली आहे. मात्र काही प्रकरणी दंडनीय कारवाईपोटी केलेल्या आदेशांच्या विरुद्ध संबंधित कंत्राटदारांनी वेगवेगळ्या प्राधिकरणांपुढे केलेल्या अपिलांच्या सुनावणी अद्यापही सुरू आहे, तर काही प्रकरणी महसूल यंत्रणेने वसुलीची कार्यवाही सुरू केली आहे. ही दंडनीय कारवाई ही विहित निर्देशानुसार केलेली नसल्यामुळे दंडनीय कारवाईचे आदेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सध्या सुरू असलेली सर्व प्रकरणेदेखील रद्द करण्यात आली आहेत.

## भूसंपादनासाठी कर्ज घेण्यास मान्यता

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी ३५ हजार ६२९ कोटी रुपये कर्जरुपाने उभारण्यास मान्यता देण्यात आली. या मान्यतेमुळे भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार. कर्ज उभारणीस मान्यता दिलेल्या रकमेपैकी हुडकोकडून सुरुवातीला ५६४० कोटी रुपये इतका निधी उभा करण्यास मान्यता देण्यात आली.

विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प, पुणे शहराभोवतालचा चक्राकार वळण मार्ग (Ring Road) बांधण्याचा प्रकल्प व जालना ते नांदेड द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी आवश्यक निधी हुडको व इतर वित्तीय संस्थांमार्फत मुदती कर्जाद्वारे उभारणाचा प्रस्ताव होता. या तीनही प्रकल्पांसाठी एकूण ३५,६२९ कोटी रुपये इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कर्जरूपाने उभारण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी लागणारी हमी शासनाकडून दिली जाणार आहे. यासाठी कर्ज व त्यावरील व्याज परतफेड करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात येईल. महामंडळाकडील भूखंडाच्या विक्रीतून येणारी रक्कमही कर्जाच्या परतफेडीसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या कर्जाचा कालावधी १५ वर्षांचा असेल.

## स्पर्धा परीक्षा घेण्यास मान्यता

राज्यातील पदभरतीच्या स्पर्धा परीक्षा टीसीएस-आयओएन व आयबीपीएस या कंपन्यांकडून घेण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे भरती प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील म्हणजेच लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब, गट-क आणि गट-ड ही पदे सरळ सेवेने भरताना आता या कंपन्यांमार्फत स्पर्धा परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येतील. यासाठी परीक्षा घेण्याचे दर, परीक्षांची विहित कार्यपद्धती व इतर अटी शर्ती माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने करण्यासदेखील मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या अनुषंगाने उच्चाधिकार समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा होऊन या दोन्ही कंपन्यांनी दिलेल्या कराराच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली.



संबंधित विभागाने पदभरती करताना ऑनलाइन पद्धतीने प्रत्येक पदभरती प्रक्रिया व स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी या कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करावयाचा आहे. या संदर्भातील विस्तृत शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात येत आहे.

## नियुक्तीपासून वंचित राहिलेल्यांना दिलासा

एसईबीसीमधून ईडब्ल्यूएसमध्ये विकल्प दिलेल्या व ज्यांची निवड ९ सप्टेंबर २०२० पूर्वी झालेली आहे अशा उमेदवारांना ईडब्ल्यूएस प्रवर्गाचा लाभ देऊन निवड प्रक्रिया व उमेदवारांच्या वैध शिफारशीनुसार नियुक्ती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिकांवरील अंतिम निकालाच्या अधीन राहून ही नियुक्ती असेल

या निर्णयाचा लाभ २०१४ ते ९ सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये निवड झालेल्या एसईबीसी उमेदवारांना अनुज्ञेय करण्यात आलेला ईडब्ल्यूएस विकल्प ग्राह्य धरून, नंतर पूर्ण करण्यात आलेल्या निवड प्रक्रियेमधील नियुक्तीपासून वंचित राहिलेल्या उमेदवारांना मिळणार आहे.

मराठा आरक्षण कायदा २०१८ या कायद्यास सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर २०२० रोजी अंतरिम स्थगिती दिली व ५ मे २०२१ रोजी कायदा रद्द केला.

ईएसबीसी कायदा २०१४ व एसईबीसी कायदा २०१८ अन्वये निवड झालेल्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यापूर्वी, नोकरभरती वरील निर्बंध, कोविड-१९, लॉकडाऊन व न्यायालयीन प्रक्रिया या कारणांमुळे उमेदवारांची निवड होऊनदेखील त्यांना शासकीय सेवेत नियुक्ती देता आली नाही.

सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यापूर्वी ईएसबीसी / एसईबीसी प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना ईडब्ल्यूएसचा (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) लाभ देण्यासाठी त्यांच्याकडून ईडब्ल्यूएस किंवा अराखीव प्रवर्गाचा विकल्प मागवण्यात आला. एसईबीसीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांनी अराखीव किंवा ईडब्ल्यूएस प्रवर्गाचा विकल्प दिल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड मंडळे व निवड प्राधिकरणे यांनी निवड याद्या सुधारित केल्या. अशा सुधारित निवड याद्यांमधील उमेदवारांची ९ सप्टेंबर २०२० पूर्वी निवड झालेली आहे. तथापि त्यांना नोकरभरती वरील निर्बंध, कोविड-१९. लॉकडाऊन व न्यायालयीन प्रक्रिया या कारणामुळे नियुक्ती देण्यात आली नाही, अशा उमेदवारांना महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम २०२२ मधील तरतुदीनुसार नियुक्ती देण्याचा निर्णय यापूर्वीच शासनाने घेतला आहे.

**– टीम लोकराज्य**

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२३

## कालावधी : ०९ नोव्हेंबर ते ०८ डिसेंबर २०२२

## सक्षम लोकशाहीची पहिली पायरी - मतदार नोंदणी

### विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२३ अंतर्गत आयोजित उपक्रम

| | |
|---|---|
| एकत्रीकृत प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी | दि. ०९ नोव्हेंबर, २०२२ (बुधवार) |
| दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी | दि. ०९ नोव्हेंबर, २०२२ (बुधवार) ते<br>दि. ०८ डिसेंबर, २०२२ (गुरुवार) |
| मतदार नोंदणीसाठीची ४ विशेष शिबिरे | शनिवार दि. १९ आणि रविवार दि. २० नोव्हेंबर, २०२२<br>तसेच<br>शनिवार दि. ३ आणि रविवार दि. ४ डिसेंबर, २०२२ |
| ग्रामसभा - मतदार यादी वाचन व नोंदणी | १० नोव्हेंबर २०२२ (गुरूवार) |
| विद्यार्थी, दिव्यांग, महिला यांसाठी विशेष शिबिरे | शनिवार दि. १२ व रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ |
| तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला,<br>घर नसलेले भटक्या व विमुक्त जमातीच्या व्यक्ती या<br>लक्षित घटकांसाठी विशेष शिबिरे | शनिवार दि. २६ व रविवार दि. २७ नोव्हेंबर, २०२२ |
| दावे आणि हरकती निकालात काढण्याचा कालावधी | दि. २६ डिसेंबर,२०२२ (सोमवार) पर्यंत |
| अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी | दि. ०५ जानेवारी, २०२३ (गुरुवार) |

**जर तुम्ही २०२३च्या जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर महिन्याच्या १ तारखेला किंवा त्याच्या आधी १८ वर्षाचे होणार असाल तर दिनांक ०९.११.२०२२ रोजी सुरू होणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अर्ज क्र. ६ भरून आगाऊ मतदार नोंदणी करू शकता.**

- **ऑनलाइन मतदार नोंदणीसाठी** https://nvsp.in, https://voterportal.eci.gov.in या संकेतस्थळांना भेट द्या किंवा Voter Helpline हे मोबाइल ॲप वापरा

- **प्रत्यक्ष मतदार नोंदणीसाठी** आपल्या जवळच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या

देशाचे भाग्यविधाते होऊ मतदार यादीत नाव नोंदवू




मतदार यादी पाहण्यासाठी ceo.maharashtra.gov.in अथवा electoralsearch.in या संकेतस्थळाला, वोटर हेल्पलाइन या मोबाइल ॲपला किंवा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या

**मतदार मदत क्रमांक : १८०० २२ १९५०**


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज